रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १५२ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## रायगड किल्ल्याचा गौरव

**नवी दिल्ली :** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. गुजरातच्या केवडियामध्येही या दिनानिमित्त परेड आयोजित करण्यात आली आहे. त्यामध्ये मराठा स्थापत्य कलेचा उत्कृष्ट नमुना असलेल्या 'रायगडा'ची प्रतिकृती साकारण्यात आल्याचं केंद्र सरकारकडून सांगण्यात आले आहे. नागरिकांनी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असं आवाहनही केंद्र सरकारकडून करण्यात आलं आहे.

रायगड, बुधवार, दि. ३० ऑक्टोबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## पालघरचे आमदार वनगा बेपत्ता

**ठाणे :** शिवसेनेची गद्दारी करून शिंदेंच्या गटात सामील झालेले पालघरचे आमदार श्रीनिवास वनगा यांचे तिकीट कापण्यात आले आहे. वनगा यांना झुलवत ठेवत ऐनवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी भाजपमधून आयात केलेल्या राजेंद्र गावीत यांना तिकीट दिले. तिकीट कापल्यामुळे वनगा नैराश्यात गेले असून, गेल्या १३ तासांपासून ते बेपत्ता आहेत. श्रीनिवास वनगा यांचे दोन्ही फोनही स्विच ऑफ येत असून, कुटुंबाचा आणि त्यांचा काहीही संपर्कही झालेला नाही. त्यामुळे कुटुंबियांची चिंता वाढली आहे.

आजचा अग्रलेख
**पन्नास खोक्यांची वसुली**

वे|ध|क

## पाच वर्षे हे झोपले होते का?

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सिंचन घोटाळा प्रकरण चौकशीचं खापर आर. आर. पाटील यांच्यावर फोडलं आहे. त्यानंतर पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. मागचे पाच वर्ष हे झोपले होते का? असा सवाल उपस्थित केला आहे. तासगाव येथील सभेत मंगळवारी अजित पवार यांनी आर.आर. पाटील यांनी सिंचन घोटाळाप्रकरणी चौकशीचे आदेश देऊन केसाने गळा कापला, असा खुलासा केला आहे. सिंचन घोटाळा प्रकरणातील फाइलवर आर. आर. पाटील यांची सही होती, हे फडणवीस यांनी ते मुख्यमंत्री झाल्यावर दाखवलं, असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे.

## कार अपघातामध्ये चौघे जखमी

**अलिबाग :** अलिबाग-पेण मार्गावर मंगळवारी दुपारी दोन चारचाकी वाहनांमध्ये अपघात झाला. या अपघातामध्ये कारमधील चार पर्यटक गंभीर जखमी झाले. त्यांना अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग-पेण मार्गावरील मैनुशेठ वाड्याजवळ दोन वाहनांची समोरासमोर धडक झाली. ओव्हरटेक करताना हा अपघात झाला. या अपघामध्ये दोन्ही कारचे खूप नुकसान झाले. कारमधील तीन महिला व एक पुरुष अशा चौघांना गंभीर दुखापत झाली. या घटनेची माहिती पोयनाड पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.

## ज्येष्ठ लेखिका वीणा देव यांचे निधन

**पुणे :** आपल्या लेखणीने मराठी वाचकांच्या मनात वेगळा ठसा उमविणाऱ्या ज्येष्ठ लेखिका डॉ. वीणा विजय देव यांचे मंगळवारी (दि. २९) निधन झाले. वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. डॉ. वीणा देव या दिवंगत ज्येष्ठ साहित्यिक गो.नी. दांडेकर यांच्या कन्या व प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या मातोश्री आहेत. डॉ. वीणा देव यांनी साहित्याचे वेगवेगळे प्रकार हाताळले. पुण्यातील शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी मराठी विभागप्रमुख काम केले. येथे त्यांनी ३२ वर्षे अध्यापनाचे कार्य केले. मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे या विषयावरील प्रबंधासाठी त्यांना पीएच.डी ही पदवी मिळाली. लेखन, संकलन आणि संपादन असे प्रकार त्यांनी लीलया हाताळले.

# बंडखोरी झाली रे!




■ **भोईरांच्या गळ्यात भाजपची माळ**
■ **महायुतीमध्ये बिघाडी, दळवींना बसणार फटका**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये महायुतीत आलबेल असल्याचा दावा भाजप, शिंदे गट कायमच करीत आले आहे. परंतु, गेल्या काही दिवसांपासून आ. दळवी आणि भाजपप्रणित अपक्ष उमेदवार दिलीप भोईर यांच्यातील कुरघोड्या चव्हाट्यावर आल्या आहेत. गेले कित्येक दिवस बंडखोरी होणार नसल्याचे ठामपणे सांगणाऱ्या महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना आज भोईरांच्या गळ्यातील कमळाच्या माळेने चांगलीच चपराक बसली आहे. अखेर अलिबाग-रोहा-मुरुड मतदारसंघात महायुतीत बंडखोरी झाली असल्याने दोन्ही गटातील कार्यकर्त्यांनी एकमेकांना हरविण्याचा चंग बांधला आहे.

महायुतीमध्ये बिघाडी झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे. अलिबाग विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी शिंदे गटातील महेंद्र दळवी यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर मित्रपक्षातील भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी बंडखोरी करीत अपक्ष म्हणून मंगळवारी •> पान ६ वर

### कोण तो भ...?

महेश मोहिते यांनी पक्षविरोधी कारवाई होईल, आम्ही प्रसाद देऊ, असे सद्या कार्यकर्त्याला सांगितले. परंतु, प्रसाद बनविण्यासाठी कालथा लागतो. तो गरम झाल्यावर खाली चटके देऊ, असा टोला भोईरांनी लगावला. २३ महिन्यांपूर्वी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. त्यावेळी तोच भ... पक्ष सोडून चालला होता, असे भोईर म्हणाले.

### दळवींसह केणींची काढली लायकी

कालच्या दिवशी याच व्यासपीठावर कोणीतरी माफी मागितली. मोठ्या विश्वासाने मते देऊन मतदारांनी लोकप्रतिनिधी म्हणून दळवींना विधानसभेत निवडून पाठविले. पाच वर्षांत त्यांनी काय केलं. आता माफी मागण्याची गरज काय होती. निवडणुकीत सहानुभूती मिळविण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आला. जनतेने विकासासाठी एक हजार ८२५ दिवस तुम्हाला दिले होते. मग या कालावधीत काय काम केलं? शपशविधी वगळता कधीही हा आमदार अधिवेशनात प्रश्न उपस्थित करताना दिसला नाही, असा संतप्त टोला भोईर यांनी लगावला. पाच वर्षांत कधीही सभागृहात जनतेचे प्रश्न मांडताना दिसले नाहीत. राजा केणीने एकतरी निवडणूक जिंकून दाखवावी. लायकी नसणाऱ्यांनी बोलू नये, असा खोचक चिमटाही त्यांनी केणीला काढला.

### तटकरे गेम करणार...

महेंद्र दळवी यांच्यासह त्यांच्या बगलबच्चांनी ते मंत्री होण्याचे स्वप्न पाहिले आहे. दळवी निवडून आल्यावर मंत्री झाल्यास आदिती तटकरे यांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आदिती तटकरे यांचे पालकमंत्रीपद घालविण्यामध्ये दळवींचा सहभाग होता. त्यावेळी महेंद्र दळवी यांनी शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांच्या खांद्यावर बंदूक ठेवत आदिती तटकरे यांचं पालकमंत्रीपद घालविलं होतं. त्याचा बदला घेण्याच्या तयारीत तटकरे असल्याची चर्चाही सध्या सुरु आहे. परिणामी, मुलीचे भविष्य धोक्यात टाकण्याऐवजी दळवी व गोगावलेंना घरी बसविण्याचे धोरण तटकरेंनी आखले असल्याची माहिती समोर आली आहे.

## १८२५ दिवस आ. दळवींनी मतदारांसाठी काय केले?

■ **भाजपाचे बंडखोर उमेदवार दिलीप भोईर यांची घणाघाती टीका**
■ **सहानुभूती मिळवण्यासाठी माफी मागण्याचे नाटक करु नका**

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांचा विकास होईल या आशेने मतदारांनी तुम्हाला विधानसभेमध्ये पाठवले होते. मात्र, गेल्या एक हजार ८२५ दिवसांमध्ये तुम्ही जनतेसाठी काहीच करु शकला नाहीत. त्यामुळे सहानुभूती मिळवण्यासाठी जनतेची माफी कसली मागता, अशी जोरदार टीका महायुतीतील भाजपाचे बंडखोर उमेदवार दिलीप भाईर उर्फ छोटम यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्यावर केली.

भोईर यांनी महायुतीच्या नाकावर टिच्चून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यावेळी त्यांच्यासोबत समर्थक उपस्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा समावेश होता.

महायुतीमधील धर्म न पाळता दिलीप भोईर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करुन महायुतीलाचा आव्हान दिले. विशेष म्हणजे, भोईर यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्यासोबत भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच भोईर यांच्या गळ्यामध्ये कमळ चिन्ह असलेला मफलरदेखील होता. त्यामुळे भाजपाचे त्यांना समथर्न आहे का, असा प्रश्न उपस्थितांना पडला.

गेल्या पाच वर्षांत आमदार महेंद्र दळवी यांनी कोणताच विकास केला नाही. दलित, कष्टकरी, शेतकरी, मच्छिमार, युवक, बेरोजगारी, उद्योग हे प्रश्न सोडवण्यात ते अपयशी ठरले आहेत. त्यामुळे त्यांना पुन्हा मतदारांपुढे मतं मागण्याचा नैतिक अधिकार राहिलेला नाही, असे भोईर यांनी अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. आ. दळवी यांनी आपल्या आमदारकीच्या कालावधीत एकही आमसभा बोलावली नाही. दळवींमध्ये नेतृत्व, दातृत्व, कर्तृत्व, मित्रत्व नाही, असे जोरदार टीकास्त्र भोईर यांनी सोडले. कोट्यवधींचा निधी आणल्याचे आ. दळवी बोलत आहेत, मग जनतेचा विकास कोठे दिसत का नाही, असा सवाल भोईर यांनी केला.

भाजपामधून हकालपट्टी करणाऱ्या ॲड. महेश मोहिते यांनी आम्हाला गद्दारीची भाषा शिकवू नये, असे बोलताना भोईर यांची जीभ घसरली. त्यांनी आपल्या भाषणात शिव्या दिल्या. भाषणामध्ये फक्त त्यांनी टीका केली. अलिबाग-मुरुडच्या जनतेसाठी कोणता आणि कसा विकास करणार याबाबत ते विशेष काही बोलले नाही. त्यांच्या दूरदृष्टीची कमतरता मतदारांना दिसून आली. त्यामुळे आपण अशा उमेदवारांना निवडून द्यायचे की, शेकापच्या सुज्ञ आणि सुशिक्षित उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना निवडून द्यायचे, अशी चर्चा सभेच्या ठिकाणी ऐकू येत होती. आतापर्यंत पाच निवडणुका लढलो आणि जिंकलो आहे. शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख राजा केणी यांनी आधी निवडणूक लढवून ती जिंकून दाखवावी, असे आवाहन भोईर यांनी केले.

# मुरुडमधील असंख्य कार्यकर्ते शेकापमध्ये

**चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या हस्ते जल्लोषात स्वागत**



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिंदे गटातील आमदार महेंद्र दळवी यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून मुरुडमधील असंख्य कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षात सामील झाले आहेत. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून मुरुड शहर कोळीवाडा येथील युवा नेतृत्व प्रयास वरसोलकर यांनी २०० ग्रामस्थांसह शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. येणाऱ्या विधानसभेच्या •> पान ६ वर

> शिंदे गटातील आमदार महेंद्र दळवी यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून कोळीवाड्यातील २०० हून अधिक कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे मुरुडमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या वाढीला अधिक चालना मिळाली असून, या निवडणुकीत शेकापच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना घवघवीत यश येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.
> – मनोहर बैले, ज्येष्ठ कार्यकर्ते

> विकासाच्या नावाखाली प्रकल्प आणून कोळी समाजासह मासेमारी करणाऱ्या गरीबवर्गाला देशोधडीला लावण्याचा घाट सरकारने सुरू केला आहे. या सरकारविरोधात प्रचंड चीड आहे. त्यामुळे अनेक मंडळी शेकापच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून प्रवेश करत आहेत. या निवडणुकीत शिंदे गटाला नक्कीच मतदार जागा दाखवतील.
> – विजय गिदी, अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघटना मुंबई

# शेकडो कार्यकर्ते शेकापमध्ये दाखल



**। पनवेल । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शेतकरी कामगार पक्षामध्ये पक्षप्रवेश सुरू आहेत. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी शेकापमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी स्वागत केले.

तळोजा फेज २ येथे दीक्षा जाधव यांच्या पुढाकाराने असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या ध्येय-धोरणांवर विश्वास ठेवत जाहीर प्रवेश केला. त्यांचे पक्षामध्ये स्वागत करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सभापती काशिनाथ पाटील, शेकाप पालिका जिल्हा चिटणीस गणेश कडू, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

## 'मविआ'चा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला समोर आला आहे. मात्र, शेवटच्या क्षणापर्यंत महाविकास आघाडीतील जागावाटपाबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली होती. दरम्यान, महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी पाच ठिकाणी दोन उमेदवार दिले आहेत.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाकडून ९६ उमेदवारांनी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. शिवसेना ठाकरे गटाकडून एकूण ९६ एबी फॉर्म वाटप करण्यात आले आहेत. त्यानुसार उमेदवारी अर्ज मंगळवारी शेवटच्या •> पान ६ वर

# जिल्ह्यात १११ उमेदवारांचे १४० नामनिर्देशनपत्र दाखल

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी नामनिर्देशन भरण्यास दि.२२ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली होती. मंगळवारी (दि. २९) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसअखेरपर्यंत जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात एकूण १११ उमेदवारांचे १४० नामनिर्देशनपत्र दाखल झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

१८८ - पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये २३ उमेदवारांचे ३० अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये पवन उत्तमराव काळे भारतीय जनसम्राट पार्टी, गजेंद्र कृष्णदास अहिरे (बसपा), प्रशांत राम ठाकूर भाजपा, अरुण जगन्नाथ भगत भाजपा, कांतीलाल हरिश्चंद्र कडू लोकमुद्रा जनहित पार्टी, डॉ. वसंत उत्तम राठोड (डिजिटल ऑर्गनायझेशन ऑफ नेशन), लीना अर्जुन गरड (शिवसेना उबाठा), प्रकाश रामचंद्र चांदीवडे (अपक्ष), संतोष शरद पवार (रिपब्लिकन सेना), चेतन नागेश भोईर (अपक्ष), सुदाम जगू जरग (राष्ट्रीय समाज पक्ष), प्रविण सुभाष पाटील (बहुजन मुक्ती पार्टी), अनिल अरुण मोंडे (अपक्ष), संपत श्रीपती लगाडे (डिजिटल ऑर्गनायझेशन ऑफ नेशन), बाळाराम महादेव पाटील (अपक्ष), बाळाराम गौऱ्या पाटील (अपक्ष), बाळाराम दत्तात्रेय पाटील (शेकाप), काशिनाथ तुकाराम पाटील (शेकाप), प्रशांत काशिनाथ ठाकूर (अपक्ष), योगेश चंद्रकांत चिले (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), प्रशांत बाळाराम ठाकूर (अपक्ष), उत्तम चंद्रमोहन गायकवाड (अपक्ष), प्रमोद कोळी (अपक्ष) यांचा समावेश आहे.

१८९ - कर्जत विधानसभा मतदार संघामध्ये १३ उमेदवारांचे १५ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये महेंद्र सदाशिव थोरवे (शिवसेना), नितीन नंदकुमार सावंत शिवसेना उबाठा, किरण खंडू ठाकरे (भाजपा, अपक्ष) •> पान ६ वर

# शेकापच्या तिन्ही शिलेदारांचे शक्तीप्रदर्शन

**बाळाराम पाटील, प्रीतम म्हात्रे, अतुल म्हात्रेंचे उदमेदवारी अर्ज दाखल**







**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने पनवेल मतदारसंघात माजी आमदार बाळाराम पाटील, उरण मतदारसंघातून प्रीतम म्हात्रे आणि पेण मतदारसंघातून अतुल म्हात्रे या तीन शिलेदारांनी अधिकृत उमेदवार म्हणून मंगळवार, दि. २९ रोजी मोठे शक्तीप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मोठ्या संख्येने पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी अलिबाग येथील सभेत अलिबाग, पनवेल, पेण, उरण मतदारसंघातील उमेदवारांची अधिकृतरित्या घोषणा केली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि. २५) अलिबाग-मुरुड-रोहा मतदारसंघाच्या पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दरम्यान, आज पनवेल मतदारसंघातून माजी आ. बाळाराम पाटील, उरण मतदारसंघातून प्रीतम म्हात्रे आणि पेण मतदारसंघातून अतुल म्हात्रे यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. जिल्ह्यात शेकापच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात आली आहेत. त्यामुळे विकासाचे •> पान ६ वर

## मुरुड किनारा सीगल पक्ष्यांनी बहरला

# परदेशी पाहुणे आले हो!

**गणेश चोडणेकर**
**। आगरदांडा ।**

मुरुड शहरात थंडीला सुरुवात झाली असून, दरवर्षीचे आकर्षण असलेले सीगल समुद्रकिनारी हजारोंच्या संख्येने दाखल झाले आहेत. सीगलचे थवेच्या थवे मुरुड किनारपट्टीवर भिरभिरु लागले आहेत. परदेशी पाहुण्यांचा मुक्त संचार आणि त्यांच्या किलबिलाटाने किनारा गजबजून गेला आहे. त्यामुळे पर्यटकांना एक आगळी पर्वणी मिळाली आहे.

रशिया आणि युरोपमधून हजारो किलोमीटरचा पल्ला पार करुन फ्लेमिंगोंचे आगमन समुद्रकिनारी झाले आहे. त्यांची लाल चोच, लांबसडक मान, गुलाबी पंख असे लोभस रुप असल्यामुळे या पक्ष्याला अग्निपंख या नावानेही ओळखले जाते. मुरुड समुद्रकिनाऱ्यासह रायगडातील किनारे सीगलने गजबजून गेले आहेत. हजारो पक्षी या भागात दिसू लागले आहेत. यातील काही स्थलांतरित तर काही इथेच •> पान ६ वर

### सीगलचे वैशिष्ट्य

सीगल म्हणजे समुद्रपक्षी. लॅरिडे कुटुंबाचे पक्षी आर्टिक्ट आणि अंटार्टिक खंडात खासकरून आढळतात. या पक्ष्याच्या २० पेक्षा अधिक प्रजाती असून, ते अत्यंत कुशाग्र बुद्धीचे म्हणून ओळखले जातात. सामान्यतः पांढऱ्या वा करड्या रंगांच्या आकाराने मध्यम ते मोठ्या आकारात अनुक्रमे १२० ग्रॅम ते १ किलो इतक्या वजनाचे असतात. त्यांची लांबी २९ ते ७६ सेंटिमीटर एवढी असते. त्यांच्या पंखाच्या टोकाला काळे ठिबके उठून दिसतात. भक्ष्य पकडण्यासाठी जाळीदार बोटांची त्यांना विशेष मदत होते. त्यांचा प्रजनन काळ सप्टेंबर ते जानेवारी यादरम्यानचा असतो. सी फूडवर त्यांचा ताव मारण्याचा अधिक भर असतो. उभयचर प्राणी तसेच सरपटणारे प्राणीही त्यांच्याकडून फस्त केले जातात.





# वांगणी येथील विद्या विकास शाळा तालुक्यात पहिली

**। नेरळ। प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्याला लागून असलेल्या वांगणी गावातील विद्या विकास एज्युकेशन संस्थानच्या विद्या विकास मंदिर शालेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत अंबरनाथ तालुक्यात पहिला क्रमांक मिळविला आहे. हि शाळा पहिली आली असून त्याबद्दल ११ लाखाचे बक्षीस शासनाच्या वतीने देण्यात आले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन अभियानांतर्गत वांगणी येथील विद्या विकास एज्युकेशन सोसायटी संचलित प्राथमिक शाळा वांगणी तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे या शाळेने अंबरनाथ तालुक्यात प्रथम क्रमांक प्राप्त केलेला आहे. विद्या विकास एज्युकेशन सोसायटी ची शाळा वांगणी या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा ध्यास घेऊन कार्यरत असते.

संस्थेची विद्यार्थी प्रगतीची ध्येयधोरणे त्या अनुषंगाने संस्थेचे होणारे मार्गदर्शन यामुळे शाळेची घोड दौड गेल्या ३० वर्षापासून सुरू आहे. या यशामध्ये संस्थेचे सचिव डॉ विनय राऊत, संस्थेच्या सहसंचालिका नांदोसकर तसेच मुख्याध्यापिका नीलिमा भोईर, यांचे मोलाचे मार्गदर्शन राहिले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान दोन मध्ये विद्या विकास शालेने खासगी संस्था गटात अंबरनाथ तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.त्याबद्दल या शाळला या १ लाखाचे बक्षीस मिळाले आहे.या यशात केंद्र प्रमुख राणू, विषय तज्ञ् मंगेश म्हात्रे, कासेगाव येथील विद्यालयाचे मुख्याध्यापक सोम नाथ कानगुडे,यांचे महत्वाचे योगदान राहिले आहे.

## जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येते कि, आम्ही **(१) आशिष अंकुश वर्दे आणि (२) तृप्ती आशिष वर्दे,** ज्यांचा पत्ता : कोप्रोली, पोस्ट सारळ, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड (''**मालक**'') असा आहे यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (''**मालमत्ता**'') संबंधातील मालकी अधिकारांची चौकशी करीत आहोत.

मालकांच्या विरुद्ध किंवा सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, अभिहस्तांकन, गहाण (सामान्य किंवा अन्य), वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, बक्षिस, धारणाधिकार, आकार, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, कब्जा, जप्ती, व्यादेश, प्रलंबित वाद, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, विकासाधिकार, भागिदारी, किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, दावा, लाभ, मागणी किंवा हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्ती/संस्था तसेच व्यक्तिगत हिंदू अविभाजित कुटुंब, एखादी बँक किंवा वित्तीय संस्था किंवा नॉन बँकिंग वित्तीय संस्था, व्यक्तींच्या समित्या किंवा व्यतिगत निकाय प्रस्थापित किंवा अप्रस्थापित, यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना खालील नमूद केलेल्या पत्त्यावर/इमेल आयडीवर या जाहीर सुचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारचा दावा/मागणी आणि/किंवा दावे/मागण्या/आक्षेप, जर काही असतील तर, त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल. या जाहीर सुचनेला प्रतिसाद देऊन संबोधित केलेल्या सर्व दाव्यांना/मागण्यांना आणि आक्षेपांना संदर्भ क्र. **L0229** दिला पाहिजे.

**परिशिष्ट**

गाव म्हात्रोली, ग्रुप ग्रामपंचायत सारळ, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, नोंदणी जिल्हा रायगड, आणि नोंदणी उपजिल्हा अलिबाग, जिल्हा परिषद रायगडच्या सिमेमधील (१) गट क्र. २३५, हिस्सा क्र. ६/९, क्षेत्रफळ ०-४१-०० हेक्टर म्हणजेच १ एकर आणि १ गुंठा आणि (२) गट क्र. २३५, हिस्सा क्र. ६/१०, क्षेत्रफळ ०-४७-४५ हेक्टर म्हणजेच १ एकर आणि ७.४५ गुंठे, एकूण क्षेत्रफळ ०-८८-४५ हेक्टर म्हणजेच २ एकर आणि ८.४५ गुंठे जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग

**आज दिनांक ३० ऑक्टोबर, २०२४**

**सागर कदम**
**भागिदार**
**डीएसके लिगल**
वकील आणि सॉलिसिटर्स,
१७०१, वन वर्ल्ड सेंटर, १७ वा मजला,
टॉवर २बी, ८४१, सेनापती बापट मार्ग
एल्फिन्स्टन रोड, मुंबई ४०००१३
ईमेल आयडी
srs.publicnotice@dsklegal.com

## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
## जाहीर आवाहन

माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत फटाके व पर्यावरणपूरक सण-उत्सव अनुषंगाने वायू प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत.

मा. राष्ट्रीय हरितन्यायाधिकरण यांनी O.A.No. ६८१/२०१८ अंतर्गत सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांना आपत्कालीन परिस्थितीत हवेच्या गुणवत्तेसंबंधी आवश्यक कार्यवाहीचा सल्ला देण्यासाठी दिल्ली एनसीआरप्रमाणे जीआरएपी अंतर्गत टास्क फोर्ससारखी योग्य यंत्रणा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या निर्देशानुसार अलिबाग नगरपरिषद क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारणे कामी विविध उपाय योजना आणि जनजागृती उपक्रम अलिबाग नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येत आहेत. आपण वैश्विक वातावरणीय बदलास सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या आणि तापमानवाढीच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे महत्वाचे कारण आहे. विविध सण/उत्सव प्रसंगी आपण फोडत असलेल्या फटाक्यांमुळे कार्बनडाय ऑक्साईड व सल्फरचे तसेच इतर विषारी वायूंचे प्रमाण वाढत असून, कार्बनडायऑक्साईड व सल्फरच्या वाढत्या प्रमाणामुळे हवेच्या प्रदूषणाची पातळी वाढत असून शहरातील हवेचा गुणवत्ता स्तर खालावण्याची शक्यता नाकारता येत नाही. फटाक्यांमधून उत्सर्जित होणारे विषारी वायू वनस्पती, पक्षी, प्राणी तसेच सर्व मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदूषण थांबवण्याची क्रिया आपण स्वतःपासून सुरु करु शकतो.

करिता अलिबाग नगरपरिषद क्षेत्रातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, 'माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत फटाकेमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल सण-उत्सव साजरे करावेत. पर्यावरणपूरक सण-उत्सव साजरी करण्यामध्ये पुढाकार घेत नागरीकांनी दीपावली कालावधीमध्ये फटाक्यांच्या वापर शक्यतो टाळावा. तथापि, दिवाळीच्या पूर्वसंध्येला फटाक्यांमुळे होणाऱ्या वायू आणि ध्वनी प्रदूषणाबाबत रिट याचिका (सिव्हिल) क्र. ७२८/२०१५ मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांच्या दुष्परिणामांबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याचे निर्देश दिले तसेच केवळ आवाज मुक्त प्रकाश फटाक्यांच्या वापरास प्रोत्साहन देण्याचे निर्देश दिले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांस अनुसरुन फटाके फोडणाऱ्यांनी केवळ रात्री १० वाजण्याआधीच फोडावेत असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

जा.क्र /
दिनांक :

**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद, अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांची मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील नमूद वर्णनाची मिळकत असुन ते सदर मिळकती मध्ये सामाईक हिस्सेदार/मालक आहेत.

वर नमूद सामाईक मिळकतीमध्ये माझे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदर मिळकतीचे सहहिस्सेदार माझे अशिलांचे अपरोक्ष सदर मिळकत विक्री करुन त्यामध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु अद्याप वाटप झालेले नसल्याने सदर मिळकतीबाबत कोणीही कोणताही व्यवहार करु नये. याउपरही कोणीही सदर मिळकतीसंदर्भात माझे अशिलांचा सामाईक हिस्सा वगळुन इतर सहहिस्सेदारांबरोबर कोणताही व्यवहार केल्यास तो माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| किहिम ता. अलिबाग, | ६८८ | ०.४४.०<br>पो.ख.०.१२.०<br>एकुण ०.५६.० | ९.५४ |

अलिबाग
दिनांक : २९/१०/२०२४

सही /
**(ॲड. प्रशांत एच.वर्तक)**
कार्यालय-तथास्तु, गोकुळनगर,
रेवस बायपास रोड, चेंढरे,
अलिबाग-रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णनः- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका उरण रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती उरण येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- जांभुळपाडा ताः- उरण, जिः-रायगड**

| अ. क्र. | सर्व्हे नं | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ३२/१३ | अंजली विजय मोहिते व इतर | ०.४५.०० पैकी ०.२५.०० | १.१९ |
| २ | ४३/९ | अंजली विजय मोहिते व इतर | ०.४८.४० पैकी ०.२०.०० | ४.०० |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विघमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण:-उरण
दिनांक :- ३०/१०/२०२४
**ॲड. उमेश लक्ष्मण शिंदे**
मो. ९८२०६२६९००
ऑफिस पत्ता : शॉप नं.९०५-९०८, शेल्टॉन क्युबीक्स, प्लॉट नं ८७, सेक्टर १५, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई. ४००६१४.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे तळवली तर्फे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर १२६ व गट नंबर ११४ या मिळकतीवरील नॉटीलस प्रोजक्ट मधील जरबेरा या इमारतीमधील ए विंग मधील पहिल्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक १०३, कारपेट क्षेत्र ५५०.८ चौ. फुट म्हणजेच ५१.१८ चौ.मी., व टेरेस १०८.२ चौ.फुट म्हणजेच १०.०५ चौ.मी असे एकुण बिल्ट अप क्षेत्र ८८३ चौ. फुट म्हणजेच ८२.०६ चौ.मी. ही निवासी सदनिका मिळकत, सदर निवासी सदनिकेचे विद्यमान मालक श्री. राजीव सिंग पी ठाकुर यांचेकडून कायम विकत घेण्याविषयी ठरविले आहे. व त्या अनुषंगाने विद्यमान मालकांबरोबर व्यवहाराची बोलणी सुरु आहेत. सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर वर्णन केलेल्या निवासी सदनिकेचे संदर्भात कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबध, मालकी, गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, ताबा, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कोर्ट केस अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे आपली लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत तशा प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकतीत कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, व मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २९/१०/२०२४

**(ॲड. महेश एकनाथ घरत)**
'गुरुकृपा' मु.पो. खंडाळे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२६३५५१२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री. एकनाथ गणपत मिणमिणे व इतर सर्व रा. अंजप, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे अंजप तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| सर्वे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|
| ७९/७/अ | १-५८-७० | ०=७० |

यापैकी जमिन मिळकतीमध्ये लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र १.१५.० (हे.आर.पॉ) एवढे असुन त्यापैकी विकत दिलेले नदीकडील क्षेत्र ०.९०.० (हे.आर.पॉ) आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ३०/१०/२०२४

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

बैंक ऑफ इंडिया BOI
Bank of India

# ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच

बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, पहिला मजला, २८, एस. व्ही. रोड, अंधेरी (प.), अंधेरी पश्चिम रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई- ४०० ०५८. दूर. क्र. २६२१०४०६/०७, ईमेल: asset.mnz@bankofindia.co.in

## स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी ई-लिलाव

**सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकांन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: खालील कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या मिळकती या बँक ऑफ इंडिया (तारण धनको) कडे गहाण/प्रभारित आहेत, ज्यांचा अन्वयीक/प्रत्यक्ष कब्जा बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या संबंधित कर्जदार आणि हमीदार यांच्याकडून बँक ऑफ इंडियाकडे असलेल्या गहाण/प्रभारित तारण मत्तांसापेक्ष येथे खाली दिलेल्या तपशिलाप्रमाणे संबंधित थकबाकीच्या वसुलीसाठी ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे '' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहेत. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम प्रत्येक तारण मत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री येथे खालील पुरविलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

**सरफैसी ॲक्ट,२००२ अन्वये ई-लिलाव विक्री सूचना नी कर्जदार/हमीदार यांना सूचना** — **(रु.लाखांत) (ई-लिलावाची तारीख - ०९.१२.२०२४)**

| अ. क्र. | खाते/कर्जदार/ हमीदारांचे नाव | मिळकतींचे वर्णन | राखीव किंमत/ इअर रक्कम | किमान बोली वाढ (लाखांत) | थकीत रक्कम (व्याज, दंड व्याज व खर्च वगळुन) (लाखांत) | सीईआरएसएआय सिक्युरिटी इंटरेस्ट/ ॲसेट आयडी | मिळकतीच्या ठिकाणी निरीक्षणाची तारीख/वेळ | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मे. लिओफोर्च्युन इन्फ्राबिल्डकॉन प्रा. लि. फॉर्च्युन कॅलिप्सो श्री. प्रदीप के. स्वामी श्री. प्रसाद के. स्वामी श्री. धिरेन सी. सावला श्री. वसंत डी. भामनिया श्री. सितापती चवली** | दुकान क्रमांक १, तळमजला, ए विंग, इमारत - "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल - माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११, मौजे- कोप्रोली, पोस्ट- नेरे, तालुका- पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. **चटई क्षेत्र -** १८४ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र -** २२१ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | ८.८५/ ०.८९ | १.०० | ५३७.१५ | २००००५५९०११० | १९.११.२०२४ **स. ११:०० ते** दु. १२:३० | ९९३७७०६००७ ८३४०४७४२९७ |
| | | दुकान क्रमांक २, तळमजला, ए विंग, इमारत - "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल - माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११, मौजे- कोप्रोली, पोस्ट- नेरे, तालुका- पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. **चटई क्षेत्र -** २३१ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र -** २७७ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | ११.१०/ १.११ | १.०० | ५३७.१५ | २००००५६००२९३ | १९.११.२०२४ **स. ११:०० ते** दु. १२:३० | ९९३७७०६००७ ८३४०४७४२९७ |
| | | दुकान क्रमांक ३, तळमजला, ए विंग, इमारत - "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल - माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११, मौजे- कोप्रोली, पोस्ट- नेरे, तालुका- पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. **चटई क्षेत्र -** २३१ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र -** २७७ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | ११.१०/ १.११ | १.०० | ५३७.१५ | २००००५६००३७३ | १९.११.२०२४ **स. ११:०० ते** दु. १२:३० | ९९३७७०६००७ ८३४०४७४२९७ |
| | | दुकान क्रमांक ४, तळमजला, ए विंग, इमारत - "डॅफोडिल", फॉर्च्यून गार्डन सीएचएस लिमिटेड, पनवेल - माथेरान रोड, प्लॉट क्रमांक ४५२ ए, ४५४, ७९७, ८०० आणि ७९८, सर्व्हे नंबर ८, ९, १० आणि ११, मौजे- कोप्रोली, पोस्ट- नेरे, तालुका- पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. **चटई क्षेत्र -** १८४ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र -** २२१ चौ.फूट **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | ८.८५/ ०.८९ | १.०० | ५३७.१५ | २००००५६००४०७ | १९.११.२०२४ **स. ११:०० ते** दु. १२:३० | ९९३७७०६००७ ८३४०४७४२९७ |
| | | फ्लॅट क्रमांक ३०२, तिसरा मजला, 'एच' विंग, 'ग्रीन हेवन रेसिडेन्सी' म्हणून ओळखली जाणारी इमारत, फॉर्च्युन गार्डन जवळ, नवीन सर्व्हे नंबर १, हिसा क्रमांक ५बी/१, २, ५बी/२, गाव- कोप्रोली, तालुका - पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. **चटई क्षेत्र -** ४१८ चौ.फूट **बिल्टअप क्षेत्र -** ५०२ चौ.फूट **टेरेस क्षेत्र-** ६४५ चौ. फूट. **(बँकेकडे प्रत्यक्ष कब्जा)** | २२.२५/ २.२३ | १.०० | ५३७.१५ | २००००५५८८८०८ | १९.११.२०२४ **स. ११:०० ते** दु. १२:३० | ९९३७७०६००७ ८३४०४७४२९७ |
| २. | **मे. लिओफोर्च्युन इन्फ्राबिल्डकॉन प्रा. लि. फॉर्च्युन सिंफनी श्री. प्रदीप के. स्वामी श्री. प्रसाद के. स्वामी श्री. धिरेन सी. सावला श्री. वसंत डी. भामनिया श्री. सितापती चवली** | फ्लॅट क्र. ३०२, ३रा मजला, ई विंग, फॉर्च्युन गार्डन सीएचएसएल मधील लीली अशी ज्ञात इमारत, पनवेल-माथेरान रोड, प्लॉट क्र. ४५२ए, ४५४, ७९७, ७९९, ८००, ७९६ए व ७९८, नवीन सर्व्हे क्र.१, हिस्सा क्र. ५बी/१, २ आणि ५बी/२, गाव-कोप्रोली, पोस्ट नेरे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड- ४१०२०६ **चटई क्षेत्र ३७० चौ.फूट बिल्टअप क्षेत्र ४४४ चौ.फूट. टेरेस क्षेत्र ८४० चौ.फूट. (बँकेसह प्रत्यक्ष कब्जा)** | २२.३०/ २.२३ | १.०० | ६४६.४२ | २००००६११२०२४ | १९.११.२०२४ **स. ११:०० ते** दु. १२:३० | ९९३७७०६००७ ८३४०४७४२९७ |
| | | फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, आय विंग, फॉर्च्युन गार्डन सीएचएसएल मधील मेरिगोल्ड अशी ज्ञात इमारत, पनवेल-माथेरान रोड, प्लॉट क्र. ४५२ए, ४५४, ७९७, ७९९, ८००, ७९६ए व ७९८, नवीन सर्व्हे क्र.१, हिस्सा क्र. ५बी/१, २ आणि ५बी/२, गाव-कोप्रोली, पोस्ट नेरे, तालुका पनवेल, जिल्हा - रायगड-४१०२०६. **चटई क्षेत्र ३७० चौ.फूट बिल्टअप क्षेत्र ४४४ चौ.फूट. टेरेस क्षेत्र ९५० चौ.फूट. (बँकेसह प्रत्यक्ष कब्जा)** | २३.३५/ २.३४ | १.०० | ६४६.४२ | २००००६१११७६५ | १९.११.२०२४ **स. ११:०० ते** दु. १२:३० | ९९३७७०६००७ |

**ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे :**

ई-लिलाव ''जे आहे जेथे आहे तत्वाने'', ''जे आहे जसे आहे तत्वाने'' आणि ''जे काही आहे तेथे आहे तत्वाने'' तत्वाने करण्यात येईल आणि तो ''ऑनलाईन'' करण्यात येईल.

लिलाव प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासह **०९.१२.२०२४ रोजी स. ११.०० ते सायं.** ५.०० भाप्रवे दरम्यान वेबसाईट **https://ebkray.in** मार्फत ऑनलाईन ई-लिलाव/बोली ने करण्यात येईल. ई लिलाव बोली प्रपत्र उद्घोषणा, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सामान्य अटी आणि शर्ती वेबसाईट मध्ये- **https://www.bankofindia.co.in**

बोलीदार **https://ebkray.in** ला भेट देऊ शकतात, जेथे बोलीदारांसाठी ''मार्गदर्शक तत्वे'' एज्युकेशनल व्हिडिओसह उपलब्ध आहेत. बोलीदारांनी पुरेशा आधी खालील औपचारिकता पूर्ण करायच्या आहेत:-

**टप्पा १:** बोलीदार/खरेदीदारांची नोंदणी : बोलीदारांनी त्यांचा मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी वापरुन नोंदणीकृत ई लिलाव पोर्टल **https://ebkray.in** वर नोंदणी करायची आहे. (स्टेप बाय स्टेप प्रक्रीया वर्णन पीडीएफ (बायर मॅन्युअल) पेजच्या खाली हेल्प ऑप्शन अन्वये होम पेज मध्ये डाऊनलोड करीता उपलब्ध आहे.)

**टप्पा २:** केवायसी पडताळणी : बोलीदारांनी आवश्यक केवायसी दस्तावेज अपलोड करायचे आहेत. केवायसी दस्तावेजांची ई-लिलाव सेवा पुरवठादारांकडुन पडताळणी करण्यात येईल (२ कामकाजाचे दिवस लागू शकतात).

**टप्पा ३:** त्यांच्या ग्लोबल इएमडी वॉलेटमध्ये इअर रकमेचे हस्तांतर : ई-लिलाव पोर्टलवरील जनरेट केलेली चलान वापरून एनईएफटी वापरुन फंडाचे ऑनलाईन/ऑफलाईन ट्रान्सफर करणे.

**टप्पा १ ते टप्पा ३** ई-लिलावाच्या तारखेपूर्वी पुरशा आधी बोलीदारांनी पूर्ण करायचा आहे. बोलीदार नोंदणी आणि बोली मार्गदर्शनासाठी बोलीदार **https://ebkray.in** ला भेट देऊ शकतात.

ई बीक्रयचा हेल्पलाईन तपशील/संपर्क व्यक्ती तपशील:

| ई बीक्रय हेल्पडेस्क क्रमांक | | | |
|---|---|---|---|
| **नाव** | **ई-मेल आयडी** | **टीम** | **मोबाईल क्र.** |
| हेल्पडेस्क क्रमांक | support.ebkray@psballiance.com | पीएसबी अलायन्स | ८२९१२२०२२० |
| धर्मेश अशेर | avp.projectmanager2@psballiance.com | पीएसबी अलायन्स | ९८९२२१९८४८ |
| सुधिर पांचाळ | sudhir@procure247.com | आय सोर्सिंग टेक्नॉलॉजी | ८१६०२०५०५१ |

१. इच्छुक बोलीदारांनी वैध इमेल पत्ता धारण केलेला पाहिजे. तपशिल आणि चौकशी करिता कृपया ईबीक्रय हेल्पडेस्क क्र. ८२९१२२०२२०, हेल्पलाईन ईमेल आयडी : **support.ebkray@psballiance.com** येथे संपर्क करावा.
२. प्राधिकृत अधिकाऱ्यांचे चांगले ज्ञान आणि माहितीनुसार मिळकत/तींवर बोजा नाही. तथापि इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीला बाधक दावे/हक्क/थकबाकी आणि लिलावासाठी ठेवलेल्या मिळकत/तींचे हक्क, बोजा संदर्भात त्यांची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात ही काही बँकेचे सादरीकरण किंवा वचन मानण्यात येऊ नये. मिळकत बँकेला ज्ञात किंवा अज्ञात विद्यमान आणि भविष्यातील बोजासह विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/हक्क/थकबाकीकरिता जबाबदार राहणार नाही. विक्रीसाठी ठेवलेल्या मिळकत/तींच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर केल्यानंतर कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत.
३. इसारा अनामत रक्कम (इअर) ऑनलाईन बोली सादर करण्यापूर्वी आयबीएपीआय पोर्टल मध्ये नमूद आणि मार्गदर्शनानुसार बँक खात्यामध्ये आरटीजीएस/ एनईएफटी/फंड ट्रान्सफरमार्फत जमा करणे आवश्यक आहे.
४. केवायसी दस्तावेज म्हणजे १.ओळखीचा पुरावा (केवायसी) म्हणजेच व्होटर आयडी कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट इ. २. पत्रव्यवहाराकरिता विद्यमान पत्त्याचा पुरावा, ३. बोलीदाराचे पॅनकार्ड ४. बोलीदारांचा वैध ई- मेल आयडी/संपर्क क्रमांक इ.
५. निरीक्षणाची तारीख वरील नमुद संपर्क क्रमांकावर पूर्व वेळ ठरवून नमुद केलेल्या वेळी वरील कोष्टकात नमुद नुसार राहील.
६. संभाव्य बोलीदार आयबीएपीआय पोर्टल यांचेकडून ई-लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात.
७. बोलीदारांनी योग्य तपशिलासह विहित प्रपत्रात फक्त ऑनलाईन प्रक्रियेद्वारे मिळकतीकरिता बोली सादर करणे आवश्यक आहे.
८. बोलीदारांनी विक्रीच्या अटी आणि शर्ती वाचल्याचे आणि समजून घेतल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्यावर बंधनकारक राहतील.
९. बोली मूल्य आरक्षित मूल्यापेक्षा जास्त असावे आणि बोलीदार त्यांचा पुढील प्रस्ताव रु. ५ करोड पर्यंत राखीव किमतीकरीता रु. १.०० लाख (रुपये एक लाख) /रु. ५ करोड- रु. ९ करोड पर्यंत राखीव किंमतीकरीता रु. ५.०० लाख (रु. पाच लाख)/ आणि रु. ९ करोड पर्यंत राखीव किंमतीकरीता १०.०० लाख (रु. दहा लाख) च्या पटीत वाढवू शकतात.
१०. बोली सादर करण्यापूर्वी मिळकतीबाबत त्यांचे समाधान आणि निरीक्षण करणे ही इच्छुक बोलीदाराची जबाबदारी राहील.
११. यशस्वी बोलीदाराची इसारा अनामत रक्कम (इअर) विक्री मोबदल्याचा भाग म्हणून राखून ठेवण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांची इअर ई-लिलाव विक्री प्रक्रिया संपल्यावर परत करण्यात येईल.
१२. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय नाही. यशस्वी बोलीदाराने त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त पुढील दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्यांनी बोली किंमत स्वीकारल्यानंतर त्वरित अगोदर जमा केलेल्या (इअरसह) खरेदी रकमेच्या २५% आणि विक्री किंमतीची उर्वरित विक्रीपासून १५ दिवसात वा पूर्वी जमा करणे आवश्यक आहे. लिलाव बँकेच्या निश्चितीअधीन राहील. कुठल्याही टप्प्यावर यशस्वी बोलीदाराने रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास अगोदर जमा केलेले सर्व पैसे जप्त करण्यात येतील आणि मिळकत पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि कसूरवार बोलीदाराचा मिळकत/रकमेच्या संदर्भात दावा/हक्क राहणार नाही.
१३. संभाव्य पात्र बोलीदार ई- लिलावाच्या तारखेपूर्वी ईबीक्रय पोर्टल कडून ई-लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षण घेऊ शकतात. प्राधिकृत अधिकारी किंवा बँक हे इंटरनेट नेटवर्क प्रॉब्लेम/वीज जाणे किंवा कोणत्याही तांत्रिक अडचणी इ. करिता जबाबदार राहणार नाहीत. अशा आकस्मिक घटना टाळण्यासाठी बोलीदारांना ई-लिलाव प्रक्रियेत यशस्वीरित्या सहभागी होण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य उपकरणे, पॉवर बॅकअपची खात्री करण्याची विनंती करण्यात येत आहे.
१४. खरेदीदार मिळकतीच्या संदर्भात सरकारकडे देय सर्व वैधानिक देय, कर आणि दर आणि देणे दोन्ही वर्तमान आणि भविष्यातील समाविष्ट विक्री प्रमाणपत्र/ नोंदणी/प्रभार समाविष्ट मुद्रांक शुल्क सोसावे लागेल.
१५. खरेदीदारांनी प्रयोज्य टीडीएस समाविष्ट इतर सांविधानिक थकीत, नोंदणीकृत प्रभार, स्टॅम्प ड्युटी इ. सोसावे लागेल.
१६. उच्चतम प्रस्ताव स्वीकारणे प्राधिकृत अधिकारी/बँकेवर बंधनकारक नाही आणि त्यांना कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी ई-लिलाव तहकूब/पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मिळकत किंवा तिचा भाग काढून घेण्याचे सर्वस्वी हक्क आणि स्वेच्छा निर्णय राहतील.
१७. विक्री प्रमाणपत्र फक्त खरेदीदार/अर्जदाराच्या नावे जारी करण्यात येईल आणि कोणत्याही अन्य नावाने जारी करण्यात येणार नाही.
१८. विक्री सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अंतर्गत विहित नियम/अटीच्या अधीन राहील. विक्रीच्या अटी आणि शर्तीवर पुढील चौकशी तपशील काही असल्यास दिलेल्या संपर्क क्रमांकावरुन प्राप्त करता येईल.
१९. कोणीही सहभागी होणाऱ्यांनी स्वतःची नोंदणी केल्यानंतर इअर जमा केली आहे आणि त्यानंतर त्यांची ई-बोली सादर केली नाही तर ते ईबीक्रय पोर्टल मध्ये विनिर्दिष्ट पद्धती मार्फत बोली रक्कम राखून ठेवू शकतात.
२०. प्रयोज्य असेल तेथे जीएसटी यशस्वी बोलीदाराने भरायचा आहे.

**कर्जदार/हमीदारांसाठी विक्री सूचना**

निम्नस्वाक्षरीकार बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असल्याने, ही विक्री सूचना जारी करण्याचे व सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम ह्यांच्या अन्वये विक्रीचे सर्व अधिकार वापरण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. वर वर्णन केलेल्या बँकेने मंजूर केलेल्या कर्जाच्या संबंधात व्याज आणि खर्च व आकार इ. सह थकीत रकमेचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर केली आहे. म्हणून ६० दिवसांत उपरोक्त रक्कम अदा करण्यासाठी कलम १३(२) अन्वये बँकेने तुम्हा सर्वांना एक मागणी सूचना जारी केली. ६० दिवस संपूनही तुम्ही रकमेचे प्रदान केलेले नाही म्हणून, प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कलम १३(४) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून वरील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेल्या तारण मत्तांचा कब्जा घेतला. तुम्हाला याद्वारे सूचना देण्यात येते की, विक्रीच्या निर्धारित तारखेपूर्वी वरील रक्कम तुम्ही प्रदान करावी, कसूर केल्यास, मिळकतीची विक्री केली जाईल आणि शिल्लक थकबाकी काही राहिल्यास व्याज व खर्चासह तुमच्याकडून वसूल केली जाईल. कृपया ध्यानात ठेवावे की, मागणी सूचना, कब्जा घेणे, मूल्यांकन आणि विक्री इ. शी संबंधित सर्व खर्च, पहिल्यांदा निम्नस्वाक्षरीकार रोकड करतील त्या विक्री रकमेतून वजा केले जातील आणि विक्री किंमतीपैकी उर्वरित रक्कम तुमच्या वरील दायित्वात वर्ग केली जाईल. इसारा रक्कम जमा करण्यासहित त्याच्या अटी आणि शर्तीवर होणाऱ्या लिलावात सहभागी होण्याची मोकळीक तुम्हाला आहे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ३०.१०.२०२४**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ इंडिया**

**निवडक**

## वावंजे येथून इसम बेपत्ता

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील एन.के.गार्डन वावंजे पोलीस चौकीजवळ राहणारे ६० वर्षीय इसम कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. याकुब युसून खान (६०) असे या व्यक्तीचे नाव आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२४४४ किंवा पो.हवा.अमर भालसिंग ९५९४३५८४४४ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## दुचाकीला टँकरची धडक

**नवीन पनवेल :** दुचाकीला टँकरने धडक दिल्याने अनिलकुमार ठाकूर याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी टँकर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अनिलकुमार ठाकूर हा भिंगारवाडी येथील गॅरेजमधील काम संपवून स्कुटी चालवत घेऊन जात होता. आजीवली येथे नवकार लॉजिस्टिक कंपनीसमोर आजीवली स्टॉप येथे आला असता पाठीमागून येणाऱ्या टँकर चालकाने टँकर भरधाव वेगाने चालवला आणि अनिल कुमार यांच्या स्कुटीला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला.

## मंगळसूत्र नेले चोरून

**उरण :** पनवेल एसटीमध्ये चढत असताना ६० वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरल्या प्रकरणी चोराविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पुष्पा धनावत व त्यांचे पती चष्मा दुरुस्त करण्यासाठी पनवेलला ओरियन मॉल येथे चष्म्याचे काम करून दोघे रसायनीला जाण्यासाठी दुपारी एसटी स्टँडवर आल्या आणि वाशीवली येथे जाणाऱ्या बसमध्ये चढले. अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले.

## ई सिगारेटची विक्री

**नवीन पनवेल :** बंदी असलेल्या ई सिगारेटची विक्री केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. टेंभोडेगाव रिक्षा स्टॅन्डजवळ सर्वेश पानशॉपमध्ये एक इसम ई सिगारेटची विक्री करत असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. त्याची झडती घेतली असता ई सिगारेट सापडून आले. सर्वेश कुमार श्रीराम सरोज याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## आदिवासींना फराळ वाटप

**कोर्लई :** वसंतराव नाईक महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे प्राचार्य डॉ.जे.के.कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी बांधवांना फराळ वाटप करण्यात येऊन दिवाळी गोड करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. विहूर येथील १३५ आदिवासी बांधवांना फराळ वाटप करण्यात येऊन शुभेच्छा देण्यात आल्या. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. जी.डी.मुनेश्वर, प्रा.डॉ.एस.एस.भैरगुंडे, स्वयंसेवक, आदिवासी बांधव, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# उरणमध्ये शेकापचे प्रीतम म्हात्रे यांचे उमेदवारी अर्ज दाखल

**। उरण । वार्ताहर ।**

**नवीमुंबई परिसरातील उद्योजक तथा शेकापचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे यांचे सुपुत्र प्रीतम म्हात्रे यांनी उरण विधानसभा मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज शुक्रवारी (दि.२९) जोरदार शक्तीप्रदर्शन करत निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांच्या कडे दाखल केला.यावेळी प्रितम म्हात्रे यांच्या मागे तरुणांची फौज उभी असल्याचे चित्र दिसून आले.**





उरण विधानसभा मतदारसंघातून महाआघाडीचे उमेदवार शिवसेना उबाठा गटाचे माजी आमदार मनोहर भोईर यांनी आपला उमेदवारी अर्ज सोमवारी दाखल केला.याच मतदारसंघातून महाआघाडीचे उमेदवार म्हणून शेकापचे प्रीतम म्हात्रे यांनी ही मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज उद्योजक जे.एम. म्हात्रे, ममता म्हात्रे यांच्या उपस्थितीत जोरदार शक्तीप्रदर्शन करत अर्ज दाखल केला. यावेळी प्रीतम म्हात्रे यांनी सांगितले कि मी आज माझा उमेदवारी अर्ज हा उरणच्या सर्वांगीण विकासासाठी सादर केला आहे. आमची महाआघाडी सोबत चर्चा सुरू आहे.

त्यामुळे ४ तारखेला मी महाआघाडीचा उमेदवार राहणार त्याचे चित्र स्पष्ट होणार आहे. माजी आमदार जयंत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, उद्योजक जे.एम.म्हात्रे, ॲड मानसी म्हात्रे, उरण उत्कर्ष समितीचे अध्यक्ष गोपाळ पाटील, ज्येष्ठ नेते पांडुरंग म्हात्रे, कामगार नेते रवी घरत, मधुशेठ पाटील, सतिश घरत, माजी सभापती नरेश घरत, तालुका चिटणीस विकास नाईक, महिला तालुका संघटक सीमा घरत, कृषी उत्पन्न बाजार समितीचे नारायणशेठ घरत, तालुका युवा अध्यक्ष रमाकांत म्हात्रे, माजी रायगड जिल्हा परिषद सदस्य रविंद्र पाटील,सरपंच संतोष घरत,माजी उपसभापती शुभांगी सुरेश पाटील, प्रा.एल.बी.पाटील, ज्येष्ठ नेते काका पाटील, राजेंद्र मढवी,युवा नेते भारतराज थळी, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे सह हजारो कार्यकर्त्यांनी प्रितम दादा म्हात्रे यांना उरणचे नेतृत्व करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे औचित्य साधून लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जासई येथील जन्म गावात सभेचे आयोजन करण्यात आले होते.प्रितम म्हात्रे यांना विजयी करण्याचा निर्धार उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षाच्या हजारो कार्यकर्त्यांनी विशेष करून महिला वर्गानी केला आहे.

# पेणमध्ये अतुल म्हात्रे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**। पेण । वार्ताहर ।**



पेण विधानसभा मतदार संघामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे खजिनदार अतुल म्हात्रे यांनी आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या सोबत उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज भरण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचे रुपांतर पुढे महात्मा गांधी वाचनालयाच्या पटांगणामध्ये सभेमध्ये झाले. रगरगत्या उन्हात, उन्हाची तमा न बाळगता लाल बावट्याचे शिलेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतुल म्हात्रे यांच्या सोबत आज जिल्हा परिषद सदस्य सुरेश खैरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

तिसऱ्या मुंबईच्या नावाखाली शेतकऱ्यांची जमीन लाटण्याचा शासनाचा मानस आहे. विकासाला विरोध नाही. प्रकल्पांना विरोध नाही. विकास आम्हाला कळतो. आमच्या प्रत्येक घरामध्ये आज सुशिक्षित मुलगा आहे. त्याला विकास कळतो आणि विकासाची परिभाषा समजत असताना आमचे म्हणणे फक्त एकच आहे. की प्रकल्पाच्या भूमिकेला आमचा विरोध आहे. प्रकल्पामध्ये आमच्या जमिनी कवडीमोल भावामध्ये घेतात त्याला आमचा विरोध आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की विकासाचा केंद्र बिंदू इथला स्थानिक समाज असला पाहिजे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये तो विकासक बनला पाहिजे. उद्योजक बनला पाहिजे, असे अतुल म्हात्रे म्हणाले.

प्रत्येक युवकाला रोजगार आणि अनेकांना उद्योजक बनवायचे आहे. जिथे प्रकल्प येत आहेत. त्या ठिकाणी किमान स्थानिकांमधील १००० विकासक, १००० बिल्डर्स आपली मुलं बनली पाहिजेत. तेव्हाच स्थानिकांच्या विकासाचे स्वप्न पूर्ण होईल नाही तर आज शासन आपल्या डोळ्यामध्ये धुळ फेकून आपली जमीन खिशातून घालून त्याचे कवडीमोलाचे दाम देत आहे. आपली जमिन गेली की आपली ओळख जाते. एखाद्या परप्रांतीयामध्ये आणि आपल्यामध्ये काहीच फरक राहत नाही. तेव्हा आजच निश्चय करा की आम्ही आमची जमीन देणार नाही, असे आवाहन अतुल म्हात्रे यांनी केले.

# मतदानोत्तर जनमत चाचणी जाहीर करण्यास मनाई

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान कालावधीत कोणत्याही प्रकारची मतदानोत्तर जनमत चाचणी जाहीर करण्यास भारत निवडणूक आयोगाने मनाई केली आहे. तसेच मतदान संपण्याच्या वेळेपूर्वी ४८ तासांच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे मत सर्वेक्षण जाहीर करण्यास मनाई करण्यात आली आहे.

राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक, तसेच नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचे मतदान होत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने अधिसूचित केल्यानुसार १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत सार्वत्रिक निवडणुका आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसंदर्भात कोणत्याही एक्झिट पोलचा निकाल वृत्तपत्रे इलेक्ट्रॉनिक माध्यमे अथवा अन्य कोणत्याही प्रकारे त्यातील अंदाज आयोजित करणे आणि प्रकाशित करणे किंवा प्रसारित करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम १२६ (१) (ब) नुसार, विधानसभा सार्वत्रिक निवडणुका आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाच्यापोटनिवडणुकांसंदर्भात मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेआधी ४८ तासांच्या कालावधीत निवडणुकीशी संबंधित मजकूर दाखविण्यास तसेच कोणत्याही इलेक्ट्रॉनिक मीडियात कोणतेही ओपिनियन पोल किंवा निवडणूक सर्वेक्षण अंदाज प्रदर्शित करण्यास मनाई असेल, असे भारत निवडणूक आयोगामार्फत स्पष्ट करण्यात आले.



**● पनवेल १८८ विधानसभा मतदार संघामधून शेकाप उमेदवार बाळाराम पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी पनवेल शहरामधून शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रॅली काढून शक्ती प्रदर्शन केले.**

# बेकायदा विक्रेत्यांमुळे कायदेशीर विक्रेत्यांना ‘फटका’

**। पनवेल । वार्ताहर ।**

प्रशासनाने फटाके विक्रेत्यांना एका विशिष्ट जागेत परवानगी दिली असताना इतर ठिकाणी बेकायदेशीर फटाके विक्री होत असल्याने अधिकृत विक्रेत्यांना आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे पालिकेने अशा अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी अधिकृत विक्रेते करत आहेत.

पनवेल महानगर पालिका क्षेत्रात पनवेल, कळंबोली, कामोठे, खारघर, नवीन पनवेल, तळोजा, खांदा वसाहत ही शहरे येतात.याठिकाणी मोकळी जागा पाहून काही दिवसांकरीता पालिका दरवर्षी विविध परवानग्या, दाखले पाहून लॉटरी पद्धतीने गाळ्यांची सोडत काढते.त्यासाठी जागेच्या क्षेत्रफळानुसार भाडेदेखील आकारले जाते.मग हे विक्रेते लाखोंचा माल आणून विक्री करतात.यासाठी काही जण कर्जे देखील काढतात.पण ही विक्री करताना त्यांना अनधिकृत विक्रेत्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागते. हे अनधिकृत विक्रेते कधी रस्त्यावर तर कधी छोट्या टपऱ्यांमधून विक्री करतात.यामुळे काही घटना घडल्यास मोठी जिवीत हानी होवू शकते. दिवाळीचा सण जवळ आला की विविध ठिकाणी रस्ते, पदपथांवर फटाक्यांची विक्री केली जाते. त्यांना हटविण्याची तत्काळ कारवाई केली जावी, असे अतिक्रमण निर्मुलन तसेच परवाना विभागाच्या विभाग स्तरावरील अधिकाऱ्यांना सांगण्यात यावे अशी मागणी अधिकृत फटाके विक्रेत्यांकडून करण्यात येत आली आहे.

# पोलिसांची दिवाळी, निवडणूक बंदोबस्तात

**। रायगड । प्रतिनिधी ।**

कायदा व सुव्यवस्था चोख ठेवत राज्यातील पोलीस आपापली कामगिरी बजावत आहेत. नागरिकांना भीतीमुक्त जीवन जगण्यात वरिष्ठ पोलिसांच्या नियोजनाचा महत्त्वाचा वाटा आहे; मात्र विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यापासून पोलिसांची दिवाळी ही निवडणूक बंदोबस्तात जाणार आहे.



यंदाची पोलिसांची दिवाळी निवडणुकीच्या बंदोबस्तात आणि धावपळीत जाणार आहे. पोलिसांच्या रजा, सुट्या २५ नोव्हेंबरपर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबियांना कुटुंबप्रमुखाशिवाय सण साजरा करावा लागणार, असे चित्र दिसते.

लोकसभा निवडणुकीत जवळपास दोन महिने पोलीस बंदोबस्तात व्यग्र होते. त्यानंतर थोड्या दिवसाची विश्रांती मिळाली. पुन्हा गणेशोत्सवात पोलीस यंत्रणा बंदोबस्तासाठी रस्त्यावर उतरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

त्यानंतर नवरात्रोत्सवाचा बंदोबस्तही झाला. विधानसभा निवडणुकीची लगबग ऐन दिवाळीत सुरू होणार असल्याचे संकेत मिळाले होते. त्यानुसार यंदाच्या दिवाळीतच निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे.

### गावी जाण्याचा मुहूर्त टळला

**निकालानंतरच जिल्ह्याबाहेरील रहिवासी असलेले बहुतांश पोलीस अधिकारी लक्ष्मीपूजन कर्तव्याच्या ठिकाणी दरवर्षी करतात. लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी चार ते पाच दिवसांच्या रजा काढून दूरवरील गावी जातात; मात्र यंदा विधानसभा निवडणुकीमुळे रजा मिळणार नाही.**

### मतमोजणीपर्यंत सुट्या रद्द

**पोलीस महासंचालकांनी दिलेल्या आदेशानुसार, २५ नोव्हेंबरपर्यंत पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या साप्ताहिक सुट्या, रजा रद्द करण्यात आल्या आहेत. केवळ वैद्यकीय रजा, अत्यावश्यक कारणासाठीच्या रजा घेता येणार आहेत. जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांत जवळपास पाच हजारांहून अधिक पोलीस, होमगार्ड, राज्य राखीव दलाचे पोलीस यांचा बंदोबस्त राहणार आहे.**

निवडणूक म्हटली की, उमेदवारांच्या अर्ज भरण्यापासून ते निकालापर्यंत पोलिसांना दक्ष राहावे लागते. कायदा व सुव्यवस्था कायम ठेवून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांना रात्रंदिवस सज्ज राहावे लागते. यंदा दिवाळी सणाचा बंदोबस्त आणि निवडणूक दोन्हींकडे पोलीस यंत्रणेला लक्ष द्यावे लागणार आहे.

# अंजुमन इस्लामतर्फे आदिवासींना फराळ वाटप

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

आदिवासी वाडी येथे दिवाळीनिमित्त कपडे व फराळाचे वाटप अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा येथील राष्ट्रीय सेवा योजना, आजीवन अध्ययन शिक्षण विस्तार विभाग व माजी विद्यार्थी संघटना यांच्या मार्फत नुकतेच शीघ्रे येथे महाविद्याचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळीनिमित्त कपडे व फराळाचे वाटप करण्यात आले.

दिवाळी हा सण वर्षातील महत्वाचा सण असतो. मात्र, अनेकांना आर्थिक अडचण असल्याने हा सण उत्साहात साजरा करता येत नाही याचे भान ठेऊन व आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो या हेतूने महाविद्यालयातील आजी माजी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापक यांनी नवीन, वापरात नसलेले कपडे तसेच खाऊ जमा करून महाविद्यालयाच्या वतीने त्याचे शिघ्रे आदिवासी वाडी येथे वाटप केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख डॉ.फिरोज शेख, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. जावेद खान, प्रा. निदा गोरमे आणि विद्यार्थ्यांमध्ये हुमेरा घारे, सना कारभारी, रोज्मीन कासकर, रुकय्या शिघ्रेकर, तयाबा कडू यांनी मेहनत घेतली. या उपक्रमासाठी आदिवासी वाडीचे प्रमुख गुलाब वाघमारे आणि समीर वाघमारे यांचे सहकार्य लाभले.

# महाड विधानसभेत वाढीव मतदारांवर उमेदवारांची मदार

**। पोलादपूर। वार्ताहर ।**

**२००९ साली पुनर्रचनेनंतर अस्तित्वात आलेल्या महाड विधानसभा मतदार संघामध्ये माणगाव तालुक्यातील काही गावांचा समावेश झाला आणि त्यानंतर निर्णायक मतदार पोलादपूर तालुक्यातील की माणगांव तालुक्यातील अशी चुरशीची परिस्थिती निर्माण झाली. मात्र, या पुनर्रचनेनंतर पोलादपूर तालुक्यातील मतदारांचे निर्णायक वर्चस्व कमी होऊन माणगाव तालुक्यातील वाढलेल्या मतदारांवर उमेदवारांच्या विजयाची भिस्त असल्याचे चित्र मागील तीन विधानसभा निवडणुकांमध्ये दिसून आहे.**

दरम्यान, या १९४-महाड मतदार संघातील विधानसभा निवडणूक २०२४ ची कागदोपत्री सुसज्जता प्रशासनामार्फत करण्यात आली असली तरी दुसरी यंत्रणा राजकीय पक्षांचे आणि उमेदवारांचे कार्यकर्ते राबवित असतात. या विधानसभा निवडणुकीसाठीही प्रशासनाने जय्यत तयारी केली असल्याचे दिसून येत आहे.

माणगाव, महाड व पोलादपूर या तीन तालुक्यातील ३४३ ठिकाणी एकूण ३९३ मतदान केंद्र असून यात शहरी ३० तर ग्रामीण भागात ३६३ मतदान केंद्रांचा समावेश आहे. यापैकी मोबाईलफोनद्वारे संपर्कक्षेत्रात असलेली मतदान केंद्र ३७५ असून मोबाईल आणि लॅण्डलाईन अशा दोन्ही प्रकारे संपर्कात असलेल्या मतदान केंद्राची संख्या १८ आहे.

पोलादपूर तालुक्यात ६ आणि महाड तालुक्यातील महाड विधानसभा मतदार संघाची लोकसंख्या ३ लाख ७३ हजार ७०९ असून यामध्ये मतदार संख्या २ लाख ९२ हजार ७८४ आहे. यातील पीडब्ल्यूडी व्होटर्सची संख्या माणगांवमध्ये ६५० महाडमध्ये ११७० आणि पोलादपूरमध्ये ४८३ अशी एकूण विधानसभा मतदार संघात २३०३ आहे. ८५ वर्षांपेक्षा अधिक वयोमान असलेल्या मतदारांची विधानसभा मतदार संघातील संख्या ६ हजार ८९४ आहे. देशसेवेतील मतदार ४५७ आहे. आखाती देशातील मतदार ४ आहेत.महाड विधानसभा मतदार संघात ३ तालुक्यातील माणगावमधील २९ ग्रामपंचायती, महाडमधील १३४ ग्रामपंचायती तर पोलादपूर तालुक्यातील ४२ ग्रामपंचायतींचा अशा एकूण २०५ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. महाड आणि पोलादपूर अशा नगरविकास खात्यांतर्गत नगरांचा समावेश आहे. ३ तहसिल कार्यालयापैकी ४०४ महसूली गावांचा समावेश आहे. माणगाव ४ महाड ९ आणि पोलादपूर ३ अशा एकूण १६ मंडल कार्यालयांचा समावेश आहे. माणगांव तालुक्यातील १५५, महाड तालुक्यातील २७२ तर पोलादपूर तालुक्यातील १०३ असा एकूण ५३० प्राथमिक शाळांचा समावेश आहे. ७ उच्च माध्यमिक कॉलेज, ५ वरिष्ठ महाविद्यालये तर महाड तालुक्यात एकूण वीर, विन्हेरे, करंजाडी व वामनेसापे अशी ४ रेल्वे स्थानकं आहेत. २०२४ मधील प्रस्तावित लोकसंख्या माणगाव तालुक्यात ५४ हजार ३५४ पुरूष आणि ५२ हजार ९९७ महिला अशी १ लाख ७ हजार ३५० आहे. महाड तालुक्यात १ लाख २५५० पुरूष आणि १ लाख १५९ महिला अशी एकूण लोकसंख्या २ लाख २७०९ आहे. पोलादपूर तालुक्यात ३२ हजार २२७ पुरूष आणि ३१ हजार ४२३ अशी एकूण ६३ हजार ६५० लोकसंख्या आहे. म्हणजेच महाड विधानसभा मतदार संघात १ लाख ८९ हजार १३०पुरूष आणि १ लाख ८४ हजार ५८४ अशी एकूण ३ लाख ७३ हजार ७०९ लोकसंख्या आहे. यापैकी माणगाव तालुक्यात ४४ हजार ७१० पुरूष आणि ४४ हजार ७५० महिला अशी ८९ हजार ४६० मतदारसंख्या आहे. महाड तालुक्यात ७९ हजार ४१८ पुरूष आणि ८० हजार २१३ महिला अशी १ लाख ५९ हजार ६३१ मतदारसंख्या आहे. पोलादपूर तालुक्यात २१ हजार ५६२ पुरूष आणि २१ हजार १३१ महिला अशी एकूण ४३ हजार ६९३ मतदार संख्या आहे. म्हणजेच महाड विधानसभा मतदार संघात १ लाख ४५ हजार ६९० पुरूष आणि १ लाख ४७ हजार ९४ अशी एकूण २ लाख ९२ हजार ७८४ मतदार संख्या आहे.

माणगांवमध्ये महाड तालुक्यात २१३, माणगाव तालुक्यात ११३ आणि पोलादपूर तालुक्यात ६७ अशी एकूण मतदान ३९३ केंद्र असून ३९३ मतदान केंद्र निहाय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. यामध्ये माणगांवमधील ९७ शिक्षक, २ ग्रा.पं.कर्मचारी, ३१ अंगणवाडी सेविका, कृषीसहायक १ आणि २ तलाठी असे ११३ कर्मचारी महाडमधील १०५ शिक्षक, ६५ ग्रा. पं.कर्मचारी, १० अंगणवाडी सेविका, कृषीसहायक ९ आणि २४ तलाठी असे २१३ कर्मचारी तर पोलादपूरमधील ३३ शिक्षक, १८ ग्रा.पं.कर्मचारी, कृषीसहायक ८ आणि ८ तलाठी असे ६५ कर्मचारी तर संपूर्ण महाड विधानसभा मतदार संघामध्ये २१५ शिक्षक, ८५ ग्रा.पं.कर्मचारी, ४१ अंगणवाडी सेविका, कृषीसहायक १८ आणि ३४ तलाठी असे ३९३ कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत.

नोडल ऑफिसर टिम १५, सेक्टर ऑफिसर्स ६१, सेक्टर पोलीस ऑफिसर्स ६१, फ्लाईंग सर्व्हेलन्स टिम ९ पथकांत ३० कर्मचारी, स्टॅटीक सर्व्हेलन्स टिम ९ पथकांत ३० कर्मचारी, व्हिडीओ सर्व्हेलन्स टिम ९ पथकांत ४१ कर्मचारी, व्हिडीओ व्हिवींग टिम १ पथकांत ३ कर्मचारी आणि अकाऊंटींग टिम १ पथकांत १४ कर्मचारी, अशा प्रशिक्षित करण्यात आले असून आवश्यक मनुष्यबळ १९६५ आणि २७१८ डाटा एन्ट्री स्टाफ असे आहे.

# पन्नास खोक्यांची वसुली

दोन वर्षांपूर्वी शिवसेना आणि नंतर राष्ट्रवादी फोडली गेली. या पक्षांचे नेते इडीच्या भीतीने येणार होतेच. पण बाकीच्या पन्नास डोक्यांचा प्रश्न होता. तो खोके देऊन सोडवण्यात आला असे म्हणतात. खोके देणारे पक्के धंदेवाले आहेत. ते व्याजासकट वसुली करून घेणार हे उघड होते. त्यानुसार शिंदे सरकार येताच त्याची वसुली झाली आणि आता त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले आहेत. मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाल्याचा या लोकांचा राग जुना आहे. शिवाय दिल्लीतले सध्याचे नेते हे दीर्घद्वेषी आहेत. ते कितीही वर्षे झाली तरी आपले वैर विसरत नाहीत. त्यानुसार आता उट्टे काढणे सुरू आहे. महाराष्ट्रातील उद्योग प्रकल्प गुजरातेत पळवून नेले जात आहेत. अशाच एक प्रकल्पाचे काल गुजरातेत उद्घाटन करण्यात आले. टाटा आणि एअरबस स्पेन यांच्या संयुक्त भागीदारीतून लष्करी विमाने उत्पादन करण्याचा हा प्रकल्प आहे. मुळात तो नागपूरला व्हायचा होता. नागपूर हे देशाचे मध्यवर्ती केंद्र आहे. यामुळे स्वातंत्र्यानंतर दिल्लीहून राजधानी हलवून देशाच्या मधोमध नागपूरला आणण्याची एक सूचना पुढे आली होती. ती अर्थातच तेव्हा मान्य झाली नव्हती. अलिकडे नागपूरच्या विकासासाठी मिहान प्रकल्पाची कल्पना मांडण्यात आली. विमान कंपन्यांना त्यांची विमाने पार्क करण्यासाठी तसेच त्यांचे सर्व्हिसिंग करण्यासाठी बरीच जागा लागते. त्यादृष्टीने मिहानचा विकास होणार होता. त्यात लष्करी विमानांच्या देखभालीचाही समावेश होता. एअरबसचा प्रकल्पही येथेच करण्याचे घाटत होते. तशी घोषणाही झाली होती. पण मग अचानक दिल्लीहून चाव्या फिरल्या. प्रकल्प गुजरातला गेला. म्हणजेच या प्रकल्पामुळे नागपूरचा जो विकास झाला असता व जो रोजगार निर्माण झाला असता तो गुजरातला पळवून नेण्यात आला. या प्रकल्पात सी २९५ जातीची विमाने तयार होणार असून युध्दक्षेत्रात ७१ सैनिक वा ९००० किलो वजनाचे युध्दसाहित्य वाहून नेण्याची त्यांची क्षमता असेल. कालांतराने या विमानांची निर्यातही होऊ करता येऊ शकेल.

### फॉक्सकॉन, बुलेट ट्रेन

महाराष्ट्रातून गेलेला हा पहिलाच प्रकल्प नव्हे. यापूर्वी इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये वापरली जाणारी चिप तयार करणारा फॉक्सकॉन या कंपनीचा प्रकल्प तळेगावला होणार होता. तोही गुजरातमध्ये नेण्यात आला. मुंबईतील वित्तीय व्यापारी केंद्र, हिरेबाजार हेही मोदींच्या गृहराज्यात नेले गेले. मुंबईचे महत्व होता होईल तो कमी करायचे असा हा डाव आहे. मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचा प्रकल्पही त्यासाठीच आकाराला येत आहे. मुख्यतः गुजराती व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी ही ट्रेन आहे. मराठी जनतेची गुजरातमध्ये कोणत्याच कारणास्तव ये-जा नाही. काही लोक पक्ष फोडून सुरतेला पळून जातात ते वेगळे. त्यातही सुरत हे ठिकाण भाजपला सोईचे होते म्हणून ते निवडले गेले हे लक्षात ठेवायला हवे. असो. मुद्दा असा की, बुलेट ट्रेनचा मराठी जनतेला शून्य उपयोग आहे. राज ठाकरे जेव्हा पाच वर्षांपूर्वी भाजपचे आणि मोदींचे व्हिडियो लावत आणि टीका करीत फिरत होते तेव्हा त्यांनी बुलेट ट्रेनला याच कारणास्तव विरोध केला होता. आता भाजपसोबत गेल्याने त्यांचीही बोलती बंद झाली आहे. शिंदे-फडणवीस-पवार यांच्याकडून तर महाराष्ट्राचे आणि मराठी माणसाच्या हिताचे रक्षण करण्याची अपेक्षा करणेच मूर्खपणाचे आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या दहा वर्षात महाराष्ट्रात नवीन औद्योगिक रोजगारांमध्ये कमालीची घट झाली आहे. नवीन उद्योगांच्या घोषणा शिंदे सरकार करते. पण जनतेला त्याबाबत अजिबात विश्वासात घेतले जात नाही. रायगडमध्ये बल्क ड्रग्ज प्रकल्प, सिंधुदुर्गातील नाणार ही त्याची उदाहरणे होत. अलिबाग-विरार रस्ता किंवा मुंबई-गोवा सागरी मार्ग असे रस्ते प्रकल्पही छुप्या रीतीने लादले जातात. यात जमिनी हडपण्याचा व काही मोजक्या लोकांचा फायदा करून देण्याचा इरादा दिसतो. दुसऱ्या बाजूने मुंबईची पुरती वाट लावण्याचेही धोरण आखलेले दिसते. धारावी पुनर्विकासाच्या नावाखाली अदानीची भर करण्यात येणार असून इतके दिवस सुरक्षित ठेवलेल्या मिठागरांच्या जमिनी त्याच्यासाठी खुल्या करण्यात आल्या आहेत.

### महाराष्ट्रावर सूड

नरेंद्र मोदी नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात महाराष्ट्रात प्रचाराला येतील. त्यावेळी ते दहा सभा घेणार आहेत असे म्हणतात. लोकसभेला त्यांनी १९ सभा घेतल्या होत्या. तरीही महायुतीवाले दणकून आपटले होते. मोदींना मराठी जनता फार भाव देत नाही हे लक्षात आल्यावर आता सभा एकदम कटाप करून टाकण्यात आल्या आहेत. या सभांमध्ये मोदी विकास वगैरेंच्या बाता करतील. पण प्रत्यक्षात त्यांच्या दहा वर्षांच्या राजवटीमध्ये महाराष्ट्राला पध्दतशीर खच्ची करण्यात आले आहे. या मंडळींकडून खोके घेतलेल्यांना आपल्या स्वार्थापलिकडे काही दिसत नाही. महाराष्ट्राची वाट लागली तरी त्यांना पर्वा नाही. मध्यंतरी अदानीच्या सेमी कंडक्टर प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. या ८५ हजार कोटींच्या प्रकल्पातून १५ हजार नोकऱ्या मिळतील असा गाजावाजा करण्यात आला. पण या प्रकल्पाला अजूनही केंद्राची मान्यता नाही. मोदी-शाह यांच्या मनात आले तर हा प्रकल्पही गुजरातला जाऊ शकतो. अदानी तर काय गुजरातचेच आहेत. ते केवळ धंद्यासाठी महाराष्ट्रात आलेले आहेत. सेमी कंडक्टर उद्योगांना पन्नास टक्के सबसिडी केंद्र सरकार देते. म्हणजे यातले ४२ हजार कोटी केंद्राचेच असतील. त्यातून केवळ १५ हजार रोजगार निर्माण होणार असतील तर प्रत्येक रोजगार निर्माण होण्यासाठी तीन कोटी रुपये मोजावे लागतील असा त्याचा अर्थ होतो. हा पैसा जनतेच्या खिशातूनच जाणार आहे. इतका प्रचंड पैसा खर्च करून मर्यादित रोजगार निर्माण करणे हे आपल्याला परवडणारे नाही. दुर्दैवाने आपल्या निवडणूक प्रचारात या गोष्टींची चर्चा फारच क्वचित होताना दिसते. खोकेवाल्यांना तर केवळ लाडकी बहीणसारख्या योजनांची जाहिरातबाजी करून मते मिळवायची आहेत. पण त्यांच्या या राक्षसी महत्वाकांक्षेमुळे महाराष्ट्र खंक आणि कंगाल होण्याच्या वाटेवर आहे. खोके दिलेले लोक त्याची वसुली करून महाराष्ट्रावर वेगवेगळ्या रीतीने सूड उगवू पाहत आहेत.

विचार

# दिवाळीची खरेदीयात्रा

***प्रकाशपर्वाचे स्वागत करताना, संपन्नतेची कवडे खुली होत असताना आपल्याही घरात आवडत्या गोष्टींची रेलचेल असावी हा विचार ग्राहकांना बाजारपेठेकडे खेचून आणतोच. मात्र यंदा खरेदी करताना पूर्वनिरीक्षण, स्पर्धकांच्या किमतीचा अंदाज घेणे, स्किम्सच्या जंजाळात न अडकता थोडे जास्त पैसे मोजून आवडत्या वा ठरवलेल्या कंपनीची उत्पादने खरेदी करणे याकडे ग्राहकांचा झुकता कल दिसत आहे.***



**स्वाती पेशवे**

दिवाळीचा उत्साह द्विगुणीत करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. दिवाळी म्हणजे सणांची महाराणी. भारतीय परंपरेमध्ये साधारणत: दर महिन्याला सणावारांची रेलचेल असली तरीही दिवाळी ती दिवाळीच! एरवी वर्षभर खरेदी होत असली तरी दिवाळीच्या निमित्ताने होणाऱ्या खरेदीला संपन्नतेचे काही वेगळेच कोंदण असते. ही खरेदी दाराच्या तोरणाबरोबरच बाजारपेठांमधील झगमगाटाने आणि तेथील आकर्षक सजावटीने प्रसन्नतेमध्ये लाखमोलाची भर घालते. थोडक्यात, रोजच्या शिऱ्यामध्ये आणि प्रसादामध्ये असतो तोच फरक नित्याच्या आणि दिवाळीनिमित्त होणाऱ्या खरेदीत असतो असे म्हणता येईल. म्हणूनच प्रत्येक दिवाळी नाविन्यमयी तशीच प्रत्येक दिवाळीचा बाजारही वैविध्याने भरलेला. चला तर, या दिवाळीत बाजाराचा नूर काय सांगतो, सूर कसा लागतो हे बघू या.

आताची वेळ समस्त भारतीयांच्या खरेदीच्या उन्मादाची आहे. स्वाभाविकच दरवर्षीप्रमाणे आताही बाजारात ग्राहकांची लगबग वाढलेली दिसते आहे. दिवाळीदरम्यान ग्राहकांच्या वर्तनाचे मुख्य ट्रेंड समजून घेणे प्रत्येक व्यवसायासाठी महत्त्वाचे असते. हा अभ्यास बाजाराबरोबर समाजातील बदलत्या प्रवाहाचे चित्रही समोर मांडतो. त्या अनुषंगाने बघता लक्षात येते की, भारतात ९१ टक्के ग्राहक आता ऑनलाईन खरेदी करतात. त्यामुळेच ग्राहकांना घरबसल्या वा फावल्या वेळेत खरेदीची मुभा देण्यासाठी आणि समाधान वाढवण्यासाठी मोबाइल पेमेंट पर्याय आणि ऑप्टिमाइझ केलेल्या ॲप्सच्या गरजेवर भर देण्यात येत आहे. मोबाइलकेंद्रित ई-कॉमर्सच्या वाढत्या ट्रेंडसह व्यवसायांना अखंड मोबाइल खरेदीचा अनुभव देणे आता आवश्यक आहे. फॅशन, ऑटोमोबाईल आणि कन्ज्युमर इलेक्ट्रॉनिक्स यासारख्या विविध क्षेत्रातील आकर्षक ऑफर आणि सवलतींमुळे दिवाळीच्या खरेदीमध्ये ग्राहकांच्या खर्चात २०-२५ टक्के वाढ होते. याव्यतिरिक्त भारतीय रिटेल क्षेत्राच्या अहवालानुसार ऑगस्ट ते डिसेंबर हे सणासुदीचे महिने वार्षिक विक्रीमध्ये अंदाजे ३०-४० टक्के योगदान देतात, जे व्यवसायांसाठी या कालावधीचे महत्त्व अधोरेखित करतात. ऑनलाइन खरेदीकडे ग्राहकांचा कल वाढल्यामुळे व्यवसायांना या व्यस्त हंगामाचा फायदा घेण्यासाठी डिजिटल मार्केटिंग प्रयत्न वाढवणे गरजेचे ठरले आहे. सणासुदीच्या हंगामासाठी प्रभावी धोरणे तयार करण्यासाठी, यासंबंधी व्यवसायांना मार्गदर्शन करण्यासाठी फॅशन, ऑटोमोबाईल आणि ग्राहक तंत्रज्ञान क्षेत्रातील अंतर्दृष्टीवर लक्ष केंद्रित करून दिवाळीच्या नवीनतम ट्रेंडची रूपरेषा ठरवली जात असल्याचे दृश्यही यंदा बघायला मिळत आहे.

यंदाच्या दिवाळीत इलेक्ट्रिक वाहनांच्या दिशेकडे झुकणारा ओढा लक्षणीय म्हणावा लागेल. विशेषत: सणासुदीच्या काळात टिकाऊपणा आणि कनेक्टिव्हिटी हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवून खरेदी होताना दिसत आहे. भारतीय किरकोळ उद्योगाने फॅशन आणि दागिन्यांच्या विक्रीत यंदा २०-२५ टक्के वाढ नोंदवली असून पारंपरिक आणि आधुनिक डिझाइन्सचा संगम साधणारी दागिन्यांची श्रेणी ग्राहकांना आकर्षित करताना दिसत आहे. याव्यतिरिक्त तंत्रज्ञानावर आधारित सामग्रीच्या खरेदीमध्ये ३० टक्के वाढ नोंदवली गेली आहे. यातूनच गॅझेट्स आणि स्मार्ट होम डिव्हाइसेसचा वाढता वापर स्पष्ट होतो. या खरेदीवर उत्सवाचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो आहे. दिवाळीमध्ये स्वत:साठी खरेदी होते तशीच आप्तस्वकियांसाठीही मोठ्या प्रमाणावर खरेदी होते. स्वाभाविकच ग्राहक भेटवस्तूंच्या खरेदीकडे मोर्चा वळवतात. यात खाद्यपदार्थ, गृहसजावट, फॅशन आणि जवळपास सर्व प्रकारच्या शॉपिंगमध्ये मोठी उलाढाल अनुभवायला मिळते. आपापले बजेट आणि आवडीनुसार ग्राहकवर्ग आपली भेटवस्तू आकर्षक करण्याच्या प्रयत्नात दिसतो. ही बाबही लोक सणाचा अनुभव सामायिक करण्यास उत्सुक असल्याचे अधोरेखित करुन जाते.

दिवाळी हा दिव्यांचा सण असल्यामुळे दिव्यांचे नानाविध प्रकार भेटवस्तू म्हणून खरेदी करण्याकडे वाढता कल दिसत आहे. त्यासाठी अगदी साध्या धातूपासून चांदी वा त्यासारख्या मौल्यवान मिश्र धातूंच्या आकर्षक दिव्यांची मोठी रेंज बाजारात उपलब्ध आहे. सजावटीचे आकर्षक वेष्टन, मिठाई, पणत्या, रांगोळी आणि आकाशदिवे यासह ते सहर्ष भेट देण्याचा ट्रेंड वाढताना दिसत आहे. त्यातही पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याप्रती जागरुकता निर्माण झाल्यामुळे भेटवस्तू निवडताना हे भान राखले जात आहे. अनेक लोक एलईडी दिवे, नैसर्गिक रांगोळी आणि बायोडिग्रेडेबल सजावट निवडतात. भेटवस्तूंची देवाणघेवाण वैयक्तिकृत वस्तूंवरही लक्ष केंद्रित करते. नेहमीप्रमाणे यंदाही विविध प्रकारच्या चॉकलेट्सना मोठी मागणी दिसते आहे. खेरीज दुकानातील खरेदी करण्याबरोबरच कारागिरांकडून मिठाई तयार करण्यासही मोठी पसंती मिळताना दिसत आहे. एकंदरच तेलाचे दिवे लावणे, पूजा करणे आणि पारंपरिक पोशाख परिधान करणे यासारख्या जुन्या पद्धती केंद्रस्थानी येऊ लागल्याचा स्पष्ट प्रभाव यंदाच्या साजरीकरणावर आणि खरेदीवर स्पष्ट दिसतोय. उत्सवाला मिळणारे हे सामुदायिक महत्त्व समाजाला नव्या जाणीवेने आणि प्रेरणेने एकत्र आणणारे आहे. म्हणूनच परंपरा आणि आधुनिकतेचे हे मिश्रण दिवाळी साजरे करण्याचे गतिशील स्वरूप प्रतिबिंबित करते, असेही आपण म्हणू शकतो.

सध्या बरेच वापरकर्ते इन-स्टोअर खरेदीला प्राधान्य देताना दिसत असले तरीही ते खर्चाच्या सवयींप्रती खूपच संवेदनशील आणि सावध असल्याचे निरीक्षणही तज्ज्ञ नोंदवतात. ग्राहक खरेदी करण्यापूर्वी बचतीला प्राधान्य देत असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. एकूणच आर्थिक नियोजन आणि पैशाचे मूल्य यावरचा वाढता भर सूचित करतो की व्यवसायांनी एक मल्टी-चॅनल मार्केटिंग धोरण अवलंबणे गरजेचे आहे. यामध्ये आकर्षक ऑनलाइन जाहिराती आणि विक्री धोरणांसह आकर्षक फायद्यांचे चित्र समोर मांडणे गरजेचे आहे. यामुळे पारंपरिक खरेदीदार आणि बजेटच्या बाबतीत ठाम भूमिका असणारे ग्राहकही हात मोकळा सोडून खरेदी करण्यास प्रवृत्त होतील.

वापरकर्त्यांच्या खरेदी आणि खर्च करण्याच्या सवयींबाबत बोलायचे तर ऑनलाइन खरेदीला प्राधान्य देणाऱ्यांची संख्या २८.७ टक्के इतकी दिसत असून दुकानात खरेदी करायला आवडत असल्याचे मत ३५.६ टक्के ग्राहकांनी नोंदवले आहे. कोणत्याही विक्री योजनेच्या गुंत्यामध्ये वा प्रलोभनांमध्ये न अडकता कोणतेही उत्पादन पूर्ण किंमतीत खरेदी करण्यास प्राधान्य असण्याचे मत ६४.४ टक्के ग्राहकांनी नोंदवले आहे तर काहींनी चांगल्या ऑफरसाठी वाट पाहणे योग्य असल्याचे म्हटले आहे. अशांना विक्रीसाठी थोडी प्रतीक्षा करण्यास काहीही वावगे वाटत नाही. सध्याच्या महागाईच्या काळात घेतलेल्या प्रत्येक वस्तूचे योग्य पद्धतीने जतन करा आणि उत्पादन खरेदी करण्याआधी त्याचा परिपूर्ण होणार असल्याची खात्री करा, असे २४.६ टक्के ग्राहकांचे म्हणणे आहे. त्वरीत उत्पादने खरेदी करण्यासाठी इतर खर्चाचा त्याग करण्याची तयारी दाखवणाऱ्या ग्राहकांचीही संख्या मोठी आहे.

यंदाच्या सणासुदीच्या काळात दिवाळी थीम असणाऱ्या सामग्रीच्या व्ह्यूजमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचेही बाजाराचा आढावा घेताना लक्षात येते. वापरकर्त्यांना दिवाळीसारख्या सणानिमित्त सजणाऱ्या प्रमुख खरेदी हंगामात काय खरेदी करण्यात स्वारस्य आहे याची स्पष्टता असल्याचेही दिसते आहे. बाजारात फेरफटका मारताना याचीही झलक दिसते. त्यामुळेच कपडे आणि पोशाख खरेदीदारांच्या सर्वोच्च स्थानावर असताना स्मार्टफोन वापरकर्ते आवडीच्या बाबतीतही आघाडीवर असल्याचे दिसत आहे. जवळच्या प्रतिस्पर्धीकडून लॅपटॉप कमी किमतीत मिळत असला तरी ब्रँडबाबत आग्रही असणारा वर्ग अधिक रक्कम मोजून आपल्या आवडत्या कंपनीची गॅझेटस खरेदी करताना दिसतोय.

एका अभ्यासानुसार दिसून आले आहे की ६४ टक्के ग्राहक अजूनही सुट्टीसाठी टेक गॅझेट खरेदी करण्याची योजना आखत आहेत. दूरस्थ काम आणि व्हर्च्युअल कम्युनिकेशनमध्ये या खरेदीवर भर दिला जाताना दिसत आहे. यंदा मनोरंजन आणि कनेक्टिव्हिटी प्रदान करणाऱ्या उपकरणांची मागणीही वाढली आहे. महागाई आणि आर्थिक अनिश्चितता असूनही ग्राहक सणासुदीच्या काळात तंत्रज्ञान खरेदीला प्राधान्य देतात.

आर्थिक परिस्थिती ग्राहकांना अधिक सावध बनवू शकते, परंतु प्रीमियम उत्पादनांमध्ये गुंतवणूक करण्याची इच्छादेखील लक्षणीय आहे. ३२ टक्के वापरकर्ते उत्पादनांच्या प्रीमियम आवृत्त्या खरेदी करण्यास प्राधान्य देतात आणि ६५ टक्के उत्पादने खरेदी करण्यापूर्वी ऑनलाइन संशोधन करतात. ही बाबही मूल्यचालित आणि गुणवत्तासजग खरेदी व्यवहारांचे मिश्रण प्रतिबिंबित करणारी आहे. एकंदरीत, या काळात ग्राहक तंत्रज्ञानाच्या बाजारपेठेतील मजबूत मागणी काम, दळणवळण आणि करमणुकीसाठी तंत्रज्ञानावरील सततच्या अवलंबनावर प्रकाश टाकते. यामुळे विश्वासार्ह, उच्च-गुणवत्तेच्या उपकरणांची गरज वाढते.

आजकाल

# 'बटेंगे तो कटेंगे' चे मूर्ख मेसेजस

**विश्वंभर चौधरी**

लोक पागल झाले आहेत. दररोज दोन पाच व्हीडीओ आणि पोस्ट्स पाहण्यात येत आहेत ज्यात अमका फळविक्रेता, तमका ज्यूस वाला मुसलमान आहे, त्याच्याकडून काही घेऊ नका. तमक्या ठिकाणी मुसलमान तुमच्या पाणीपुरीत गटाराचं पाणी टाकतो वगैरे येतंच येतं. बटेंगे तो कटेंगे हे तर दिवसाला पाच सात वेळा पाहतो.

या पोस्ट्स चवीनं फॉर्वर्ड करणारे (तथाकथित) सुशिक्षत असतात. या बिनडोकांच्या पदव्या बोगस असल्या पाहिजेत यांच्या देवासारख्याच.

यांच्या मनात प्रश्नच येत नाहीत कारण स्वतःच्या बुद्धीचा वापर यांनी थांबवलेला आहे आणि विचार करण्याचं काम एका नीच सोशल मिडीया सेलला यांनी केलेलं आहे. ती घाणेरडी मिडीया सेल जे यांना फॉर्वर्ड करेल ते बिनडोकासारखे दिवसभर इकडे तिकडे ढकलत बसतात.

हे खरंच शिकलेले असते तर यांच्या मनात खालील प्रश्न आले असते:

१. हे आत्ताच म्हणजे महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणूक काळातच का येतंय?

२. या देशात हिंदू ८५ टक्के असतांना हिंदू बटेंगे तो कटेंगे इतकी विदारक स्थिती असेल तर दिल्लीत मोदी-शहा आणि महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस फक्त खुर्ची उबवत आहेत का? हिंदूंची सुरक्षा यांच्या दहा वर्षांच्या काळात एवढ्या वाईट अवस्थेला कशी पोचली?

३. काँग्रेसच्या सत्तर वर्षांच्या काळात बटेंगे तो कटेंगे म्हणायची वेळ आली नव्हती म्हणजे काँग्रेसच सुशासन देऊ शकते असं नाही का?

४. माझ्या स्वतःच्या आयुष्यात व्यक्तिशः मुसलमानांचे वाईट अनुभव मला स्वतःला किती आले?

५. ज्याला स्वतःचा माल विक्री करून पोट भरायचं आहे तो पाणीपुरीत गटाराचं पाणी टाकून स्वतःचं दुकान बंद करेल का? राजरोसपणे गटाराचं पाणी पाणीपुरीत टाकलं जात असेल तर शिंदे-फडणवीसांचं अन्न व नागरी पुरवठा खातं घोरत पडलंय का मंत्रालयात?

७. इतकं सगळं अराजक जर बाहेर रोज घडत आहे आणि तुमचं सरकार असून तुम्हाला हे पहावं लागतंय तर तुम्ही मोदी-शहा, शिंदे-फडणवीसांना सत्तेतून काढलं पाहीजे. कशाला पुन्हा पुन्हा त्यांनाच मत देताय?

८. बरं समजा फळविक्रेता हिंदू असला तरी त्याला सप्लाय करणारा मुस्लीम बागवान असेल किंवा फळंच मुस्लीमाच्या शेतातून आली असतील तर घेतलेली फळं फेकून देणार आहेत का हे लोक?

१०. अन्नधान्याचं काय करणार आहात? ते कोणाच्या शेतात पिकलं याची शहानिशा कशी करणार? अन्नधान्य, मसाले, भाज्या सगळं खाणंच सोडा. ते मुसलमानाच्या शेतातलं असूच शकतं. पेट्रोल, डिझेल सोडा. ते सगळं मुस्लीम राष्ट्रांमधून येतं. गाड्या नका वापरू. औषधं देऊ नका मुस्लीम मालक असलेल्या कंपनीची असं सांगणार आहात का आयसीयूमध्ये असतांना?

९. एवढया शंका कुशंका असतील तर निर्धार करा ना की स्वतःच्या गॅलरीत उगवेल तेच खाईन! तर शून्य आहे तुमची स्वतःची, शेतीतलं ढेकळं काही कळत नाही, फळ झाड कसं लावायचं तेही माहीत नाही. शिका स्वतः आणि करा स्वतःच स्वतःचं उत्पादन. नाहीतर आयतं मिळतंय पैसे देऊन त्याला उगाच गालबोट का लावायचं?

१०. आपण सुशिक्षित असून ज्या पोस्टखाली लेखक स्वतःचं नाव सुद्धा लिहीत नाही त्या पोस्टवर कोणी लिहीलं? का लिहीलं? कधी लिहीलं? फॉर्वर्ड करणाराची विश्वासार्हता काय? या फॉर्वर्डमधून कोणाच्या हितासाठी विष भरणं चाललंय असे प्रश्नही आपल्याला पडत नाहीत? तुम्हाला नसेल कळत तर करा ना! बीबीसीसह अनेक विश्वासार्ह माध्यमांनी ती सोय केलीय. तेवढं तरी करून बघा गुगल मध्ये जाऊन!

२०१४ नंतर या देशात बोगस पदवीवाल्यांचा सुळसुळाट झालेला आहे. या अशा द्वेषयुक्त पोस्ट्स फॉर्वर्ड करणारांच्या पदव्या देखील तपासल्या पाहिजेत. असे बिनडोक सुशिक्षित तयार होऊ नये असं वाटत असेल तर शिक्षण व्यवस्थेत मोठी सुधारणा करायला हवी. कृपया हा मेसेज फॉर्वर्ड करा. हा मेसेज तुम्हाला दररोज असे फॉर्वर्ड करून काव आणणाऱ्या किमान पाच बिनडोकांना पाठवला तर तुम्हाला त्याचं 'फळ' मिळेल! या देशातून ही विद्वेषाची घाण संपेल.काका आत्ताच भेटले. मला म्हणाले 'ते बटेगा तो कटेगा चे माझे मेसेजेस येतात का तुम्हाला'?

मी म्हणालो 'हो काका येतात पण हिंदू 'बटायला' नको असेल तर सगळ्या हिंदूंना सरसंघचालक व्हायची संधी मिळायला पाहिजे. एकाच जातीचे हिंदू कसे काय सरसंघचालक होतात'? 'आलोच पाच मिनीटांत' असं सांगून काका गायब झाले. मी तासभर वाट बघून घरी परत आलो शेवटी.

विशेष

## आता ओटीपी होणार कालबाह्य

भारतात ऑनलाईन पेमेंट करण्याची पद्धत खूपच लोकप्रिय झाली असून भारतातल्या ग्रामीण भागातही सर्वसामान्य झाली आहे. ऑनलाईन व्यवहार करतानाची 'वन टाइम पासवर्ड' अर्थात 'ओटीपी' पद्धतही सर्वांना माहित झाली आहे. परंतु ऑनलाईन व्यवहार जसजसे वाढत गेले तसतसे सायबर चोरांकडून ओटीपी हॅक करून ग्राहकांना टोपी लावण्याचे प्रकार वाढत गेले. सायबर चोरांकडून अनेकांना कोट्यवधींचा चुना लावण्यात आला. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आकडेवारीनुसार ओटीपी वापरण्यास सुलभ असूनही, कार्ड आणि ऑनलाईन पेमेंट फसवणुकीत भारतात ७०० टक्क्यांपेक्षाही अधिक वाढ झाली आहे आणि त्यामुळे गेल्या दोन वर्षांत फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये तब्बल ३०० टक्के इतकी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत ऑनलाईन व्यवहार, फसवणूक आणि घोटाळ्यांपासून अधिक सुरक्षित होण्यासाठी पारंपारिक पासवर्ड आणि ओटीपी बदलून त्याऐवजी फिंगरप्रिंट्स (बोटांचे ठसे) किंवा चेहऱ्यांचे स्कॅन अशा बायोमेट्रिक प्रमाणीकरण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. या संदर्भात मुंबईतील ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये 'मास्टरकार्ड'चे मुख्य उत्पादन अधिकारी जॉर्न लॅम्बर्ट यांनी या नवीन बायोमेट्रिक पद्धतीचे सादरीकरण केले.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**३० ऑक्टोबर**

१८९८:- इतिहास आणि इतिहासषास्त्र यांचे गाढे अभ्यासक, लेखक, सूचीकार, संपादक आणि महाराष्टांतील ग्रंथालय चळवळीचे एक प्रवर्तक दिनकर विनायक काळे यांचा जन्म. 'इतिहासशास्त्र व तवज्ञान' हा विवेचनपर ग्रंथ, शिवचरित्र आणि मराठी नियतकालिकांची सूची' सारख्या प्रकल्पांची पूर्तता, हे त्यांचे अनुकरणीय कार्य होते. **१९३०:-** समीक्षक आणि लोकसाहित्याचे संशोधक गंगाधर नारायण मोरजे यांचा जन्म. 'मराठी लावणी वाङ्:मय', 'रामजोशीत लावण्या', 'शाहीर परशुराम', 'शाहिरी वाङ्:मय', 'इतिहास व लोकसाहित्य', 'ख्रिस्ती मराठी वाङ्:मय' आदी पुस्तके लिहिणारे प्रा. मोरजे जुलै २००५ मध्ये निवर्तले. **१९३८:-** लेखक, संस्कृतचे जाणकार डॉ. रविंद्रनाथ वामन रामदास यांचा जन्म. ह्यांनी 'छत्रपति शिवाजी महाराज पत्ररुप व्यक्तिदर्शन', 'सागरी सत्तेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज' ह्या ग्रंथासह 'मराठ्यांचे सागरी प्रदेषावरील सीमोल्लंघन', 'महाराष्ट्रांचे जलदुर्ग', 'शहाजी राजे भोसले' यांचे चरित्र, अशी ग्रंथ संपदा. **१९४८:-** कवी हेमंत गोविंद जोगळेकर यांचा जन्म. रासायनिक अभियांत्रिक शाखेतील बी. टेकची पदवी संपादन करणाऱ्या जोगळेकरांची 'होड्या' हा पहिला काव्यसंग्रह. तसेच 'माझा १४ पण १२ बेह नाममात्र घोडा' हा विडंबन कवितांचा संग्रह प्रसिध्द. त्यांची 'मनातले घर' या काव्यसंग्रहातील कविता स्त्री पुरुषांच्या नात्याकडे वेगळ्या आणि आधुनिक दृष्टीने पाहिले असल्याने हा संग्रह वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. **१९६०:-** लेखक ॲड गोविंद भेंडारकर यांचा जन्म. पेशाने वकील यांच्या साहित्यसंपदेत 'आक्रोश' हे चरित्र तसेच 'भानामती शोधायची कशी?', 'बुवाबाजी व कायदा', 'गोदेखुर्द प्रकल्पाची पंचविशी' हे माहितीपर ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. **१९९६:-** मराठी साहित्याला पांढरपेशी परंपरेतून वेगळा धक्का देणारे लेखन करणारे लेखक प्रभाकर नारायण तथा भाऊ पाध्ये यांचे निधन. पत्रकारिता करणाऱ्या भाऊंचे कामगार चळवळीशीही जवळचे नाते होते. 'डोंबाऱ्याचा खेळ' ही त्यांची पहिली कादंबरी गाजलेली कादंबरी. त्यानंतर कामगार चळवळीवर बेतलेली होती. मुंबईतील टवाळकी करणाऱ्या नाक्यावरच्या मुलांचे भावविश्व रंगवणारी 'वासूनाका' ही त्या ंची गाजलेली कादंबरी. त्यानंतर 'वैतागवाडी', 'बॅरिस्टर अनिरुध्द धोपेश्वरकर अग्रेसर','राडा', 'होमासिक ब्रिगेड', 'वणवा','वॉर्डन ं.७','सर्जिकल', 'जेलबर्डस्' अशा एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. याशिवाय 'ऑपरेशन छक्का' हे नाटक आणि 'एक सुनहरा ख्याब', 'मूर्गी', 'थालिपीठ', 'थोडीसी जो पी ली' हे कथासंग्रह. अशी त्यांची साहित्यसंपदा. **१९९८:-** मोजकेच, परंतु महत्त्वाचे लिखाण करणारे विश्राम चिंतामण बेडेकर यांचे निधन. 'ब्रकुमारी', 'नरो वा कुंजरो वा', 'वाजे पाऊल आपुले', 'टिळक आणि आगरकर' ही नाटके, 'रणांगण' ही कादंबरी आणि पत्नी मालताबाई बेडेकर १४ विभावरी शिरुरकर१२ यांना लिहिलेली 'सॉलिस बर्गची पत्रे' या पुस्तकांखेरीज त्यांनी लिहिलेल्या 'एक झाड दोन पक्षी' या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे १४ मुंबई १९८६ ते अध्यक्ष होते.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# दिवाळी दारात, शेतकरी शिवारात

## पाऊस गेल्याने भातकापणीच्या कामांची लगबग

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

मागील तीन दिवसांपासून मान्सूनने परतीच्या प्रवासाचे स्पष्ट संकेत दिल्याने वातावरण मोकळे झाले आहे. पावसाने माघार घेण्यास सुरुवात केल्यामुळे आता शेतकरी भात कापणीला शेतात उतरला आहे. सध्या शहरासह तालुकाभरात 'दिवाळी दारात आणि शेतकरी शिवारात' असे चित्र निर्माण झाले आहे.

ऑक्टोबरच्या शेवटच्या टप्प्यात जोरदार पावसाने शेतकऱ्यांच्या आशा संपुष्टात आणल्या होत्या. मात्र, आता पाऊस थांबल्यामुळे भातपीक कापणीची शेतकऱ्यांनी लगबग सुरू केली आहे. यावर्षीचा मान्सून हंगाम अपेक्षेपेक्षा जास्त कालावधीपर्यंत लांबला. सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात मान्सून माघार घेईल, अशी शक्यता असतानाच गणेशोत्सवापासून सुरू झालेल्या



मान्सूनने ऐन दिवाळीच्या उंबरठ्यापर्यंत हजेरी लावली. त्यामुळे कापणीसाठी तयार झालेले भातपीक शेतकऱ्यांना कापणी करण्यास अडथळा येऊ लागला.

पावसामुळे अनेक ठिकाणच्या शेतात पाणी साचले, तर सोबतच्या वाऱ्यामुळे काही ठिकाणची भातशेती पाण्यातच आडवी झाली. त्यातच जंगली प्राण्यांचा त्रास, लांबलेला पाऊस अशा एकूणच कचाट्यात शेतकरी सापडला होता. दरम्यान, नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करावे, अशी मागणी झाली. ऑक्टोबरच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पडलेल्या पावसाने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. मात्र, आता पाऊस थांबल्यामुळे कोरडे वातावरण आणि उन्हाचा फायदा घेत शेतकरी सकाळपासूनच भातकापणीसाठी शेतात जाऊ लागला आहे. कापलेले भात सुकवून ऐन दिवाळीपर्यंत मळणी काढण्याच्या विचारात शेतकरी आहे.

# भातकापणीसाठी वाढत्या मजुरीने शेतकरी चिंताग्रस्त

**। खरोशी । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील १२हजार ४०० हेक्टर वरील भातशेती कापणीस तयार झाली असून, तालुक्यातील भातशेती कापण्यासाठी मजुरांच्या घरापर्यंत शेतकरी जात असल्याने मोठ्या संख्येने येणाऱ्या आदिवासी मजुरांना विनवण्या करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे कापणीसाठी ८०० रुपये जेवण, उतार खर्च यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे. तर, दुसरीकडे मजुरांची दिवाळीच दिवाळी सुरु झाली आहे.

यावर्षी उत्तम भातशेती आली असताना सतत पडणाऱ्या पावसाने भातशेती वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. तालुक्याच्या ठिकाणी मजुरांची टंचाई निर्माण झाली, त्यामुळे चढ्या भावाने मजुरांना घेऊन जावे लागत आहे. पहाटे ४ ते ५ वाजता शहरातील नगरपालिका नाक्यावर येऊनदेखील मजूर मिळत नसल्याने रिकाम्या हाताने माघारी जावे लागत आहे. तर, दुसरीकडे शेतकऱ्यांनीच मजुरांचे दर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये भांडणे निर्माण होत असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, वाढत्या मजुरीमुळे शेतकरी पूर्णतः मेटाकुटीला आला असून, भाताच्या उत्पन्नापेक्षा खर्चच जास्त होत असल्याने बळीराजाला शेती नकोशी झाली आहे. दिवसेंदिवस मजुरांचा प्रश्न निर्माण होत असून, बहुतेक शेतकरी शेतीकडे पाठ फिरवताना दिसून येत आहे. त्यामुळे ठिकठिकाणी भातशेती ओसाड पडू लागली आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० ऑक्टोबर
१) श्री.दिलीप श्रद्धानंद म्हात्रे
अलिबाग, ३०-१०-१९५२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# ऐन दिवाळीत ४० गावे अंधारात

## ■ महावितरणचा भोंगळ कारभार उघड

**। खेड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील खाडीपट्टा विभागात महावितरणच्या भोंगळ कारभाराचा फटका ४० गावांतील ग्रामस्थांना बसला. खाडीपट्ट्यातील ४० गाव सलग पाच दिवस अंधारात होती. वीजपुरवठा सुरू करण्याबाबत सातत्याने तक्रारी करूनही ८२१६;महावितरण८२१७;चे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे महावितरणच्या खाडीपट्ट्यातील शाखा अभियंत्याच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणीही होत आहे.

तालुक्यातील विभागातील मूळगाव महावितरणचे उपकेंद्र आहे. लोटे येथून आयनीमार्गे व आमशेत येथून मूळगाव उपकेंद्राला वीजपुरवठा केला जातो; मात्र कोणतेही कारण नसताना खाडीपट्ट्याला होणारा वीजपुरवठा लोटे औद्योगिक वसाहतीला देण्याचे काम शाखा अभियंता बडगुजर यांनी केल्याचा आरोप माजी सरपंच संजय गोळटकर यांनी केला आहे. त्यामुळे ४० गावांतील ग्रामस्थांना सलग पाच दिवस अंधारात राहावे लागले. वीज नसल्याने त्याचा परिणाम नळपाणी योजनाही बंद होत्या. महावितरणच्या भोंगळ कारभाराचा खाडीपट्ट्यातील दुकान व्यावसायिकांनाही आर्थिक फटका बसला आहे.

# आरसीएफतर्फे अलिबाग पोलिस कार्यालयाला संगणक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ)थळ तर्फे उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय अलिबाग येथे दोन संगणक मंगळवारी ( दि. २९) पुरविण्यात आले. आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने वाढीव दैनंदिन कामकाजाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने अलिबाग पोलिस ठाण्याला संगणकांची तातडीने आवश्यकता होती. संगणक आरसीएफ कडून



उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी अलिबाग पोलीस ठाण्याने केली होती . २६ ऑक्टोबरला प्राप्त झालेल्या पत्रानुसार सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संगणकांची निकड लक्षात घेऊन आरसीएफ व्यवस्थापनाने कार्यालयीन वापरातले दोन संगणक अलिबाग पोलिस ठाण्यासाठी त्वरित उपलब्ध करून दिले. आरसीएफ थळच्या आयटी कर्मचाऱ्यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय अलिबाग येथे जाऊन दोन संगणक स्थापित करून पोलिस कार्यालयाचे कामकाज सुरू करून दिले. संगणक त्वरित उपलब्ध करून दिल्याबद्दल उपविभागीय पोलिस अधिकारी विनीत चौधरी यांनी समाधान व्यक्त करून आरसीएफ व्यवस्थापना प्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.



## अपर्णा वाघमारे सेवानिवृत्त

**। खरोशी । वार्ताहर ।**

पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण येथील सेवाज्येष्ठ शिक्षिका अपर्णा अरविंद वाघमारे या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त होत असल्याने शाळेत सेवापुर्ती सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे उपकार्याध्यक्ष व खजिनदार संजय कडू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका लेखा ठाकूर, माजी मुख्याध्यापिका कलावती पाटील, जनार्दन जाधव, सेवामूर्ती अपर्णा वाघमारे, मुख्याध्यापिका विद्या घरत, मंगला साळवी, विद्या कवळे, अरविंद वाघमारे, अनुजा वाघमारे आदी मान्यवरांसह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सुरूवातीला शिक्षकवृंदांनी ईशस्तवन व स्वागतगीत गायन केले. सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळेच्या वतीने सेवानिवृत्त शिक्षिका अपर्णा वाघमारे यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन खणा नारळाचे ओटी भरून सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचे आरोग्य अबाधित रहावे व स्वच्छ पाणी पिण्यासाठी मिळावे याकरिता वॉटरफिल्टर शाळेला भेट दिली. यावेळी शिक्षकांनी मनोगतात आलेला अनुभव मिळालेले सहकार्य तसेच विद्यार्थी व पालकांसाठी सतत केलेले मार्गदर्शन याबरोबरच विद्यार्थी हित जोपासण्यासाठी केलेल्या कार्याची सकारात्मक माहिती सांगितली. शेवटी आभार प्रदर्शनाने सांगता केली.

# माकडे पिंजराबंद करण्यात यश

## वनविभागाकडून मोहीम हाती

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

माकडांपासून होणारा त्रास कमी करण्यासाठी वनविभागाकडून मोहीम हाती घेण्यात आली होती. १६ ते २१ या कालावधीत ७१ माकडे पकडण्यात यश आले आहे. त्यासाठी संभाजीनगर येथून दोन प्रशिक्षितांची मदत घेतली जात आहे. एका माकडाला पकडण्यासाठी ८०० रुपये दिले जातात. दिवाळीनंतर ही मोहीम वेगाने सुरू करण्यात येणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात आंबा आणि काजूची मोठ्या प्रमाणावर लागवड आहे, तसेच हिवाळी शेतीमध्ये भाजीपाला, भातशेती केली जाते. गेली काही वर्षे फळबागा आणि शेतीपिकांचे माकडांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे कोकणातील शेतकरी आणि बागायतदार हवालदिल झाला आहे. दरवर्षी आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे; परंतु हा प्रश्न सोडवण्यासाठी गोळप येथील शेतकरी अविनाश काळे आणि बागायतदारांनी माकड, वानरांपासून होणाऱ्या उपद्रवाबद्दल आवाज उठवला होता. त्यासाठी आंदोलनही केली. माकड



पकडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामधून माकड पकडण्यासाठी दोन पिंजरेही विकत घेण्यात आले आहेत. मे महिन्यात गोळप येथे माकड पकडण्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. त्यानंतर विभागीय वनाधिकारी गिरिजा देसाई, सहाय्यक वनाधिकारी प्रियांका लगड, रत्नागिरीचे परिक्षेत्र वनाधिकारी प्रकाश सुतार यांच्या सूचनेनुसार १६ ऑक्टोबरपासून माकडे पकडण्यास सुरवात झाली. रत्नागिरी, लांजा, राजापूर, दापोली, खेड तालुक्यात काही वानर पकडण्यात आले.

ही मोहीम राबवण्यासाठी संभाजीनगर येथून प्रशिक्षित लोकांना बोलावण्यात आले आहे. पकडलेले वानर अभयारण्यात सोडण्यात येतात. रत्नागिरीतील माकडे सह्याद्रीच्या जंगल भागात सोडली जातात. एक माकड पकडण्यासाठी आठशे रुपये मंजूर करण्यात आले आहेत. दिवाळी सुट्टीमुळे ही मोहीम थांबली असून, त्यानंतर वेगाने माकडे पकडण्यात येणार आहेत. जानेवारी महिन्यापासून खऱ्या अर्थाने आंबा हंगाम सुरू होतो. त्यापूर्वी माकडे पकडली तर त्याचा फायदा निश्चितच बागायतदारांना होईल. दरम्यान, जिल्ह्यात माकडांची संख्या अधिक असून, पिंजरे दोनच आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात माकडे पकडण्याच्या मोहिमेचा किती फायदा होईल, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

**तालुकानिहाय पकडलेली माकडे**

रत्नागिरी १३, लांजा २०, राजापूर ४, दापोली २, खेड ३२.

## फटाकेमुक्त दिवाळीचा निर्धार

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील रजिप शाळा सिद्धेश्वर मधील सर्व विद्यार्थ्यांनी शनिवारी (दि. २६) फटाके न वाजविण्याची शपथ घेतली. हे विद्यार्थी फटक्यांऐवजी गोष्टींची पुस्तके खरेदी करणार आहेत. तसेच आनंददायी शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांनी पर्यावरणस्नेही आकाशकंदीलसुद्धा तयार केले.

यावेळी केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे, मुख्याध्यापिका रोहिणी खामकर व शिक्षक जनार्दन भिलारे, स्वप्नाली मेमाणे, प्रिया काळे उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे होणारे दुष्परिणाम व फटाकेमुक्त दिवाळीचे महत्त्व समजावून सांगितले. शाळेतल्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला. पर्यावरण स्नेही दीपावली, फटाके मुक्त दीपावली साजरी करू. तसेच या दिवाळीत फटाके फोडणार नाही त्याऐवजी पुस्तके विकत घेऊन वाचू, अशी शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. या विधायक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# दुभाजकातील झाडे पाण्याविना सुकली

**। विरार । प्रतिनिधी ।**

वसई-विरार शहरात कोट्यवधींचा खर्च करून रस्त्याच्या मधोमध दुभाजक बांधण्यात आले आहेत. त्यामध्ये सुंदर दिसणारी फुलझाडे लावली आहेत. मात्र, सध्या ही झाडे पाण्याअभावी सुकली असल्याचे चित्र दिसून आले आहे. या झाडांना वेळेवर पाणी मिळत नसल्याने त्यांची रया गेली आहे.

नालासोपारा शहराच्या पूर्वेला मुख्य रस्त्यांमध्ये दुभाजक असून त्यावर झाडांच्या कुंड्या ठेवण्यात आल्या आहेत. लोकांनी दुभाजक तोडू नयेत, असा त्यामागचा उद्देश आहे. मात्र, या झाडांना पाणीच मिळत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे यातील काही झाडे सुकली आहे.

पालिकेकडून या दुभाजकांची साफसफाई देखील केली जात नाही. तर शहरातील वाहन चालक गोवा गुटख्याच्या पानाच्या पिचकार्या मारतात. यामुळे दुभाजकावर काढण्यात आलेले चित्रदेखील दिसेनासे झाले आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, वसईत महापालिकेतर्फे शहरातील दुभाजकात झाडे लावण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून जनतेच्या पैशाचा धुरळा केला जात आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. तर शहरात विविध सामाजिक संस्था मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करत असतात.

शिवाय रोपांचे संवर्धन व जतन करता यावे म्हणून रोपांभोवती पिंजरेदेखील लावतात. काही ठिकाणी वृक्षांना टँकरने पाणीदेखील दिले जात आहे. मात्र, अनेक ठिकाणी पाणी मिळत नसल्याने वृक्ष सुकून गेले आहेत. वसई, नालासोपारा, विरारच्या मुख्य रस्त्याला लागून असलेली तसेच मोकळ्या जागेतील व डोंगराळ भागातील अनेक झाडे सुकली आहेत. तर लहान रोपांची अवस्थादेखील बिकट आहे. एकीकडे प्रदूषणवाढ रोखण्यासाठी वृक्ष बचाव मोहीम हाती घेतली जाते. वृक्षारोपण केले जाते; मात्र पुरेसे पाणी न मिळाल्याने झाडे सुकून जात आहेत. पालिका त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

# दिवाळी सणाच्या लगबगीला वेग!

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

दिवाळीचा सण दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. या सणाच्या पार्श्वभूमीवर वेंगुर्ला बाजारपेठेत विक्रीस दाखल झालेले विविध रंगाचे आकर्षक आकाशकंदील नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. काही विक्रेत्यांनी या आकाशकंदिलांमध्ये विद्युत प्रवाह सोडल्याने ठिकठिकाणी दिवाळी सणाचा माहोल पहायला मिळत आहे. तर विविध पणत्या, मेणबत्या, रंगीबेरंगी रांगोळ्या, रांगोळ्यांचे साचे विक्रीस उपलब्ध



झाले आहेत.

गणेश चतुर्थीच्या सणानंतर दिवाळी सणाच्यानिमित्ताने विविध साहित्यांनी पुन्हा एकदा बाजारपेठ सजली आहे. सर्वत्र या सणाच्या पूर्वतयारीसाठीची लगबग वाढली आहे. अलीकडे नरकचतुर्दशी दिवशी नकरासुराच्या प्रतिमा दहन करण्याची 'क्रेझ' वाढली आहे. त्यामुळे नवरात्रौत्सवानंतर युवावर्गासोबत लहान मुलेही नरकासुराची भव्यदिव्य प्रतिमा करण्यात गुंतले आहेत. तर काही मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले बनविण्याचा वसा घेतल्याने सर्वांना विविध किल्ले पहाता येणार आहे. युवावर्गाच्या आणि मुलांच्या हस्तकलेला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी स्पर्धांचे आयोजन केले आहे.

# खून करुन नौका पेटवली

## खलाशी-तांडेलातील वाद विकोपाला

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

मासेमारीसाठी गेलेल्या नौकेवरील खलाशी आणि तांडेल यांच्यातील वाद विकोपाला जात नौकेवरील तांडेलाचा खून करून थेट नौका पेटवल्याची घटना घडली आहे. कुणकेश्वरपासून खोल समुद्रात १५ वावाच्या अंतरावर ही घटना सोमवारी दुपारी घडली. यात बोटीचे सुमारे दीड कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

संशयित आरोपी जयप्रकाश विश्वकर्मा (रा. छत्तीसगड) हा तांडेलाचा खून करून नौकेवरून उडी मारून पलायन करत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. विश्वकर्मा हा मानसिक रुग्ण असल्याचे समजते. नौकेवरील तांडेलाचा खून करून नौकेला आग लावल्यानंतर नौकेच्या मागील बाजूस असलेल्या छोट्या होडीत जाऊन तो बसला. दरम्यान, घटनास्थळी गस्तीनौकेने गेलेल्या पोलिसांनी त्याला ताब्यात घेत देवगड बंदरात आणले. त्यानंतर त्याला उपचारासाठी देवगड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

रत्नागिरी- राजीवाडा येथील नुमान रफिक फणसोफकर यांच्या मालकीची नुझत राबिया ही नौका रविवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास मिरकर वाडा येथून मासेमारीसाठी निघाली. सोमवारी कुणकेश्वर येथे खोल समुद्रात मच्छीमारी करताना खलाशी आणि तांडेल यांच्यात वाद झाला. हा वाद विकोपाला गेल्यानंतर नौकेवरील खलाशी जयप्रकाश विश्वकर्मा याने तांडेल रवींद्र नाटेकर (रा. गुहागर) याचा खून करून नौका पेटवून दिली. विश्वकर्मा याने नौका पेटविल्यानंतर नौकेमागील असलेल्या छोट्या होडीत जाऊन बसला. नौकेने पेट घेतल्याचे निदर्शनास येताच आणि नौकेवरील खलाशांनी जीवाच्या आकांताने केलेली आरडाओरड ऐकून नजीकच्या नौकांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेच नौकेवरील खलाशांनादेखील वाचविण्याचा प्रयत्न केला. या नौकेवर तांडेलासह एकूण २६ खलाशी होते.

या घटनेची माहिती मत्स्य व्यवसाय अधिकारी पोलीस प्रशासन यांना देण्यात आली. त्यानुसार मत्स्य व्यवसाय अधिकारी पार्थ तावडे यांनी देवगड बंदर येथे येऊन सागर पोलीस शाखेस माहिती दिली. सागर पोलीस दलाच्या गस्तीनौकेने तात्काळ घटनास्थळी जाऊन त्या संशयित आरोपीला ताब्यात घेऊन देवगड बंदरात आणले. यावेळी देवगड बंदरातून म्हाळसा मल्हार या नौकेने घटनास्थळी जाऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला.

# पर्यटन हंगामासाठी गणपतीपुळे सज्ज

## ■ हिवाळीच्या सुट्ट्यांमुळे पर्यटकांची रिघ सुरू

**। गणपतीपुळे । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेले गणपतीपुळे दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. यानिमित्ताने गणपतीपुळे येथील सर्वच लहान-मोठे स्थानिक पर्यटन व्यावसायिक, एमटीडीसी व देवस्थान समितीने विविध सेवा सुविधांची तयारी केली असून, पर्यटकांच्या सेवेसाठी सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. शाळा व महाविद्यालयांना दिवाळी सणाची सुट्टी जाहीर झाल्यानंतर अनेक पर्यटकांची



पावले आता गणपतीपुळेसह अन्य पर्यटन स्थळांकडे पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी वळू लागली आहेत.

गणपतीपुळेत शनिवारपासून पर्यटकांची रीघ लागल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे यंदाही दिवाळी पर्यटन हंगामात पर्यटकांची गणपतीपुळेला विशेष पसंती मिळेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

गणपतीपुळे येथील महाराष्ट्र पर्यटन निवास महामंडळाच्या निवासस्थानांमध्ये दहा तारखेपर्यंत आरक्षण बुकिंग झाल्याची माहिती गणपतीपुळे पर्यटन निवासाचे निवासी व्यवस्थापक वैभव पाटील दिली. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांनी गणपतीपुळे एमटीडीसीलाही पसंती दर्शवली आहे. त्याचबरोबर गणपतीपुळे परिसरातील सर्व खासगी हॉटेल, लॉजिंग पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज झाले असून, या सर्वांनी जय्यत तयारी केली आहे. व्यावसायिकांनी आपली हॉटेल्स व लॉजिंग चांगल्या प्रकारे रंगरंगोटी केली आहे.

येणाऱ्या पर्यटकांना गणपतीपुळे समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांना खास आकर्षित करण्यासाठी गणपतीपुळे येथील मोरया वॉटर स्पोर्टस् संस्थेच्या माध्यमातून वॉटर स्पोर्टच्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये बनाना राईड, ड्रॅगन राईड, जेसकी बोट, डिस्को राईट आदी वॉटर स्पोर्टसूचे प्रकार पर्यटकांना खास आकर्षित करत आहेत. गणपतीपुळे किनाऱ्यावर असलेल्या फोटोग्राफी, एटीव्ही बाईक, उंट, घोडा सफर आदी प्रकारांचा आनंद पर्यटकांना घेता येणार आहे.

# पालिकेचे तरण तलाव दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

**। विरार । प्रतिनिधी ।**

नागरिकांना आवश्यक असलेल्या तरण तलावाची मोठी दुरवस्था झाली आहे. यामुळे पालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेले तलाव देखभाल दुरुस्तीअभावी दुरुस्तीच्या प्रतीक्षेची वाट पाहात आहे.

वसई-विरार महानगरपालिकेने जलतरणपटू आणि शहरातील नागरिकांसाठी उत्तम सोय म्हणून वसई, नवघर दिवाणमान, तामतलाव तर विरार फुलपाडा येथे तरण तलाव बांधण्यात आले आहेत. कोरोना काळात शासकीय निर्बंध असल्याने हे तलाव मागील दोन वर्षे बंद होते. पण, कोरोना काळ संपल्याने नागरिकांच्या मागणीमुळे पालिकेने दिवाणमान आणि तामतलाव येथील तरण तलाव सुरु केले. पण, हे तलाव सुरु करताना पालिकेने इतर सुविधा मात्र सुरु केल्या नाहीत. दिवाणमान येथील तरण तलावामधील शौचालय तुटले आहे. येथे असलेल्या बाथरूममध्ये असलेले नळ तुटले आहेत.

# वयोश्री योजनेला आचारसंहितेचा अडसर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी रायगड जिल्ह्यात आतापर्यंत २७ हजार ४७४ ज्येष्ठ नागरिकांनी अर्ज केले आहेत. निवडणूक आचारसंहितेमुळे या योजनेतील वितरणाला स्थगिती देण्यात आली आहे. योजनेतून आतापर्यंत १८ हजार ८२० अर्जांची तपासणी पूर्ण झाली आहे. तर, पात्र ठरलेल्या ११ हजार ज्येष्ठ नागरिकांच्या खात्यावर प्रत्येकी तीन हजार रुपये वर्ग करण्यात आले आहेत. निधी वाटप करताना लाभार्थींनी महिनाभरात देयके जमा करणे आवश्यक असल्याची अट घालण्यात आली आहे; मात्र ही देयके सादर करताना वयोवृद्ध नागरिकांना अडचणी येत असून बँक खात्यात जमा झालेले पैसे परत जाण्याची चिंता सतावू लागली आहे.**

## ■ ज्येष्ठांना पैसे परत जाण्याची चिंता



खात्यात जमा झालेल्या तीन हजार रुपयांमध्ये वृद्धापकाळासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू खरेदी करता येणार आहेत; मात्र असे करताना तीन हजार रुपये खरेदीची बिले समाजकल्याण कार्यालयात सादर करणे आवश्यक आहेत. सर्वच वयोवृद्धांना या वस्तू नव्याने खरेदी करण्याची गरज नसते, त्यामुळे कमी किमतीची खरेदी झाल्यास उर्वरित पैसे सरकार जमा करून घेणार, याची चिंता लाभार्थ्यांना आहे. राज्य सरकारकडून वय वर्षे ६५ व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरू करण्यात आली आहे. ज्येष्ठांमध्ये वयोमानपरत्वे येणारे अपंगत्व, अशक्तपणा निराकरणासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे, तसेच मानसिक स्वास्थ्य संतुलित ठेवण्यासाठी मनःस्वास्थ्य केंद्रे, योगोपचार केंद्रांद्वारे प्रबोधन, प्रशिक्षण देण्यासाठी पात्र लाभार्थींना तीन हजार रुपये एकरकमी थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करून ज्येष्ठांना मदत करण्यात येत आहे.

वयोश्री योजनेंतर्गत लाभार्थी व्यक्तीचे वय ३१ डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत ६५ वर्षे पूर्ण झालेले असावे, त्या व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधार कार्डसाठी अर्ज केला असावा आणि आधार नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न दोन लाखांच्या आत असावे, आदी निकष आहेत.

रायगड जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांची संख्या सुमारे साडेतीन लाख आहे. योजना सुरू झाल्यापासून लाभार्थ्यांकडून योजनेला अल्प प्रतिसाद मिळत होता; मात्र सरकारने जिल्हास्तरावर आढावा घेत ग्रामीण भागात ग्रामपंचायत पातळीपासून यंत्रणा कामाला लावली. त्यामुळे वयोश्री योजनेसाठी ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद वाढला.विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू होईपर्यंत रायगड जिल्ह्यात २७ हजार ४७४ ज्येष्ठ नागरिकांनी या योजनेच्या लाभासाठी अर्ज केला आहे. त्यापैकी १८ हजार ८२० अर्जांची तपासणी करण्यात आली आहे. तर, ११ हजार ज्येष्ठ नागरिकांच्या बँक खात्यावर प्रत्येकी तीन हजार रुपयेप्रमाणे मदतनिधी वर्ग करण्यात आल्याची माहिती रायगड जिल्ह्याच्या समाजकल्याण विभागाकडून देण्यात आली.

अर्ज करताना मोबाईल नंबर न देणे, बँक पासबुकच्या प्रती न जोडणे, आयएफसी कोड चुकीचा असणे, आदी त्रुटी काही अर्जांमध्ये आढळून येत आहेत. दरम्यान, १५ ऑक्टोबर रोजी विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे योजनेच्या निधी वितरणाला स्थगिती आली आहे. येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत लाभार्थींना योजनेसाठी अर्ज करण्याची शेवटची मुदत देण्यात आली होती, ती पुन्हा रद्द करण्यात आली आहे.

# ‘फटाके नको फोडायला पुस्तके द्या वाचायला’



**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

रजिप शाळा सिद्धेश्वरमधील सर्व विद्यार्थ्यांनी फटाके न वाजविण्याची शपथ घेतली. हे विद्यार्थी फटक्याऐवजी गोष्टी पुस्तके खरेदी करणार आहेत.

आनंददाई शनिवार अंतर्गत विदयार्थ्यांनी पर्यावरणस्नेही आकाशकंदील सुद्धा तयार केले. यावेळी केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे, मुख्याध्यापिका रोहिणी खामकर, शिक्षक जनार्दन भिलारे, स्वप्नाली मेमाणे, प्रिया काळे उपस्थित होते. शाळेतल्या शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला. पर्यावरण स्नेही दीपावली, फटाके मुक्त दीपावली साजरी करू. या दिवाळीत फटाके फोडणार नाही त्याऐवजी पुस्तके विकत घेऊन वाचू अशी शपथ विद्यार्थ्यांनी घेतली. या विधायक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विधानसभेमुळे शेतमजूर मिळेनात

## मजुरांची मनधरणी करून भातकापणीस सुरुवात

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**



विधानसभेच्या निवडणुकीचे पडघम वाजत असताना त्यातच परतीचा पाऊस शांत झाल्यामुळे शेतकरी भातकापणीकडे वळले आहेत. शेतात काम करणारे शेतमजुरांनी शेतीकडे पाठ फिरविल्याचे दृश्य तालुक्याच्या ठिकाणी पाहावयास मिळत आहे. शेतीच्याकामासाठीत्यांचीमनधरणी सुरु असल्याचे पहावयास मिळत आहे. त्याचबरोबर ऑक्टोबर महिना म्हणजे उष्णतेचा असल्यामुळे या रणरणत्या उन्हामध्ये मजूर हैराण होत असल्यामुळे भात कापणीस येण्यास टाळाटाळ करीत आहेत.

उष्णतेमुळे भाताच्या लोंब्यांपासून दाणे अलग होत असल्यामुळे यावर्षी हातात हवे तेवढे धान्य मिळणार की नाही, अशी स्थिती बळीराजाची निर्माण झाली आहे. निसर्गाच्या लहरीपणावर मात करून भातपिके जोमाने वाढवून शेतजमीन फुलवून धान्य निर्माण करीत आहे.

दुर्गम भागातून येणारे मजूर हे दिवाळीपूर्वी परतीच्या प्रवासाला लागत असल्याने आता जे उपलब्ध होतील त्यांची मनधरणी करून लवकरात लवकर भातकापणी आटोपून घेण्याच्या प्रयत्नात शेतकरी आहेत. भातकापणी वेळेवर झाली नाही तर शेतकऱ्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागणार आहे. तर, काही ठिकाणी भात झोडणीला प्रारंभ झालेला आहे. काही भागात मजुरांची उपलब्ध नसल्याने घरच्या घरी भात कापणीसमवेत भात झोडणी सुरु झाली आहे. यामुळे रणरणत्या उन्हाची पर्वा न करता शेतात तयार झालेले धान्य घरी आणण्याची लगबग सुरु झाली आहे.

# सार्वजनिक वाचनालयात दिवाळी पहाट

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील जंजिरा संस्थानकालीन मुरुडच्या सार्वजनिक वाचनालयात दरवर्षीप्रमाणे येत्या ३१ ऑक्टोबर रोजी पहाटे सहा वाजता दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक कलावंतांच्या कलाविष्कारातून संगीत दीपोत्सव या विविधरंगी कार्यक्रम होणार असल्याची माहिती सार्वजनिक वाचनालयाच्या उपाध्यक्षा दिपाली जोशी यांनी दिली. स्थानिक कलाकारांना दाद देण्याकरिता सर्व रसिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महागाईने दिवाळीवर मंदीचे सावट

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

## मुरूडमध्ये उलाढाल थंडावली

### यंदा राजकीय फटाके अधिक फुटणार

**यंदा राजकीय फटाके अधिक फुटणार अशा प्रतिक्रिया सतत ऐकायला मिळत आहेत.दिवाळी हंगामामध्ये फटाक्यांची उलाढाल कमी असली तरी आगामी काळात विधानसभा निवडणूक असल्याने विजयी काळात फटाक्यांची तिपटीने विक्री होईल अशी अटकळ आहे. त्यावेळी बाजारातदेखील तेजी अपेक्षित आहे. त्यामुळे दिवाळीऐवजी राजकीय दिवाळीकडे सर्वांचे अधिक लक्ष लागून आहे.**

दिवाळी सणावर महागाईमुळे मंदीचे सावट असून, उत्साह दिसत नाही. मुरूडमधील काही फटाके विक्रेत्यांनी सांगितले की, दिवाळीत फटाक्यांना उठाव नाही. त्यामुळे पूर्वीसारखी विक्री होईल असे संभवत नाही.

नवीन कपडे खरेदी, सोने, वाहने खरेदीसाठीदेखील गर्दी दिसून येत नाही. भाजीपाला, मासळी, पेट्रोल, डिझेल आणि रोजच्या जीवनातील वस्तूंचे भाव अटकेपार गेल्याने सर्वसामान्य जनता होरपळत आहे, असे ठिकठिकाणी ऐकायला मिळत आहे.

धरमचंद जैन यांनी सांगितले की, मंदीमुळे मुख्य बाजारपेठ थंडावली असून, दिवाळीत उलाढाल फारशी होईल, असे संभवत नाही. नेमक्याच दुकानातून ग्राहक खरेदीसाठी आलेले दिसून येतात. काही फटाके विक्रेत्यांनी सांगितले की, महागाईमुळे फटाके विक्री घटली आहे. मंदी ओळखून आम्ही यंदा ७० टक्केच फटाके विक्रीस आणले आहेत. सद्यः स्थितीत मुरूडमध्ये सुमारे दहा फटाक्यांची दुकाने दिसून येतात. पण, पाहिजे तसा फटाक्यांना उठाव नाही, असे विक्रेत्यांनी सांगितले.

मुरूडमधील फटाके विक्रेते कुणाल सतविडकर म्हणाले की, फटाका किमतीत २० टक्के वाढ झाली आहे. परंतु, बेसुमार महागाईमुळे राज्यातील जनता त्रस्त आणि हैराण झाली आहे. जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी पैसे नसल्याने फटाके खरेदीसाठी येणारे ग्राहक अगदीच कमी प्रमाणात येत आहेत, अशी माहिती कुणाल सतविडकर यांनी दिली. महागाईपुढे जनतेने हात टेकले असून, महत्त्वाच्या दिवाळी सणावर मंदीचे सावट आले आहे.

# अज्ञाताचा आढळला मृतदेह

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल जवळील सिमरन मोटर्स पाठीमागे असणाऱ्या वाल्ह्याची वाडी झोपडपट्टीच्या बाजूला असणाऱ्या नाला व रेल्वे पटरीमध्ये एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे असून त्याचे शरिर पूर्णपणे कुजलेले असून व अंगावर एकही कपडा नाही. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे फोन नं.२७४५२३३३ किंवा पोउपनि. हजरत पठाण मो.नं.८७७९६५९५०८ येथे संपर्क साधावा.

# सुगंधी उटण्यामुळे दिवाळीतील पहाट होणार प्रसन्न

**। रायगड । प्रतिनिधी ।**



वसुबारसनिमित्त गाय-वासराचे पूजन करून सोमवारपासून दीपोत्सव सुरू झाला आहे. त्यामुळे बाजारपेठांसह घरे, अंगणे रोषणाईने सजलेली दिसत आहेत. धनत्रयोदशीपासून ते भाऊबीजपर्यंत पाच दिवस चालणारा हा सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. दिवाळी जवळ आली की आपल्याला हमखास आठवण होते पहाटे तेल आणि मग उटणे लावून केलेली अंघोळ. या दिवसात अभ्यंगस्नानाला विशेष महत्त्व असल्याने उटण्यामुळे दिवाळीतील पहाट अधिक सुगंधी होणार आहे.

दिवाळीत कडाक्याच्या थंडीत पहाटे अंगाला उटणे लावून अभ्यंगस्नान करण्याची प्रथा आहे. अभ्यंग स्नानाचे महत्त्व आयुर्वेदातदेखील मांडलेले आहे. त्यामुळे विविध नैसर्गिक घटकांपासून तयार झालेले सध्याच्या बोलीभाषेतील सुगंधी स्क्रबर आरोग्याच्या दृष्टीनेही अधिक महत्त्वाचे असून उटणे लावण्यामुळे शरीराला अनेक फायदे आहेत. पूर्वीच्या काळी दिवाळी सणाच्या आदल्या दिवशीच घरी उटणे बनवले जायचे. घरी तयार केलेले उटणे शुद्ध आणि नैसर्गिक असते. हे उटणे आता बाजारात सहजरीत्या उपलब्ध होत आहे. त्यामुळे दीपोत्सवाच्या तयारीला आता वेग आला असून शरीरासाठी आरोग्यदायी असलेल्या उटण्याच्या सुगंधातून सणाचा गोडवा अधिक वृद्धिंगत होणार आहे. यामुळे महिलावर्गातून दिवाळी व इतर खरेदीसोबत बाजारपेठेतील सुगंधी उटणे खरेदी केले जात आहे. याची किंमत १० रुपयांपासून ते ५० रुपयांपर्यंत आहे.

**उटणे लावण्याचे फायदे**

त्वचा कोरडी पडत नाहीउटणे लावून अंघोळ केल्याने त्वचा कोरडी पडत नाही. आंबेहळद त्वचा मऊ ठेवण्यासाठी मदत करते. उटण्यात मसूरची डाळ असते. मसूरची डाळ ही त्वचेसाठी किंवा त्वचा उजळ ठेवण्यासाठी वापरली जाते. त्यामुळे अनेक आयुर्वेदिक क्रीममध्ये मसूरच्या डाळीचा वापर केला जातो.

चमकदार चेहराकाळवंडलेली त्वचा उजळण्यास आणि त्वचेवर साचलेला मृत स्तर कमी करण्यास मदत करते. परिणामी त्वचा सुधारते. चंदनामुळे त्वचेत थंडावा राहण्यास मदत होते. उटण्यामध्ये रक्तचंदन, चंदन, वेखंड, कात, नागरमोथा यासारख्या वनस्पती आणि खोडांचा वापर केला जातो. हे घटक त्वचेला स्क्रबर म्हणून काम करतात. यामुळे काळवंडलेली त्वचा उजळण्यास मदत होते.

त्वचेवरील सुरकुत्या कमी होतातवयानुसार त्वचेला येणाऱ्या सुरकुत्या हे अतिशय सामान्य आहे. उटण्यामुळे सुरकुत्या पडण्याचे प्रमाण कमी होते. हळदीचा त्वचेला फायदा होतो. त्वचा दीर्घकाळ तजेलदार आणि टवटवीत दिसते. याशिवाय उटण्यात मध किंवा दूध लावल्यास त्याचा जास्त फायदा होतो. मध मिसळल्यास त्वचा मुलायम होण्यास मदत होते.

उटणे बनवताना वाटीमध्ये एक चमचा बेसन घेऊन त्यात चंदन पावडर मिक्स करा. नंतर त्यात गुलाबाच्या फुलांची पावडर, केशरच्या काड्या, हळद आणि तांदळाचे पीठ टाकून मिक्स करा. या साहित्याचा वापर करून तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये सुगंधी उटणे बनवू शकता. उटणे भिजवताना त्यात तुम्ही दूध किंवा गुलाब पाण्याचा वापर करू शकता.

# विद्युत रोषणाईवरुन जुंपले भांडण

**। पनवेल । वार्ताहर ।**

दिवाळी सणानिमित्त विद्युत रोषणाई एका सोसायटीच्या दोन गटामध्ये भांडणे झाल्याची घटना तळोजा वसाहतीमध्ये घडली आहे. येथील सेक्टर ९ या ठिकाणी असलेल्या पंचानंद हाऊस या सोसायटीमध्ये दिवाळी सणानिमित्त मधल्या भागात विद्युत रोषणाई करण्यात येत होती. या रोषणाईला सोसायटीतील विशिष्ट गटाने विरोध केला. यातून तेथील काही महिला रहिवाशांना अश्लिल भाषेत धमकाविण्यात सुद्धा आले. याबाबत या महिलांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार केल्याची माहिती मिळत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी मतदान जागरुकता शपथविधी

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका-२०२४ च्या अनुषंगाने मतदान जागरुकता निर्माण करण्यासाठी शनिवार (दि.२६) कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज ऑफ ए.एस.सी. पनवेल यांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता निर्माण करणे आणि जास्तीत जास्त मतदानासाठी प्रेरित करणे होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रशांत पाटील यांनी केले. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकत आपल्या सभोवतालच्या नागरिकांनाही मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले.

युवा मतदारांचा सहभाग लोकशाहीला बळ देतो, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना कुमारी साक्षी भागवत हिने मतदानाची शपथ दिली, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात जबाबदारीची भावना निर्माण झाली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अधिकारी प्रा. चंद्रकांत मुकादम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आभार व्यक्त केले.

पान १ वरून

## बंडखोरी झाली रे!

उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, यावेळी अनेक भाजपचे कार्यकर्ते खुलेआमपणे सभेत सहभागी झाले असल्याने भाजप भोईरांसोबत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता महेंद्र दळवींची वाट बिकट झाली आहे. अशातच महायुतीचे रायगड जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे कोणासोबत राहणार, असा सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये शिंदे गट विरुध्द भाजपचा वाद कायमच चर्चेत आला आहे. अलिबाग-रोहा रस्त्याच्या श्रेयवादावरूनही महेंद्र दळवी व दिलीप भोईर यांच्यात वाद झाला होता. अनेक वेळा दळवींनी भाजपच्या कार्यकर्त्यांना दुय्यम दर्जाची वागणूकही दिल्याची चर्चा झाली आहे. त्यामुळे पुन्हा महायुतीमधील शिंदे गट विरुद्ध भाजपमधील युद्ध विधानसभा निवडणुकीत पेटू लागले आहे.महेंद्र दळवी यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज भरला. यावेळी भाजपचे बोटावर मोजण्याइतके कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी खासदार तटकरे यांनी थोड्या वेळाचे दर्शन देऊन सभेत सहभागी होणेही टाळले होते.भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर यांनी मंगळवारी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला. त्यांच्यासोबत भाजपच्या जिल्हा सचिवांसह अनेक भाजपचे सच्चे कार्यकर्ते उपस्थित होते. भोईर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला असला, तरीदेखील त्यांनी भाजपचे चिन्ह गळ्यात घेऊन उमेदवारी अर्ज दाखल केल्याने ते भाजपमध्येच असल्याचेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे उरणमधील ‘बालदी पॅटर्न’प्रमाणे भाजप भोईर यांच्यासोबत राहून शिंदे गटाचे उमेदवार दळवींना पाडण्याचा डाव आखत असल्याचे आता शिक्कामोर्तब झाले आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

● सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A.प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाउस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३

● अलिबाग एस.टी.स्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे ९७६४५४८६७९

● आयुर्विमा ऑफीस कामासाठी महिला पाहिजे पत्ता विजयनगर -वरसोली, वरसोली नाक्याजवळ मो.९४२२४९४५९०/७५०७९२९१२८

● विद्यानगर तांत्रिक विद्याल्यामागे क्षितिज बंगला (तळमजला) भाड्याने देणे आहे. ९९६९८२८२३९ /९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## मुरुडमधील असंख्य कार्यकर्ते शेकापमध्ये

पार्श्वभूमीवर हा प्रवेश म्हणजे चित्रलेखाताई पाटील यांच्या विजयाची मुहूर्तमेढ असल्याचे चित्र आहे.शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांची उमेदवारी जाहीर झाल्यापासून अलिबाग, मुरुड व रोहा तालुक्यातील असंख्य कार्यकर्ते शेतकरी कामगार पक्षामध्ये येऊ लागलेली आहेत. अनेक गावे वाड्यांमधील महिला कार्यकर्ते व तरुण मंडळी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या नेतृत्वाखाली पक्षप्रवेश करत आहेत. सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून काम करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या झेंड्याखाली मुरुड कोळीवाडा येथील प्रयास वरसोलकर त्याच्या मित्रमंडळासह आणि २०० ग्रामस्थांसह शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. यावेळी शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते मनोहर बैले, महाराष्ट्र मच्छिमार संघटना अध्यक्ष विजय गिदी, तुकाराम पाटील, चंद्रकांत कमाने, विक्रांत वार्डे, राहील कडू, मनोहर मकु, इम्तियाज मलबारी, मनीष माळी, संतोष जमनू, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## जिल्ह्यात १११ उमेदवारांचे १४० नामनिर्देशनपत्र दाखल

श्रीराम बळीराम महाडिक (बसपा), नरेश गौतम बनसोडे (हिंद राष्ट्र संघ), सुधाकर शंकर घारे (अपक्ष), नमिता सुधाकर घारे अपक्ष, सुधाकर यादवराव घारे अपक्ष, जविद अकदास खोत (अपक्ष), महेंद्र लक्ष्मण थोरवे (अपक्ष), सुधाकर शंकर घारे (अपक्ष), विशाल विष्णू पाटील (अपक्ष), किशोर सिदराम साळुंके (अपक्ष) यांनी अर्ज दाखल केले आहेत.१९० - उरण विधानसभा मतदार संघामध्ये १६ उमेदवारांचे १७ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये श्रीकन्या तेजस डाकी (अपक्ष), कुंदन प्रभाकर घरत(अपक्ष), सुनील मारुती गायकवाड (बहुजन समाज पार्टी), निलम मधुकर कडू (अपक्ष), बाळकृष्ण धनाजी घरत (अपक्ष), कृष्णा पांडुरंग वाघमारे (अपक्ष), मनोहर परशुराम भोईर (अपक्ष), मनोहर गजानन भोईर (शिवसेना, उबाठा), संतोष हिराजी ठाकूर (अपक्ष), महेश रतनलाल बालदी (भारतीय जनता पार्टी), महेश गणपत कोळी (लोकराज्य पार्टी), प्रीतम धनाजी म्हात्रे (अपक्ष), प्रीतम बळीराम म्हात्रे (अपक्ष), प्रीतम जनार्धन म्हात्रे (शेकाप), जितेंद्र दामोदर म्हात्रे (अपक्ष), सत्यवान पंढरीनाथ भगत (मनसे).

१९१ - पेण विधानसभा मतदारसंघामध्ये १५ उमेदवारांचे १९ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये रवींद्र दगडू पाटील (भाजपा), देवेन मारुती कोळी (वंचित बहुजन आघाडी), प्रसाद केळुराम भोईर (शिवसेना, उबाठा), कौसल्या रवींद्र पाटील (भाजप), विश्वास मधुकर बागुल (अपक्ष), अतुल नंदकुमार म्हात्रे (शेकाप), सुरेश नामदेव खैरे (शेकाप), नमिता नंदकुमार म्हात्रे (अपक्ष), दशरथ मोतीराम साळवी (अपक्ष), नरेश गजानन पाटील (अपक्ष), पल्लवी प्रसाद भोईर (अपक्ष), संजय रघुनाथ म्हात्रे (अपक्ष), मंगल परशुराम पाटील (अभिनव भारत पार्टी), अनुजा उर्फ अनु केशव साळवी (बहुजन समाज पार्टी), प्रसाद सूर्यकांत वेदक (राष्ट्रीय समाज पक्ष) यांचा समावेश आहे.१९२ - अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये २३ उमेदवारांचे २८ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये महेंद्र हरी दळवी (शिवसेना), जुईली महेंद्र दळवी (अपक्ष), मंदार एकनाथ गावंड (अपक्ष), चित्रलेखा नृपाल पाटील (शेतकरी कामगार पक्ष), सुभाष जनार्दन पाटील (अपक्ष), सुप्रिया जयंत पाटील (शेतकरी कामगार पक्ष), दिलीप विठ्ठल भोईर (अपक्ष), दिलीप गोविंद भोईर (अपक्ष), सुरेंद्र म्हात्रे (शिवसेना उबाठा), अमर रविंद्र फुंडे (अपक्ष), राहुल दिलीप भोईर (अपक्ष), दिलीप गोविंद भोईर (अपक्ष), अनिल बबन गायकवाड (बहुजन समाज पार्टी), श्रीनिवास सत्यनारायण मटपरती (अपक्ष), आनंद रंगनाथ नाईक (अपक्ष), अजय श्रीधर म्हात्रे (अपक्ष), अंजली अश्विन केळकर (अपक्ष), हर्ष रमेश चोपडा, (अपक्ष), समीर रमाकांत पाटील (अपक्ष), महेंद्र आत्माराम दळवी अपक्ष, महेंद्र कृष्णा दळवी अपक्ष, महेंद्र वसंत दळवी, अपक्ष, राजेंद्र मधुकर ठाकूर,

१९३ - श्रीवर्धन विधानसभा मतदार संघामध्ये १३ उमेदवारांचे २० अर्ज दाखल झाले आहेत. संतोष तानाजी पवार (अपक्ष), राजेंद्र मधुकर ठाकूर (इंडियन नॅशनल काँग्रेस), कृष्णा पांडुरंग कोबनाक(अपक्ष), आदिती सुनिल तटकरे (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी), फैसल अ. अजीज पोपेरे (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), अशरफ खान दादाखान पठाण (अपक्ष), युवराज प्रकाश भुजबळ (अपक्ष), स्वाती अनिल नवगणे (नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी,श. प.), ज्ञानदेव मारुती पवार (अपक्ष), अश्विनी उत्तम साळवी (बहुजन समाज पार्टी), अनिल दत्ताराम नवगणे (नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी,श.प.), मोहम्मद कासीम बुरानुद्दीन सोलकर (अपक्ष), अनंत बाळोजी गीते (अपक्ष).

१९४ - महाड विधानसभा मतदारसंघामध्ये ८ उमेदवारांचे ११ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये भरत मारुती गोगावले (शिवसेना), स्नेहल माणिक जगताप (शिवसेना, उबाठा), श्रेयस माणिक जगताप (शिवसेना, उबाठा), प्रज्ञा लक्ष्मण खांबे (अपक्ष), अमृता वाघमारे (बहुजन समाज पार्टी), आनंद नथुराम भोरावकर (अपक्ष), आनंदराज रवींद्र घाडगे (वंचित बहुजन आघाडी), आकाश अशोक पांचाळ (संभाजी ब्रिगेड) यांचा समावेश आहे. या सर्व अर्जाची दि. ३० ऑक्टोबरला छाननी करण्यात येणार असून, दि.४ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेता येणार आहे. मतदान दि.२० नोव्हेंबरला होत असून, दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

## परदेशी पाहुणे आले हो!

वास्तव्य करीत राहिल्याने इथले झाले आहेत. या पक्ष्यांना पाहण्यासाठी समुद्रकिनारी नागरिकांसह पर्यटकांची गर्दी वाढत आहे. हा पक्षी समुद्राच्या काठावर कळप करुन जिवंत छोटे मासे, किडे व खेकडे हे अन्न शोधत असतात. मुरुडच्या पर्यटनवाढीसाठी सीगल पक्ष्यांची मदत नेहमीच होत आली आहे. दिवाळी हंगामात हे पक्षी आल्याने त्यांना पाहण्यासाठी आणि अभ्यास करण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने मुरुडला येतात.

## शेकापच्या तिन्ही शिलेदारांचे शक्तीप्रदर्शन

व्हिजन असलेला पक्ष म्हणून रायगडची जनता शेतकरी कामगार पक्षाकडे पाहात आहे. त्यामुळे मतदारांचा शेकापच्या सर्व उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.दरम्यान, शुक्रवारी नामांकन अर्ज दाखल करण्याची मुदत संपली असून, उद्या दि. ३० ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी होणार आहे. छाननीनंतर खऱ्या अर्थाने प्रचाराचा धुरळा उडणार असून, सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. तसेच २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे

## मविआचा जागावाटपाचा फॉर्म्युला समोर

दिवसापर्यंत दाखल करण्यात आले आहेत. आघाडीतील तीन पक्षांच्या मिळून २८५ जागा होतात. यात ५ ठिकाणी दोन पक्षांनी एकमेकांविरोधात उमेदवार दिलेत.म्हणजे २८० जागांवर हे तीन पक्ष एकत्रितपणे लढणार आहेत. उर्वरित आठ जागा मित्रपक्षांसाठी सोडण्यात आल्याचे सांगण्यात आले.

तीन पक्षातील जागावाटप, काँग्रेस -१०२, शिवसेना उबाठा - ९६, राष्ट्रवादी पवार गट- ८७

**आघाडीतील पक्षांनी अर्ज भरलेले मतदारसंघ**

मिरज : शिवसेना ठाकरे गट -तानाजी सातपुते, काँग्रेस - मोहन वनखंडे. सांगोला - शिवसेना ठाकरे गट दीपक आबा साळुंखे, शेकाप - बाबासाहेब देशमुख. दक्षिण सोलापूर - काँग्रेस - दिलीप माने, शिवसेना ठाकरे गट - अमर पाटील. पंढरपूर - काँग्रेस भागीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष अनिल सावंत. परांडा- शिवसेना ठाकरे गट रणजीत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष -राहुल मोटे. दिग्रस- शिवसेना ठाकरे गट - पवन जैस्वाल, काँग्रेस -माणिकराव ठाकरे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

दिनांक :- २९-१०-२०२४.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशील सौ. विद्या रघुनाथ म्हात्रे, राहणार घर नं.१३९, दुसरी गल्ली, तोडकरी हॉस्पिटल जवळ, श्रीबाग नं.२, मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड (मो.नं.९३०९७०४७०५) यांनी खाली वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे टायटल व्हेरीफाय करण्यासाठी मला सुचना दिल्या आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) | भू-धारणा पध्दती |
|---|---|---|---|---|
| कांडवीरा, ता. अलिबाग, जि. रायगड | १२/१ | ०-४२-००<br>पो.ख. ०-००-३०<br>एकूण ०-४२-३० | ५-३१ | भोगवटा दार वर्ग-१ |

आमच्या अशीलांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाबरोबरही व्यवहार केलेला नाही. तरी देखील सदर जमीन मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्याचा कोणाचाही दावा असल्यास, तसेच त्यांच्या लाभात गहाण, दान, भाडे, फरोक्त, भागीदार, बक्षिस, मृत्यूपत्र, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, पोटगीहक्क, वहिवाटीचा हक्क वगैरे प्रकारचे दस्त केले असल्यास त्यांनी खाली सही करणार यांच्याकडे सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत त्यांच्या हक्काविषयीची कागदपत्रे घेवून हजर राहण्याचे आहे. जर उक्त मुदतीत कोणीही म्हणणे मांडले नाही तर त्यांनी तसा हक्क असूनही तो विद्यमान मालकांच्या लाभात सोडून दिला आहे असे गृहित धरून व सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे असे समजून सदर जमीन मिळकतीच्या संदर्भात खरेदी व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार आल्यास ती आमच्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दिनांक : २९-१०-२०२४.

सही/-
**(ॲड. अमर अशोक घरत)**
मु.पो.- थळ, ता.- अलिबाग,
जिल्हा-रायगड.
मो-८८०५०३७४७४.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरसोली ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत व त्या मिळकतीचे मालक/कब्जेदाराकडून आमचे अशिल कायम स्वरूपी खरेदी करण्याच्या विचारात आहेत. तशा प्रकारची बोलणी विद्यमान मालकांबरोबर चालू आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग, जि. रायगड | ६५/११ | ०-०६-८० | १.१९ |

टिप :- वरील नमुद मिळकतीचे भोगवटादार या रकान्यात विनित वसंत कार्लेकर यांचे नाव नमुद आहे. त्यांच्याबरोबर त्यांच्या मालकीचे क्षेत्र हे या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

वर नमुद केलेल्या सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्न, वस्त्र, साठेकरार, कोर्ट जप्ती अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदपत्रे घेऊन येऊन हरकती नोंदवून खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही.
कळावे.

अलिबाग,
तारीख : २९/१०/२०२४

सही/-
**(ॲड. सचिन दिनकर पाटील)**
बी.ए.एल.एल.बी(मुंबई)
२१ पारिजात सोसायटी चेंढरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९२२६८७२६९०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या परिशिष्ट १ व परिशिष्ट २ मध्ये नमूद मिळकतींवरील सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ. झमेना पटेल व श्री अल्ताफ लतिफ पटेल, दोघेही रा. १५बी १, वुडलॅण्ड, ६७ पेडर रोड, मुंबई ४०००२६, यांचा मालकीहक्क निर्वेध आहे किंवा कसे? याची खातरजमा करणेकरीता आणि तसा दाखला देणेकरीता खाली सही करणार यांना विनंती केली आहे. सदर मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, विकसनाचा हक्क, अदलाबदल, वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर प्रमाणित कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतींवरील तथाकथीत हक्क सोडून दिले आहेत आणि मिळकतीवर विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कसलाही मालकीहक्क, अधिकार नाही आणि सदरहू मिळकती निर्वेध आहेत असे समजून सदर मिळकती निर्वेध असल्याचा दाखला जारी करण्यात येईल आणि त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वास कळावे.

**मिळकतीचे वर्णन**
**परिशिष्ट १**
**मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील-**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी रू. पै. |
|---|---|---|
| ५१९/१ | ०-२१-३०<br>पो.ख.०१-०१-००<br>०-२२-३० | ३-०० |

तसेच वर नमूद मिळकतीमधील सासवणे ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक १९०६

सदर मिळकतीच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहेत.
उत्तर : गाव रस्ता व गट नंबर ५१८
दक्षिण : गाव रस्ता
पूर्व : सरकारी जागा
पश्चिम : गट नंबर ५२० व गट नंबर ५२५

**परिशिष्ट २**
**मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी रू.पै. |
|---|---|---|
| ५१९/२ | ०-२८-३०<br>पो.ख.०-०१-७०<br>०-३०-०० | ३-६५ |

तसेच वर नमूद मिळकतीमधील सासवणे ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक १९०७

सदर मिळकतीच्या चतु:सिमा पुढीलप्रमाणे आहेत.
उत्तर : गाव रस्ता व गट नंबर ५१८
दक्षिण : गाव रस्ता
पूर्व : सरकारी जागा
पश्चिम : गट नंबर ५२० व गट नंबर ५२५

अलिबाग,
दिनांक- २८/१०/२०२४

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
पत्ता: ''गुरूकृपा'', महर्षी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँकेचे शेजारी,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. मोहन मारोतराव सांटूनकर यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे ताडवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेती जमीन मिळकत सर्व्हे नं १०२/२२१ एकुण ०.०३.१३ गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी बिनशेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ५ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ३०/१०/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर हरकत

सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, माझ्या अशिल श्रीमती सरस्वती पांडूरंग ठाकूर, राहणार वेलवली, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, ह्यांनी दिलेल्या माहितीवरून व दर्शविलेल्या कागदपत्रांवरून सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वढाव बुद्रुक, ता. अलिबाग, येथिल खालील नमूद वर्णनाची शेतजमीन मिळकत माझ्या अशिलांच्या वडीलार्जित मालकी हक्काची असून, सदर मिळकतीमध्ये माझ्या अशिलांचा अविभक्त हिस्सा, हक्क व अधिकार आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वढाव बुद्रुक, ता. अलिबाग | २०३ | १-०२-४०<br>पो.ख.०-०४-८०<br>एकूण १-०७-२० | १०-०० |

वर नमूद मिळकत माझ्या अशिलांचे वडील कै. गोपाळ जानू पाटील यांच्या मालकीची होती, कै. गोपाळ जानू पाटील यांचे सन १९७९ मध्ये निधन झाले असून, त्यांच्या पश्चात त्यास श्री. लक्ष्मण गोपाळ पाटील व श्रीमती सरस्वती पांडूरंग ठाकूर असे वारस आहेत. कै. गोपाळ जानू पाटील यांच्या पश्चात सदर जमिन मिळकतीमध्ये माझ्या अशिलांचा कायदेशीर हक्क व अधिकार असून, सदरील मिळकतीमधील त्यांनी त्यांचे हक्क व अधिकार तोंडी अथवा रजिस्टर्ड हक्कसोडपत्राद्वारे कधीही कोणाच्याही लाभांत सोडून दिलेले नव्हते व नाही, असे असताना देखिल माझ्या अशिलांचे कायदेशीर हक्क डावलून सदर जमिन मिळकत माझ्या अशिलांचे भाऊ कै. लक्ष्मण गोपाळ पाटील यांनी एकट्याच्या नावे करून घेतल्याची माहिती माझ्या अशिलांस मिळाली आहे, त्याबाबत उचित ती न्यायालयीन कार्यवाही माझे अशिल करणार आहेत.

दरम्यानच्या कालावधीत माझ्या अशिलांचे हक्क डावलून कै. लक्ष्मण गोपाळ पाटील यांचे वारस श्री. राजेंद्र लक्ष्मण पाटील, वगैरे ६ हे सदर मिळकत त्रयस्थ व्यक्तिंस विकण्याचा प्रयत्न करीत आहेत. सबब, कोणीही फसवणूकीला बळी पडून वर नमूद मिळकतीबाबत बेकायदेशीर खरेदी व्यवहार करू नये, या करीता सदरची जाहीर सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे. याउपरही कोणीही वर नमूद मिळकती संदर्भात कोणत्याही प्रकारचे व्यवहार केल्यास ते व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच, नाईलाजास्तव माझे अशिलांस सदर जमिन खरेदीदारांविरूध्द उचित ती दिवाणी अथवा फौजदारी कार्यवाही करणे भाग पडेल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : २९/१०/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
हरकतदारांचे वकील

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक हरिश्चंद्र आबा भाने यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे सापेले, ता . कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३२ | ११ | ०-१४-०० | ०-१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/१०/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## PUBLIC NOTICE

**NOTICE** is hereby given that our clients are investigating the right, title and interest of **i) Gita Kumarchand Shah ii) Nilam Prakash Shah iii) Manoj Kumarchand Shah iv) Sadhana Prakash Shah v) Sayali Sudhir Mehata** being the owners of all that peace and parcel of Agricultural land bearing **Bhumapan No. & Upvibhag 4/1/3/B admeasuring Jirayat Area 0-99-00 H-R-P Pot Kharaba 0-32-00 aggregating to 1-31-00 H-R-P assessed at Rs.2.10 laying, being and situate at Village Mandawe Tarphe Zirad, Taluka Alibag, District Raigad (hereinafter referred to as the "Property")** more particularly described in the Schedule hereunder written in the jurisdiction of Saja Dhokawade.

ALL persons/entities having or claiming to have any share, right, title claim or interest in respect of the Property more particularly described in the Schedule hereunder written whether by way of sale, transfer, assignment, exchange, let, lease, license, mortgage, (equitable or otherwise) inheritance, occupation, gift, lien, charge, development rights, maintenance, easement, trust, covenant, or condition, release relinquishment or any other method through any agreement, contract, deed, document, writing, conveyance deed, bequest, succession, family arrangement/settlement, litigation, decree, or order or award of any court of law or tribunal or revenue or statutory authority or arbitration or otherwise howsoever of any nature whatsoever into out of or upon the Property or any part thereof, are hereby required to make the same known in writing, along with documentary evidence, to the undersigned at the address mentioned below within 15 (fifteen) days from the date hereof, failing which the transaction shall be completed without reference to such claim/claims and the claims, if any, of such person shall be treated as waived and not binding on our clients.

**THE SCHEDULE ABOVE REFERRED TO**

all that peace and parcel of Agricultural land bearing Bhumapan **No. & Upvibhag 4/1/3/B admeasuring Jirayat Area 0-99-00 H-R-P Pot Kharaba 0-32-00 aggregating to 1-31-00 H-R-P assessed at Rs.2.10 laying, being and situate at Village Mandawe Tarphe Zirad, Taluka Alibag, District Raigad** and bounded as under:
On or towards East: 4/1/4 Purushottam Wasudev Warde & Santosh Wasudev Warde
4/1/6 Purushottam Wasudev Warde
4/1/8 Purushottam Wasudev Warde
On or towards West: 4/1/3/A/1 Sachin Jagannath Gharat
4/1/3/A/2 Aaresh Nariman Patel
On or towards South: 5/2 Gita Kumarchand Shah & Others
On or towards North: by Alibag-Rewas road

Dated this 30th day of October, 2024

**Milind G. Chavan, Advocate**
8, Anand Apts, Shreebag No.3,
Alibag, Tal. Alibag, Dist. Raigad

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांचे कार्यालय

कार्यालयीन पत्ता : सहकार नगर, मार्केट यार्ड, दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस
जा. क्र. : सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कलम १०१/२८.१०.२०२४

**दि अण्णासाहेब सावंत को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि.**
**कपालेश्वर महादेव चौक, महावीर मार्ग, कर्जत, जि. रायगड, ४१०२०१**

विरूध्द

अनुक्रमांक १ ते ८

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकीत कर्जाविषयी अर्जदार बँकेने दाखल केलेल्यां वसुली अर्जाबाबत आपले म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण राहत नसल्याने तसेच आपला सध्याचा पत्ता उपलब्ध नसल्याने सदर नोटीसद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून दिनांक ०५/११/२०२४ दुपारी ३.०० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत या कार्यालयात हजर राहून आपले म्हणणे नमुद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण नोंद घ्यावी.

| अं.क्र | जाब देण्याचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा क्रमांक | दावा रक्कम | जामिनदार क्र.१ | जामिनदार क्र.२ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. खंडु बाबुराव हातागळे | ३०/०७/२०२४ | ७७१/५ | ११८८५१ | सौ. संजिवनी विष्णु पाटील | सौ. आरती विजय शर्मा |
| २ | श्री. रमेश नामदेव कांबरी | ३०/०७/२०२४ | ७७१/२ | ८१३७८८ | श्री. यशवंत बळीराम मुंढे | श्री. समीर काशिनाथ कडूसकर |
| ३ | सौ. सरीता सतिष भासे | ३०/०७/२०२४ | ७७१/८ | १७६२७८ | श्री. प्रविण मारूती पाटील | सौ. सविता विलास लाड |
| ४ | सौ. कविता खंडु हातागळे | ३०/०७/२०२४ | ७७१/९ | १५४८१६ | सौ. संजिवनी विष्णु पाटील | सौ. आरती विजय शर्मा |
| ५ | श्री. अंकुश रामचंद्र वाडेकर | ३०/०७/२०२४ | ७७१/४ | ७०४५४४ | श्री. समीर बाळु बोराडे | श्री. कैलास बळीराम भालेकर |
| ६ | श्री. अंकुश रामचंद्र वाडेकर | ३०/०७/२०२४ | ७७१/१ | १२११६३ | श्री. समीर बाळु बोराडे | श्री. कैलास बळीराम भालेकर |
| ७ | श्री. प्रविण भास्कर भगत | ३०/०७/२०२४ | ७७१/६ | ६०४५१५ | श्री. शंकर महादू बुंधाटे | श्री. चंद्रकांत शंकर भासे |
| ८ | श्री. समीर काशिनाथ कडूसकर | ३०/०७/२०२४ | ७७१/३ | १६६२१५३ | श्री. विनोद शांताराम बडेकर | श्री. यशवंत बळीराम मुंढे |
| ९ | श्री. गणेश मालु बडेकर | ३०/०७/२०२४ | ७७१/७ | ४९२८७९ | श्री. अमोल केशव कालेकर | श्री. प्रविण विष्णू शेलार |
| १० | श्री. प्रणव प्रकाश गांगल | ३०/०७/२०२४ | ७७१/१० | ९४९३६ | श्री. प्रदिप राघो पवार | श्री. सुमन कौशल गुप्ता |

ही नोटीस आज दिनांक २८/१०/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.
स्थळ : कर्जत
दिनांक : २८/१०/२०२४

**शिक्का**

सही /-
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय**

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांचे कार्यालय

कार्यालयीन पत्ता: सहकार नगर, मार्केट यार्ड, दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड- ४१० २०१
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस
जा.क्र.: सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कलम १०१/२८.१०.२०२४

**दि अण्णासाहेब सावंत को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि.**
**अंबिका नाका, नेरळ माथेरान मार्ग, नेरळ पिन : ४१०१०१**

विरूध्द

अनुक्रमांक १ ते ८

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकीत कर्जाविषयी अर्जदार बँकेने दाखल केलेल्या वसुली अर्जाबाबत आपले म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण राहत नसल्याने तसेच आपला सध्याचा पत्ता उपलब्ध नसल्याने सदर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून दिनांक ०५/११/२०२४ दुपारी ३.०० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत या कार्यालयात हजर राहून आपले म्हणणे नमुद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण नोंद घ्यावी.

| अ.क्र | जाब देणाऱ्याचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा क्र | दावा रक्कम | जामिनदार क्र १ | जामिनदार क्र २ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. प्रेमनाथ मारुती घारे | ३०/०७/२०२४ | ७७०/९ | १,०१,३९०/- | श्री. परशुराम बळीराम धुळे | श्री. अरुण लक्ष्मण भयारे |
| २. | सौ. मनीषा विजय घरत | ३०/०७/२०२४ | ७७०/३ | १,९४,३५४/- | श्री. शिरीष गंगाराम शिंदे | श्री. भगवान अनंता जाधव |
| ३. | श्री. विशाल पोशीराम गायकवाड | ३०/०७/२०२४ | ७७०/२ | ५२,३२८/- | श्री. संजय शरद गवळी | श्री. सुनील बारकू कराळे |
| ४. | श्री. जयवंत पटू शिंगे | ३०/०७/२०२४ | ७७०/५ | ५८,५४८/- | श्री. यशवंत विटू मोरे | श्री. संदीप नागो शिनारे |
| ५. | श्री. कैलास विष्णु पवार | ३०/०७/२०२४ | ७७०/१ | १,२१,१७९/- | श्री. सतीश सदाशिव जाधव | श्री. निशांत भोळेनाथ पाटील |
| ६. | श्री. संतोष मायाराम जावळे | ३०/०७/२०२४ | ७७०/८ | १,७७,९५५/- | सौ. नंदिनी पराग साळुंखे | श्री. मोहन दत्तात्रय फुटाणकर |
| ७. | सौ. नम्रता अतुल खांगटे | ३०/०७/२०२४ | ७७०/४ | ५५,२३२/- | सौ. रेशम राजाण गोरे | श्री. निसार हाजी अहमद जलगावकर |
| ८. | सौ. उषा मंगेश पार्टे | ३०/०७/२०२४ | ७७०/७ | ५४,४०९/- | श्री. संतोष किसन मोरे | श्री. दिनेश किसन मोरे |

हि नोटीस आज दि. २८/१०/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे
स्थळ : कर्जत
दिनांक :२८/१०/२०२४

**शिक्का**

सही /-
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल डॉ. श्री. नारायण बाळाराम गावंड रा. धोकवडे (भाग), पो.धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड व रा. प्लॉट नं.२२६, वाशी गाव, ता.जि.ठाणे यांची स्वकष्टार्जीत मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | जुना सर्व्हे नं. | गट नंबर | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| धोकवडे, ता.अलिबाग, जि. रायगड. | १७६/१अ/१/१ | ३६५ | १-४२-५०<br>पो.ख. ०-०८-३०<br>एकूण १-५०-८० | २.९३ |

मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १३३, १२८/ब३, १२८/२/अ/१, १७०, १२८/अ, ३६५, १४४/अ, १२८ब/२, १४४/२ या वडिलोपार्जित मिळकतींचे जानकी बाळाराम गावंड, कृष्णा बाळाराम गावंड, नारायण बाळाराम गावंड, दत्तात्रेय बाळाराम गावंड, गजानन बाळाराम गावंड व वंदना कृष्णा कडवे यांच्यामध्ये दि.०४/१२/१९८९ रोजी सरस-निरस वाटप झाले. तशी फेरफार नं. १०५ ने नोंद झाली. वाटपानुसार गट नं.३६५ ही मिळकत जानकी बाळाराम गावंड हिच्या हिश्श्यास आली. त्यानंतर गट नं.३६५ ही मिळकत दि.२७/०३/१९९२ रोजी जानकी बाळाराम गावंड हिने तिचा मुलगा नारायण बाळाराम गावंड याच्या लाभांत अर्ज, वर्दी व जबाबाप्रमाणे कायमस्वरुपी दिली. तशी फेरफार नं. १७८ ने नोंद झाली. सन १९९२ पासून आजतागायत गट नं. ३६५ ही मिळकत डॉ. श्री. नारायण बाळाराम गावंड यांच्या ताबेकब्जे वहिवाटीत व कसवणूकीत असून मालकी हक्कात आहे. तशी ७/१२ दप्तरीसुध्दा नोंद आहे.

गट नं. ३६५ या मिळकतीसंदर्भात मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या कोर्टात फेरफार नं.१०५ व १७८ हे गजानन बाळाराम गावंड यांनी आर. टी.एस. अपिल क्र.१६/१९९८ ने आव्हानित केले. मा. उपविभागीय अधिकारी अलिबाग यांनी सदरहू अपिल हे फेटाळले. त्यानंतर मा.उप जिल्हाधिकारी रायगड यांच्या कोर्टात आर. टी. एस. अपिल क्र.२२/२००० ने अपिल दाखल झाले व ते सुध्दा फेटाळण्यात आले. तसेच मा.कोकण कमिशनर मुंबई यांच्या कोर्टात आर.टी.एस. रिव्हीजन क्र. ९३/२००० ने रिव्हीजन दाखल झाले व ते सुध्दा फेटाळण्यात आले व फेरफार नं.१०५ व फेरफार क्र.१७८ हे कायम करण्यात आले.

कृष्णा बाळाराम गावंड व इतर यांनी गट नं.३६५ व इतर मिळकतींसदर्भात अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात रेग्युलर मुकदमा नं. ४२/१९९८ ने वाटपाकरीता दावा दाखल केला. तो दावा मंजूर करण्यात आला, रेग्युलर मुकदमा नं. ४२/१९९८ मधील आदेशाविरुध्द डॉ. श्री. नारायण बाळाराम गावंड यांनी मा. जिल्हा न्यायाधिश रायगड यांच्या कोर्टात क्र.२२९/२००१ ने दिवाणी अपिल दाखल केले. त्याचा निकाल दि.०५/०४/२००५ रोजी होवून ते अंशत: मंजूर करण्यात आले व वडिलोपार्जित मिळकतीपैकी फक्त गट नं. ३६५ या मिळकतीमध्ये वारसांचा अविभक्त हिस्सा आहे असे जाहीर केले.

कृष्णा बाळाराम गावंड व इतर यांनी पहिले दिवाणी अपिल क्र.२२९/२००१ मधील दि.०५/०४/२००५ रोजीच्या आदेशाविरुध्द डॉ.श्री.नारायण बाळाराम गावंड यांच्या विरुध्द मुंबई येथील उच्च न्यायालयात दुसरे सिव्हील अपिल क्र.१२७७/२००५ ने सन २००५ मध्ये अपिल दाखल केले. सदरहू अपिल हे प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहे.

दुसरे सिव्हील अपिल क्र.१२७७/२००५ हे मुंबई येथील उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असताना कृष्णा बाळाराम गावंड, नारायण बाळाराम गावंड, दत्तात्रेय बाळाराम गावंड, गजानन बाळाराम गावंड व वंदना कृष्णा कडवे यांनी मौजे धोकवडे येथील गट नं. ३६५, एकूण क्षेत्र १-५०-८० हे.आर., आकार २९३ रु. पै. या मिळकतीपैकी १-२०-०० हे. आर. इतक्या क्षेत्राच्या मिळकतीसंदर्भात रमेश हिरानंद कुंदनमल व इतर यांच्या बरोबर दि.०७/०७/२००७ रोजी अनरजिस्टर्ड साठेकरार केला.

रमेश हिरानंद कुंदनमल व इतर यांनी दि. ०७/०७/२००७ रोजीच्या साठेकराराच्या अनुषंगाने साठेकराराची विशेष पुर्तता करुन मिळणेकरीता व इतर मागण्यांकरीता अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात स्पेशल मुकदमा नं. १३९/२००८ ने दावा दाखल केला. दावा दाखल केल्यानंतर दाव्यातील प्रतिवादी नं.१ ते ३ गजानन बाळाराम गावंड, दत्तात्रेय बाळाराम गावंड व कृष्णा बाळाराम गावंड हे मयत झालेले आहेत. त्यानंतर त्यांच्या वारसांची नावे सदरहू दाव्यामध्ये सामिल झालेली आहेत.

अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांच्या कोर्टात स्पेशल मुकदमा नं.१३९/२००८ व मुंबई उच्च न्यायालयातील दुसरे सिव्हील अपिल क्र.१२७७/२००५ ही दोन्ही प्रकरणे प्रलंबित असताना रमेश हिरानंद कुंदनमल व इतर (स्पेशल मुकदमा नं. १३९/२००८ मधील वादी) व गजानन बाळाराम गावंड, दत्तात्रेय बाळाराम गावंड, कृष्णा बाळाराम गावंड यांचे वारस व श्रीमती वंदना कृष्णा कडवे (प्रतिवादी नं.१ ते ४) हे संगनमताने गट नं.३६५, एकूण क्षेत्र १-५०-८० हे. आर. या मिळकतीपैकी १-२०-०० हे.आर. इतक्या क्षेत्राची मिळकत ही त्रयस्थ इसमांस विकण्याच्या विचारात आहेत असे आमच्या अशिलांस खात्रीलायक समजले.

मौजे धोकवडे येथील गट नं. ३६५, एकूण क्षेत्र १-५०-८० हे. आर., ही संपुर्ण मिळकत दि. २७/०३/१९९२ रोजी डॉ. श्री. नारायण बाळाराम गावंड यांच्या मालकीची झालेली आहे व तशी ७/१२ दप्तरी सन १९९२ पासून ते सन २०२४ सालापर्यंत नोंद आहे.

मौजे धोकवडे येथील गट नं. ३६५, एकूण क्षेत्र १-५०-८० हे. आर. या मिळकतीसंदर्भात अलिबाग येथील दिवाणी न्यायालयात स्पेशल मुकदमा नं.१३९/२००८, रेग्युलर दरखास्त नं.१४/२००५, रेग्युलर दरखास्त नं.१८/२००७, स्पेशल दरखास्त नं. १२/२०१३ व मुंबई उच्च न्यायालयातील दुसरे सिव्हील अपिल क्र. १२७७/२००५ अशी प्रकरणे प्रलंबित असून न्यायप्रविष्ठ आहेत.

तरी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ३६५, एकूण क्षेत्र १-५०-८० हे. आर., आकार २९३ रु. पै. या मिळकतीसंदर्भात रमेश हिरानंद कुंदनमल व इतर व मयत गजानन बाळाराम गावंड, मयत दत्तात्रेय बाळाराम गावंड, मयत कृष्णा बाळाराम गावंड यांचे वारस व श्रीमती वंदना कृष्णा कडवे यांच्याबरोबर कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा अथवा हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. तसा कुणीही, अथवा त्रयस्थ इसमांनी मिळकतीसंदर्भात हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी व व्यवहाराच्या अनुषंगाने आमचे अशिल हे त्यांच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २९/१०/२०२४

**ॲड. विकास एम.प्रधान**
रुम नं. १, तळ मजला,
मोहन सोसायटी, अलमेडा रोड,
पाच पाखाडी, ठाणे (पश्चिम),
ता.जि.ठाणे
मो.नं.९९८७५५३७१२

# रायगड, नंदुरबारचा शानदार विजय

## राज्य अजिंक्यपद, निवड चाचणी २०२४

**। धाराशिव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर सुवर्ण महोत्सवी कुमार व कुमारी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा पार पडत आहे. या स्पर्धेतील कुमारी गटात नंदुरबारने छत्रपती संभाजीनगरचा ६-१ असा पाच गुणांनी पराभव केला. तसेच, रोहिणी गावित हिने सलामीचा दिवस गाजविला. तिने पहिल्या डावात ८:४० मिनिटे व दुसऱ्या डावात नाबाद ९:०० मिनिटे संरक्षण केले आहे.



कुमारी गटाच्या दुसऱ्या सामन्यात रायगडने लातूरला १६-१४ असे २ गुणांनी नमविले आहे. यावेळी मध्यंतराची ६-५ ही एका गुणाची आघाडीच रायगडला विजय मिळवून देऊन गेली आहे. यावेळी संजीवनी जगदाळे हिने २:०० मिनिटे नाबाद पळती करीत आक्रमणात सहा गडी बाद केले. तसेच, लातूरच्या पायल माने हिची लढत अपुरी पडली. तिने आपल्या धारदार आक्रमणात सात गडी बाद करीत १:१० मिनिटे संरक्षण केले. यानंतरचे सर्व सामने एकतर्फी झाले आहेत.

कुमार गटात धुळ्याने छत्रपती संभाजीनगरला २१-१८ असे तीन गुणांनी नमविले आहे. मध्यंतराची ११-९ ही ३ गुणांची आघाडीनेच त्यांना विजय मिळवून दिला आहे. त्यांच्या कुणाल शेटे याने दोन व एक मिनिटे नाबाद पळती करत दोन गडी बाद केले. अभिषेक गावित याने १:५० व १:२० मिनिटे संरक्षण करीत तीन गडी बाद केले. दुसऱ्या सामन्यात रायगडने सिंधुदुर्ग १७-१३ अशी चार गुणांनी मात केली आहे. भावेश गोवलीकर रायगडच्या विजयाचा शिल्पकार ठरला आहे. त्याने या सामन्यात पाच गडी बाद करीत १:०० व १:२० मिनिटे यशस्वी पळती केली आहे. सिंधुदुर्गच्या अथर्व शिंदे याची खेळी अपुरी पडली.

### उप उपांत्यपूर्व फेरीतील सामने

कुमार गट :-
सोलापूर वि. बीड, धुळे वि. अहमदनगर, नाशिक वि. रत्नागिरी, रायगड वि. सांगली, धाराशिव वि. सातारा, नंदुरबार वि. मुंबई, ठाणे वि. मुंबई उपनगर, जालना वि. पुणे.

कुमारी गट:-
धाराशिव वि. नंदुरबार, अहमदनगर वि. रत्नागिरी, मुंबई उपनगर वि. पालघर, धुळे वि. ठाणे, सांगली वि. जालना, रायगड वि. पुणे, सोलापूर वि. मुंबई, सातारा वि. नाशिक.

# रजत पाटीदारचे झंझावाती शतक

**। इंदौर । वृत्तसंस्था ।**

रजत पाटीदारने रणजी करंडक स्पर्धेमध्ये हरियानाविरुद्ध झंझावाती शतक झळकावले आहे. मध्य प्रदेशकडून खेळताना रजतने दुसऱ्या डावात १०२ चेंडूत १५९ धावांची खेळी केली आहे. त्याने केवळ षटकार आणि चौकारांच्या जोरावर २० चेंडूंत ९४ धावा ठोकल्या आहेत. रजतने त्याच्या खेळीत १३ चौकार आणि ७ षटकार खेचले असूनअवघ्या ६८ चेंडूत शतक झळकावले आहे. हे रणजी स्पर्धेतील चौथे जलद शतक ठरले आहे.



मध्य प्रदेशला पहिल्या डावात ३०८ धावा करता आल्या. हिमांशू मंत्रीने सर्वाधिक ९७ धावा केल्या होत्या. त्याला शुभम शर्मा (४४), हरप्रीत सिंग भाटीया (४८) यांची साथ मिळाली. प्रत्युत्तरात हरियानाने लक्ष्य दलाल (१०५), हर्षित राणा (९०) व धीरू सिंग (९४) यांच्या दमदार खेळीच्या जोरावर ४४० धावा केल्या. पहिल्या डावात १५ धावा करणाऱ्या रजतने दुसऱ्या डावात वादळी फटकेबाजी केली. त्याने १०२ चेंडूंत १३ चौकार व ७ षटकारांच्या मदतीने १५९ धावा केल्या. हरप्रीतने ४४, शुभम शर्माने नाबाद ३८ धावांची खेळी केली. सागर सोलंकी ( ३२) वेंकटेश अय्यर ( २८) या सलामीवीरांनीही आक्रमक खेळ केला.

## ‘आईस- कोल्ड’ सेलिब्रेशन

**। चितगावला । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिका सध्या बांगलादेश दौऱ्यावर असून कसोटी मालिका खेळत आहे. या मालिकेतील दुसरा सामना चितगावला मंगळवारी (दि.२९) सुरू झाला आहे. या सामन्याचा पहिलाच दिवस सलामीवीर टोनी दी झोर्झी आणि ट्रिस्टन स्टब्सने गाजवला. या दोघांनीही पहिल्याच दिवशी शतकं साजरी केली आहेत. त्याने काही विक्रमही नावावर केले आहेत. झोर्झीने १४६ चेंडूत शतक साजरे केले. हे त्याचे पहिले कसोटी शतक ठरले. त्याने हे शतक करतात अनोखे 'आईस-कोल्ड' सेलिब्रेशनही केले.

# चेतनाची चमकदार कामगिरी

**। हरेरा । वृत्तसंस्था ।**

अमेरिकेचा महिला क्रिकेट संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर आहे आणि त्यांनी पाचव्या एकदिवसीय सामन्यात दणदणीत विजयाची नोंद केली आहे. झिम्बाब्वेच्या २४६ धावांचा यशस्वी पाठलाग अमेरिकेच्या संघाने ४४.२ षटकांत केला आहे. या सामन्यात १६ वर्षाची चेतना पगीद्याला ने चमकदार कामगिरी केली आहे. तिने पदार्पणाच्या एकदिवसीय सामन्यात १५२ चेंडूंत १८ चौकारांच्या मदतीने १३६ धावांची खेळी केली. तिने चौकारांनीच ७२ धावा ठोकल्या आणि अमेरिकेच्या महिला संघाकडून हा मोठा विक्रम आहे. यापूर्वी दिशा ढिंग्राने ३२ धावा चौकारांनी केल्या होत्या.



दरम्यान, दिशा आणि चेतना यांनी ११६ धावांची भागीदारी केली आणि अमेरिकेकडून कोणत्याही विकेटसाठीची ही सर्वोत्तम भागीदारी ठरली आहे. यापूर्वी दिशा व गार्गी भोगले यांनी ८७ धावा जोडल्या होत्या. दिशा (३४) व चेतना (१३६) यांच्याशिवाय सिंधू श्रीहर्षाने ३५ धावांचे योगदान दिले, तर संघाला २८ अतिरिक्त धावा मिळाल्या आहेत. झिम्बाब्वेकडून चिपो मुगेरी-तिरिपानो (६०), मोडेस्टर मुपाचिक्का (५९) व कर्णधार जोशेफिन एनकोमो (४०) यांनी चांगला खेळ केला आहे.

## श्रीवर्धनच्या विद्यार्थ्यांचे ‘सुवर्ण’ यश

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**


कराटे इंडिया ऑर्गनायझेशनच्या विद्यमाने तसेच कराटे असोसिएशन महाराष्ट्र आयोजित महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर कराटे स्पर्धेचे सोमवारी (दि.२८) पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकुल येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत श्रीवर्धन चॅम्पियन्स कराटे क्लबचे विद्यार्थी स्मरणिका गणेश भुते आणि विहान दर्शन विचारे या दोघांनी कुमिते या प्रकारात सुवर्णपदक पटकाविले आहे. आता या दोन्ही खेळाडूंची दिल्ली येथे होणाऱ्या किओ राष्ट्रीय मान्यताप्राप्त स्पर्धेकरीता निवड झालेली आहे.

# भारत ऑस्ट्रेलिया संघात चढाओढ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताला दुसऱ्या सामन्यात पराभव पत्करावा लागला. न्यूझीलंडने तीन सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. यामुळे भारतीय संघाचे टेन्शन वाढले आहे. या पराभवामुळे भारताची जागतीक कसाटी अजिंक्यपद अंतिम सामन्यातील वाट बिकट होण्याची शक्यता आहे.

दुसऱ्या कसोटी सामन्याआधी भारताचे ६८.०६ गुण झाले होते. पण पराभवानंतर आता ६२.८२ पॉइंट झाले आहेत. भारतानंतर गुणतालीकेत ऑस्ट्रेलिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. जागतीक कसोटी अंजिक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील शर्यत रंगतदार होणार आहे. अद्याप पाच संघ या शर्यतीत आहेत. फक्त वेस्ट इंडिज, इंग्लंड आणि बांगलादेश हे संघ अंतिम सामन्याच्या शर्यतीतून बाद झाले आहेत. जो संघ ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवेल तो अंतिम सामन्यात पोहोचण्याची शक्यता आहे. भारताने गेल्यावेळी ५८.८ टक्के गुणांसह अंतिम फेरी गाठली होती. यावेळी भारताला ऑस्ट्रेलियाकडून २०९ धावांनी पराभूत व्हावे लागले होते.




### किवी, कांगारूंना नमवणे गरजेचे

**जागतिक कसोटी अंजिक्यपद स्पर्धेतील भारताच्या ६ कसोटी शिल्लक आहेत. यातील तीन कसोटी जिंकल्या आणि तीन गमावल्या तर भारताचे गुण ५८.७७ इतके होतील. असे झाल्यास ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड बाजी मारू शकतात. भारताला जर अंतिम सामना खेळायचा असेल तर न्यूझीलंडविरुद्धची शेवटची कसोटी जिंकावी लागेल. यानंतर ऑस्ट्रेलियाला पुढच्या कसोटी मालिकेत हरवावे लागेल. यामुळे भारताचे गुण ६४.०४ टक्क्यांच्या वर राहतील.**

# मॅथ्यू वेडची निवृत्तीची घोषणा

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने ॲरॉन फिंचच्या नेतृत्वात २०२१ साली पहिल्यांदा टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले आहे. ऑस्ट्रेलियाच्या या विजयात मोलाचा वाटा यष्टीरक्षक फलंदाज मॅथ्यू वेडने उचलला होता. ऑस्ट्रेलियाला उपांत्य सामन्यात पाकिस्तानविरुद्ध विजय मिळवून देण्यात त्याचे मोठे योगादान होते. त्याने १७ चेंडूत ४ षटकारांसह नाबाद ४१ धावा केल्या होत्या. १९ व्या षटकात त्याने सलग ३ षटकार खेचत ऑस्ट्रेलियाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले होते. दरम्यान, आता मॅथ्यू वेडने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. मॅथ्यू वेडने त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत ३६ कसोटी, ९७ एकदिवसीय आणि ९२ टी-२० सामने खेळले आहेत. त्याने कसोटीत ४ शतकांसह १ हजार ६१३ धावा केल्या, तर एकदिवसीय सामन्यांत १ शतकासह १ हजार ८६७ धावा केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये त्याने ३ अर्धशतकांसह १ हजार २०२ धावा केल्या आहेत.



वेड आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर म्हणाला की, गेल्या टी-२० विश्वचषकानंतर माझे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील दिवस भरल्याची मला पूर्ण जाणीव आहे. माझ्या आंतरराष्ट्रीय निवृत्तीबाबत आणि कोचिंग याबाबत माझी सातत्याने जॉर्ज बेली आणि अँड्र्यू मॅकडोनल्ड यांच्याशी चर्चा झाली होती. याशिवाय त्याने असेही सांगितले की, कोचिंग करणे हे गेल्या काही वर्षांपासून रडारवर होते. तसेच, चांगल्या संधी मिळाल्याबाबत त्याने कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# रोद्री ठरला ‘डी'ओर’चा मानकरी

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**


पॅरिसमध्ये २८ ऑक्टोबर रोजी ६८ वा बॅलन डी’ओर पुरस्कार सोहळा पार पडला. या सोहळ्यासाठी पॅरिसमध्ये अनेक आजी-माजी दिग्गज फुटबॉलपटूंनी हजेरी लावली होती. या दिमाखदार सोहळ्यात मानाचा डी’ओर पुरस्कार देण्यात आला. यंदा पहिल्यांदाच दिग्गज लिओनल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डो यांना या पुरस्कारासाठी नामांकन मिळालेले नाही. दरम्यान, यंदा डी’ओर पुरस्काराचा मानकरी स्पेन आणि मँचेस्टर सिटी एफसी क्लबचा रोद्री हा ठरला आहे. त्याने हा पुरस्कार रियल माद्रिदच्या विनिसियर ज्युनियर आणि ज्युड बेलिंगघम यांना मागे टाकत जिंकला असून रोद्री हा मँचेस्टर सिटीचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. तसेच, लुका मॉड्रिकनंतर हा मानाचा पुरस्कार जिंकणारा रोद्री पहिला मिड-फिल्डर आहे.



# बोपण्णाची अंतिम फेरीत धडक

**। ट्यूरिन । वृत्तसंस्था ।**

भारतीय टेनिस स्टार रोहन बोपण्णा व ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू एब्डन यांनी ट्यूरिन येथे १० ते १७ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या स्पर्धेत एटीपी टेनिसच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. नॅथॅनियल लेमन्स आणि जॅक्सन विथरो ही जोडी रोलेक्स पॅरिस मास्टर स्पर्धेतून बाहेर पडल्यानंतर बोपण्णा व एब्डन यांच्या जोडीने स्पर्धेतील सहभाग निश्चित केला आहे.



बोपण्णा व एब्डन यांच्या जोडीने सलग दुसऱ्यांदा एटीपीच्या अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित केला आहे. गतवर्षी त्यांना मार्सेल ग्रॅनोलर्स आणि होरासिओ झेबॉलोस यांच्या जोडीने पराभूत केले होते. यामुळे रोहन बोपण्णा या स्पर्धेत विजेतेपदाच्या दृष्टिकोनातून खेळेल. यापूर्वी त्याने २०१२ मध्ये महेश भूपती व २०१५ मध्ये फ्लोरिन मर्झियासोबत खेळताना अंतिम फेरी गाठली होती.

## इंग्लंडचा कसोटी संघ जाहीर

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड संघाला २८ नोव्हेंबरपासून न्यूझीलंडमध्ये तीन कसोटी सामने खेळायचे आहेत. यासाठी इंग्लंडने मंगळवारी (दि.२९) न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखाली १६ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. इंग्लंडचा कसोटी संघ पुढीलप्रमाणे बेन स्टोक्स (कर्णधार), रेहान अहमद, गस ॲटकिन्सन, ब्रायडन कार्स, जॉर्डन कॉक्स (यष्टिरक्षक), झॅक क्रॉली, बेन डकेट, जॅक लीच, ऑली पोप, मॅथ्यू पॉट्स, हॅरी ब्रूक, जो रूट, ऑली स्टोन, ख्रिस वोक्स, शोएब बशीर, जेकब बेथेल.

# प्रज्ञाची केसरकरची अजिंक्य कामगिरी




**। पुणे । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर एअर रायफल क्लबची प्रज्ञा केसरकर (१०) हिने पुणे येथील बालेवाडी येथे झालेल्या ११व्या पश्चिम क्षेत्र नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत ४ पदके जिंकून सुयश प्राप्त केले आहे. या स्पर्धेत प्रज्ञा केसरकर हिने महिला एअर पिस्तूल, ज्युनिअर महिला एअर पिस्तूल आणि युवा महिला एअर पिस्तूल या स्पर्धांत सुवर्णपदक, सब युथ वुमन एअर पिस्तूल स्पर्धेत रौप्य पदक मिळवले आहे.

प्रज्ञा केसरकर हिने वयाच्या ८व्या वर्षापासून रायफल शूटिंगचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. सप्टेंबर २०२२ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर एअर राइफल क्लबमध्ये तिने मूलभूत अभ्यासक्रम पूर्ण केला. गेल्या २ वर्षांपासून ती दररोज २ तास सराव करते. प्रज्ञा केसरकर ही दादर, पश्चिम येथील छबीलदास शाळेची विद्यार्थिनी आहे.

# विल्यमसन तिसऱ्या कसोटीला मुकणार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंडचा क्रिकेटपटू केन विल्यमसन तिसऱ्या कसोटीला देखील मुकणार आहे. जांघेच्या दुखापतीने तो विश्रांती घेत आहे. किवी संघ २८ नोव्हेंबरला मायदेशात इंग्लंडबरोबर कसोटी मालिका खेळणार आहे. आणि तोपर्यंत तो तंदुरुस्त होईल अशी शक्यता वर्तवीली जात आहे. केन विल्यमसन आता बरा आहे. परंतु, इतका विमान प्रवास करून भारतात येऊन कसोटी खेळण्याइतका तो बरा नसल्याचे स्टेड यांनी सांगितले आहे. तसेच, विल्यमसनने १०० टक्के तंदुरुस्त व्हावे ही किवी संघाची प्राथमिकता असल्याचे देखील स्टेड यांनी सांगितले आहे. न्यूझीलंड संघ सध्या विल्यमसनच्या अनुपस्थितीत भारतात चांगली कामगिरी करत आहे. विल्यमसनची उणीव संघाला जाणवलेली नाही. पहिली कसोटी किवी संघाने ८ गडी राखून जिंकली. तर, दुसऱ्या पुणे कसोटीत त्यांनी भारतावर ११३ धावांनी विजय मिळवला आहे.



## भारतीय महिला संघाची घोषणा

# आशियाई अजिंक्यपद हॉकी करंडक स्पर्धा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

**आशियाई अजिंक्यपद हॉकी करंडक स्पर्धा ११ ते २० नोव्हेंबर या कालावधीत बिहार येथे रंगणार आहे. आशियाई करंडक स्पर्धेसाठी भारतीय महिला संघाची घोषणा करण्यात आली असून संघाचे नेतृत्व सलीमा टेटे हिच्याकडे सोपवण्यात आले आहे. तर, नवनीत कौर हिची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.**



भारतीय महिला संघाने २०१६ मध्ये पहिल्यांदाच या स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरले होते. यानंतर २०२३ मध्ये रांची येथे झालेल्या स्पर्धेतही भारतीय महिलांनी वर्चस्व प्रस्थापित केले होते. यंदा भारतीय संघ गतविजेता म्हणून हॉकीच्या मैदानात उतरणार आहे. यामुळे साहजिकच भारतीय महिला हॉकी संघावर दडपण असेल.

भारतीय महिला हॉकी संघाचा सलामीचा सामना मलेशियाविरुद्ध ११ नोव्हेंबरला रंगणार आहे. तसेच, या स्पर्धेत भारतासह चीन, जपान, दक्षिण कोरिया, मलेशिया व थायलंड संघाचा सहभाग आहे. स्पर्धेतील साखळी फेरीतील सर्वोत्तम चार संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. यानंतर उपांत्य फेरीतील विजेते संघ अंतिम फेरीत प्रवेश करतील.

> या संघात अनुभवी व युवा खेळाडूंचे योग्य मिश्रण आहे. मागील स्पर्धेत आम्ही यश मिळवले होते. यंदाही जेतेपद राखण्यासाठी आम्ही प्रयत्नांची शिकस्त करणार आहोत. अजिंक्यपद पटकावण्याचे लक्ष्य डोळ्यांसमोर असणार आहे.
> - सलीमा टेटे, कर्णधार, महिला हॉकी संघ

**हॉकी संघः-**
**गोलरक्षकः सविता, बिच्छू देवी खारीबाम. बचावपटूः उदिता, ज्योती, वैष्णवी फाळके, सुशीला चानू, इशिका चौधरी. मधली फळीः नेहा, सलीमा टेटे, शर्मिला देवी, मनीषा चौहान, सुनेलिता टोप्पो, लालरेमसियामी. आक्रमक फळीः नवनीत कौर, प्रीती दुबे, संगीता कुमारी, दीपिका, ब्युटी डुंगडुंग.**

# मुंबईत भारत ‘अजिंक्य’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय क्रिकेट संघ मुंबईत न्यूझीलंड विरुद्ध तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना खेळणार आहे. हा सामन्याला १ नोव्हेंबरपासून वानखेडे स्टेडियमवर सुरूवात होईल. भारतीय संघाने याआधीच मालिका गमावली आहे. बेंगळुरूनंतर न्यूझीलंडने पुण्यातील सामना जिंकून इतिहास रचला होता. भारताने १२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर मालिका गमावली आहे. आता मुंबईत आणखी १२ वर्षांचा विक्रम तुटण्याची शक्यता आहे. पण हा विक्रम निरंतर ठेवण्यासाठी भारतीय संघाला कोणत्याही किंमतीवर विजय मिळवणे गरजेचे आहे.

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारताचा विक्रम मोठा आहे. पण तो तसा चांगला नाही. संघाने १९७५ पासून येथे २६ कसोटी सामने खेळले आहेत. त्यापैकी १२ सामने जिंकले आहेत. तर भारतीयांनी सात सामने गमावले असून सात अनिर्णित राहिले आहेत. भारतीय संघाला ला गेल्या ५ सामन्यांमध्ये फक्त एकदाच पराभव पत्करावा लागला आहे. ज्यामध्ये शेवटचा पराभव २०१२ मध्ये इंग्लंडविरुद्ध झाला होता. तेव्हापासून १२ वर्षांपासून भारत येथे अजिंक्य आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)